# अध्याय एकविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु वैकुंठनाथा । स्वानंदवैकुंठीं सदा वसता । तुझें ऐश्वर्य स्वभावतां । न कळे अनंता अव्यया ॥ १ ॥ तुझ्या निजबोधाचा गरुड । कर जोडूनि उभा दृढ । त्याच्या पाखांचा झडाड । उन्मळी सुदृढ भववृक्षा ॥ २ ॥ तुझें स्वानुभवैकचक्र । लखलखित तेजाकार । द्वैतदळणीं सतेजधार । अतिदुर्धर महामारी ॥ ३ ॥ कैसा पांचजन्य अगाध । निःशब्दीं उठवी महाशब्द । वेदानुवादें गर्जे शुद्ध । तोचि प्रसिद्ध शंख तुझा ॥ ४ ॥ झळफळित सर्वदा । निजतेजें मिरवे सदा । करी मानाभिमानांचा चेंदा । ते तुझी गदा गंभीर ॥ ५ ॥ अतिमनोहर केवळ । देखतां उपजती सुखकल्लोळ । परमानन्दें आमोद बहळ । तें लीलाकमळ झेलिसी ॥ ६ ॥ जीव शिव समसमानी । जय

---

याप्रमाणें श्रीकृष्णनाथानें स्वानंदभरानें विसाव्या अध्यायांतील कथाभाग उद्धवाला मोठ्या आनंदानें सांगितला. ४६० आतां विसाव्या अध्यायाची विश्रांति व स्वानंदसुखाचे हेलकावे देणारा असा एकविसावा अध्याय सांगतों, तरी हे उद्धवा ! सादर चित्तानें ऐक. ६१ वेदांतील शुद्धाशुद्ध लक्षणांचें निरूपण पुढील अध्यायांत केलें आहे. तरी श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, असें एकनाथ जनार्दन विनवीत आहे. ४६२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील वेदत्रयीविभागयोग नांवाचा विसावा अध्याय समाप्त झाला.

सद्गुरु वैकुंठाधीशाला माझें वंदन असो. तूं निरंतर स्वानंदरूप वैकुंठांतच रहातोस. हे अनंता, अव्यया ! तुझ्या स्वाभाविक ऐश्वर्याचा कोणाला अंत लागत नाहीं. १ तुझ्यापुढें आत्मज्ञानरूपी गरुड हात जोडून उभा असतो. त्यानें पंख फडफडवितांच भवरूपी प्रचंड वृक्ष उन्मळून पडतो. २ तुझें स्वानुभव हेंच लखलखीत तेजोरूप चक्र आहे. भेदाचा नाश करण्यास त्याची धार सतेज आहे. त्यामुळें तें भयंकर आघात करितें. ३ तुझ्या हातांतील पांचजन्य शंख तर केवढा प्रचंड ध्वनि करितो. त्यानें निःशब्दांतहि शब्द उत्पन्न होतो. वेदवाणीनें शुद्ध गर्जना करणाराच तुझा प्रसिद्ध शंख होय. ४ आत्मतेजानें चकाकणारी तुझी गंभीर गदा मानापमानांचा चेंदा करून टाकिते. ५ अत्यंत मनोहर, पहातांक्षणीं आल्हाद देणारें, परमानंदरूपी सुगंध दरवळणारें लीलाकमल तूं हातांत झेलीत असतोस. ६ सम-समान असलेले जीव आणि शिव या दोघांना तूं जय-विजय हीं नांवें देऊन द्वारपाळ होण्याची

विजय नांवें देउनी । तेचि द्वारपाळ दोनी । आज्ञापूनी स्थापिले ॥ ७ ॥ तुझी निजशक्ति साजिरी । रमारूपें अतिसुंदरी । अखंड चरणसेवा करी । अत्यादरीं सादर ॥ ८ ॥ तुझे लोकींचे निवासी जाण । अवघे तुजचिसमान । तेथ नाहीं मानापमान । देहाभिमान असेना ॥ ९ ॥ तेथ काळाचा रिगमू नाहीं । कर्माचें न चले कांहीं । जन्ममरणाचें भय नाहीं । ऐशिया ठायीं तूं स्वामी ॥ १० ॥ जेथ कामक्रोधांचा घात । क्षुधेतृषेचा वोसाड प्रांत । निजानंदें नित्यतृप्त । निजभक्त तुझेनी ॥ ११ ॥ तुझेनि कृपाकटाक्षें । अलक्ष न लक्षितां लक्षे । तुझे चरणसेवापक्षें । नित्य निरपेक्षें नांदविसी ॥ १२ ॥ साम्यतेचें सिंहासन । ऐक्यतेची गादी जाण । त्यावरी तुझें सहजासन । परिपूर्ण स्वभावें ॥ १३ ॥ तन्मयतेचें निजछत्र । संतोषाचें आतपत्र । ज्ञानविज्ञानयुग्म चामर । सहजें निरंतर ढळताती ॥ १४ ॥ तेथ चारी वेद तुझे भाट । कीर्ति वर्णिती उद्भट । अठरा मागध अतिश्रेष्ठ । वर्णिती चोखट वंशावळी ॥ १५॥ तेथ साही जणां वेवाद । नानाकुसरीं बोलती शब्द । युक्तिप्रयुक्तीं देती बाध । दाविती विनोद जाणिवा ॥ १६ ॥ एक भावार्थी तुजलागुनी । स्तुति करिती न बोलूनी । तेणें स्तवनें संतोषोनी । निजासनीं बैसविसी ॥ १७॥ ऐसा सद्गुरु महाविष्णू । जो चिद्रूपें सम सहिष्णू । जो भ्राजमानें भ्राजिष्णू । जनीं जनार्दनू तो एक ॥ १८ ॥ जनीं जनार्दनूचि एकला । तेथ एकपणें एका मीनला । तेणें एकपणाचा ग्रास केला । ऐसा झाला महाबोधू ॥ १९ ॥ त्या महाबोधाचें बोधांजन । हातेंवीण लेववी जनार्दन । तेणें सर्वांगीं निघाले नयन । देखणेंपण सर्वत्र ॥ २० ॥ वरी सर्वत्र देखतां जाण । देखणेनि दिसे जनार्दन । ऐशी पूर्ण कृपा करून । दुजेपण सांडविलें ॥ २१ ॥ ऐसा तुष्टोनि भगवंत । माझेनि हातें श्रीभागवत । अर्थविलें जी यथार्थ । शेखीं प्राकृत देशभाषा ॥ २२ ॥ श्रीभागवतीं संस्कृत । उपाय असतां बहुत । काय नेणों आवडलें येथ । करवी प्राकृत प्रबोधें ॥ २३ ॥ म्यां करणें कां न करणें ।

---

आज्ञा केलीस. ७ तुझी आत्मशक्ति सुंदर आणि सुकुमार लक्ष्मी होऊन तुझी अखंड अत्यादरानें चरणसेवा करीत असते. ८ तुझ्या लोकीं रहाणारे सगळे रहिवाशी तुझ्यासारखेच आहेत. तेथें मानापमान किंवा देहाभिमान नाहीं. ९ जेथें काळाचा प्रवेश होत नाहीं, कर्माचें सामर्थ्य चालत नाहीं, जन्म-मरणाचें भय नाहीं अशा स्थानाचा तूं स्वामी आहेस. १० जेथें काम-क्रोधांचा नाश होतो, क्षुधा व तृषा यांचे प्रान्त ओसाड पडतात, तेथें तुझे भक्त तुझ्या आत्मानंदानें तृप्त होतात. ११ ज्याच्याकडे कोणाचेंहि लक्ष पोंचत नाहीं, तें ब्रह्म तुझ्या कृपादृष्टीनें दिसूं लागतें व तूं आपल्या चरणसेवेच्या अपेक्षेनें भक्तांना निरपेक्षपणें वागवितोस. १२ साम्याच्या सिंहासनावरील ऐक्याच्या गादीवर तूं सहजासन घालून बसतोस. १३ तुझ्या मस्तकावर तन्मयतेचें छत्र असतें. संतोषाची अबदागिरी, ज्ञान-विज्ञानाच्या दोन चवऱ्या सतत सहजच वारीत असतात. १४ चारी वेद तुझे स्तुतिपाठक भाट होऊन उच्च स्वरांत तुझी कीर्ति गात असतात. अठरा पुराणें हे गाननिपुण गंधर्व तुझ्या अत्यंत श्रेष्ठ वंशावळीचें वर्णन करितात १५ आणि सहा शास्त्रें अति चातुर्यानें वाद-विवाद करून युक्ति-प्रयुक्तीनें परस्परांचें खंडनमंडन करून ज्ञात्यांची मोठी करमणूक करितात. १६ कोणी भावार्थी जन न बोलतां तुझी स्तुति करितात. त्यांच्या स्तुतीनें संतुष्ट होऊन तूं त्यांस आपल्या पदावर बसवितोस. १७ असा जो ज्ञानस्वरूपानें सम, सहनशील, आत्मतेजानें देदीप्यमान् सद्गुरुरूपी महाविष्णु तोच जनांतील एक जनार्दन होय. १८ जनामध्यें एकरूपानें जनार्दनच भरलेला आहे. त्यांत ऐक्यभावानें एकनाथ मिळून गेला व त्यानें ऐक्याचा सगळा एकच ग्रास करून टाकिला. त्याला आत्मबोधाचें असें महत् ज्ञान प्राप्त झालें. १९ त्या महाज्ञानाचें अंजन जनार्दन हात न लावितांच डोळ्यांत घालितो. त्यामुळें सगळ्या बाजूनें दृष्टि येऊन ती सर्वव्यापक होते २० व सर्वत्र एक जनार्दनच भरलेला दिसतो. अशी पूर्ण कृपा करून त्यानें द्वैतभाव नाहींसा केला. २१ असा भगवंत संतुष्ट होऊन त्यानें माझ्या हातून भागवताचें यथार्थ निरूपण करविलें व तें शेवटीं प्राकृत मातृभाषेंत बोलविलें. २२ श्रीमद्भागवतावर अनेक संस्कृत टीका असतांनाहि त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक ! त्यांनीं प्राकृतांत सोपा अर्थ करविला. २३ 'मी केला किंवा न केला' याचें स्मरणहि त्या जनार्दनानें हिरावून नेलें. तेव्हां आतां

हेंही हिरूनि नेलें जनार्दनें । आतां ग्रंथार्थनिरूपणें । माझें बोलणें तो बोले ॥ २४ ॥ तेणें बोलोनि निजगौरवा । वेदविभागसद्भावा । तो एकादशीं विसावा । उद्धवासी बरवा निरूपिला ॥ २५ ॥ तेथ भक्त आणि सज्ञान । त्यांसी पावली वेदार्थखूण । कर्मठीं देखतां दोषगुण । संशयीं जाण ते पडले ॥ २६ ॥ त्या संशयाचें निरसन । करावया श्रीकृष्ण । एकविसावा निरूपण । गुणदोषलक्षण स्वयें सांगे ॥ २७ ॥ त्या गुणदोषांचा विभाग । सांगोनियां विषयत्याग । करावया श्रीरंग । निरूपण साङ्ग सांगत ॥ २८ ॥

श्रीभगवानुवाच—य एतान्मत्पथो हित्वा भक्तिज्ञानक्रियात्मकान् ।
क्षुद्रान्कामांश्चलैः प्राणैर्जुषन्तः संसरन्ति ते ॥ १ ॥

म्यां सांगीतले जे विभाग । भक्तिज्ञानक्रियायोग । हा सांडूनि शुद्ध वेदमार्ग । सकाम भोग जे वांछिती ॥ २९ ॥ क्षणभंगुर देहाचा योग । हें विसरोनियां चांग । सकाम कर्मांची लगबग । भवस्वर्गभोग भोगावया ॥ ३० ॥ चळतेनि प्राणसंगें । देहातें काळ ग्रासूं लागे । येथ नानाकामसंभोगें । मूर्ख तद्योगें मानिती सुख ॥ ३१ ॥ भोगितां कामभोग सोहळे । नेणे आयुष्य ग्रासिलें काळें । मग

---

ग्रंथार्थ निरूपण करितेवेळीं माझें बोलणें वास्तविक तोच बोलत आहे. २४ त्यानें स्वतःच्या गौरवाकरितां वेदाचे तीन विभाग करून ते अकराव्या स्कंधांतील विसाव्या अध्यायांत प्रेमादरानें उद्धवाला सांगितले. २५ तेव्हां जे ज्ञानी आणि भक्त होते, त्यांना ती खूण बरोबर पटली. परंतु कर्मठ गुणदोषांकडे पहाणारे असल्यामुळें ते मोठ्या घोटाळ्यांत पडले. २६ त्यांच्या संशयाचें निरसन करण्यासाठीं या एकविसाव्या अध्यायांत गुण-दोषांचें लक्षण श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. २७ त्या-दोषांचा प्रकार सांगून विषयांचा त्याग करविण्यांसाठीं श्रीरंग सविस्तर निरूपण करीत आहे. २८.

[ या एकविसाव्या अध्यायांत कर्म, ज्ञान व भक्ति यांमध्यें ज्यांचा अधिकार नाहीं अशा कामी पुरुषांचे द्रव्य, देश इत्यादि गुण दोष सविस्तर सांगितले आहे. ]

—याप्रमाणें गुण व दोष यांच्या व्यवस्थेसाठीं योगत्रय सांगितलें. त्यांतील ज्ञान व भक्ति यांनीं सिद्ध झालेल्या पुरुषांच्या ठिकाणीं गुण-दोष कांहीं नाहींत. पण प्रथमतः निवृत्त कर्मामध्यें तत्पर झालेल्या साधकांचा यथाशक्ति नित्य नैमित्तिक कर्मानुष्ठान करणें हा गुण आहे. कारण तें कर्म चित्तशोधक आहे, त्याचेंच अनुष्ठान न करणें व निषिद्ध कर्मानुष्ठान करणें हा दोष आहे. कारण तो चित्ताला मलिन करितो. प्रायश्चित्त हा निवृत्त कर्मनिष्ठ साधकांचा गुण आहे. कारण तो चित्ताला मलिन करणाऱ्या दोषाची निवृत्ति करणारा आहे. ज्यांचें चित्त शुद्ध झालें आहे, अशा ज्ञाननिष्ठाचा ज्ञानाभ्यास हा गुण आहे. कारण तो सिद्धीचा हेतु आहे. पण भक्तिनिष्ठांचा श्रवण-कीर्तनादि भक्ति हाच गुण आहे. याच्या विरुद्ध असलेले सर्व उभयतांनाहि दोषरूप आहेत, असें पूर्वीं सांगितलें. आतां जे सिद्ध नाहींत व साधकहि नाहींत, तर केवल काम्य कर्मप्रधान आहेत त्यांच्या सर्व गुण-दोषांचा विस्तार करणारे भगवान् प्रथम अति बहिर्मुख असलेल्या कर्मठांची निंदा करितात—

श्रीभगवान् उवाच–श्रीकृष्ण म्हणाले–ये भक्ति-ज्ञान-क्रियात्मकान् एतान् मत्पथः हित्वा–जे भक्ति, ज्ञान व कर्म एतद्रूप या मीं सांगितलेल्या मार्गाचा त्याग करून, क्षुद्रान् कामान्–तुच्छ, कामाचें, चलैः प्राणैः जुषन्तः–अस्थिर इंद्रियांनीं किंवा देहवायूंनीं सेवन करितात, ते संसरन्ति–ते सर्व गुण-दोषांना पात्र होऊन विविध योनींस प्राप्त होतात. [ जे मीं सांगितलेल्या भक्ति-ज्ञान-कर्मात्मक मार्ग सोडून चंचल इंद्रियांनीं तुच्छ विषयांचा उपभोग घेतात ते अनेक योनींत जन्म-मरणादि दुःखाचा अनुभव घेतात. ] १.

भक्ति-ज्ञान-कर्म हे जे तीन विभाग मीं सांगितले, तो शुद्ध वेदमार्ग होय. परंतु सकाम लोक तो मार्ग सोडून सुखाची इच्छा करितात. २९ देहसंबंध क्षणभंगुर आहे, हें साफ विसरून इहलोकींच्या व स्वर्गींच्या विषयभोगासाठीं सकाम कर्मांची खटपट करीत असतात. ३० चंचल प्राणांच्या संगतीनें देहाला काळ ग्रासीत असतांहि प्रपंचांतील अनेक विषयोपभोगांत व त्यांच्या उद्योगांत मूर्ख लोक सुख मानितात. ३१ कामभोगाचे सोहाळे भोगीत असतां

**जन्ममरणमाळें । दुःखउमाळे भोगिती ।। ३२ ।। काम्य आणि नित्यकर्म । आचरतां दिसे सम । तरी फळीं कां पां विषम । सुगम दुर्गम परिपाकू ।। ३३ ।। तें कर्मवैचित्र्यविंदान । संकल्पास्तव घडे जाण । तोंचि अर्थीचें निरूपण । जाणोनि श्रीकृष्ण सांगत ।। ३४ ।।**

स्वे स्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः । विपर्ययस्तु दोषः स्यादुभयोरेष निश्चयः ।। २ ।।

**कर्म विचारितां अवघें एक । परी अधिकार भिन्नभिन्न देख । ते मी सांगेन आवश्यक । जेणें सुखदुःख भोगणें घडे ।। ३५ ।। मुखाचा व्यापार भोजन । तो नाकें करूं जातां जाण । सुख बुडवूनि दारुण । दुःख आपण स्वयें भोगी ।। ३६ ।। कां पायांचें जें चालणें । पडे जैं डोई करणें । तैं मार्ग न कंठे तेणें । परी कष्टणें अनिवार ।। ३७ ।। तेवीं जें कर्म स्वाधिकारें । सुखातें दे अत्यादरें । तेंचि कर्म अन्याधिकारें । दुःखें दुर्धरें भोगावी ।। ३८ ।। राजाचें आभरण । गाढवासी नव्हे भूषण । परी भारें आणी मरण । तेवीं कर्म जाण अनधिकारीं ।। ३९ ।। मेघ वर्षे निर्मळ जळ । परी जैसें बीज तैसें फळ । एका भागीं पिके सबळ । एका प्रबळ साळी केळें ।। ४० ।। पाहें पां जैसें दुग्ध चोख । ज्वरिता-मुखीं कडू विख । तेंचि निरुजा गोड देख । पुष्टिदायक सेवनीं ।। ४१ ।। तेवीं सकामीं कर्म घडे । तें बाधक होय गाढें । तेंचि गा निष्कामाकडे । मोक्षसुखाडें सुखावी ।। ४२ ।। स्वाधिकारें स्वकर्माचरण । तोचि येथें मुख्यत्वें गुण । अनधिकारीं कर्म जाण । तोचि अवगुण महादोष ।। ४३ ।। या रीतीं गा कर्मा-**

---

काळानें नेलेलें आयुष्य त्यांना कळत नाहीं; ते जन्ममरणांच्या फेऱ्यांत दुःखाचे उमाळे भोगितात. ३२ काम्य आणि नित्यकर्म यांचें आचरण तर सारखेंच दिसतें; परंतु त्यांचें फल विषम असल्यामुळें त्यांचे परिणामहि चांगले व वाईट असतात. ३३ संकल्पामुळें हें कर्मवैचित्र्य घडतें. याचेंच निरूपण आतां श्रीकृष्ण करीत आहे. ३४.

—'अहोपण, त्याच कर्मांनीं कांहीं गुण-दोषभाक् होतात व कोणी होत नाहींत, असें हें वैषम्य कां ! अग्नि कांहीं लोकांना ताप देतो व कांहींना देत नाहीं, असें कधीं होत नाहीं.' उत्तर—

स्वे स्वे अधिकारे या निष्ठा—आपापल्या अधिकारामध्यें जी निष्ठा-तत्परता, सः गुणः परिकीर्तितः—तो गुण म्हटलेला आहे. विपर्ययः तु दोषः स्यात्—पण यांच्या उलट स्व—स्व—अधिकारामध्यें तत्पर नसणें हा दोष आहे. उभयोः एषः निश्चयः—गुण व दोष यांचा हा असा निर्णय आहे. [ अधिकारभेदानें गुण-दोष कल्पिलेले आहेत. ते वस्तुनिष्ठ नाहींत, असा भावार्थ. ] २.

कर्म पाहिलें असतां सगळें एकच आहे; पण त्याचे अधिकारी भिन्न-भिन्न आहेत; त्यामुळें सुख दुःख भोगावें लागतें. ३५ तें मी तुला अवश्य सांगतों, ऐक. खाणें, पिणें, इत्यादि तोंडानें करावयाचीं कामें जर कोणी नाकानें करूं लागला तर त्याला सुख होण्याऐवजीं भयंकर दुःख भोगावें लागेल; ३६ किंवा पायांनीं चालावयाचें सोडून एखादा मनुष्य जर डोक्यानें चालूं लागला तर मार्ग आक्रमण करितां येणार नाहींच; पण उलट अनिवार कष्ट मात्र सोसावे लागतील. ३७ त्याप्रमाणें स्वधर्माधिकाराप्रमाणें जें कर्म केलें असतां अत्यंत सुख प्राप्त होतें, तेंच कर्म अधिकारावांचून करणारांस दुर्धर दुःख भोगवितें. ३८ हत्तीवर घालावयाची झूल, अंबारी इत्यादि भूषणें जर गाढवावर चढविलीं तर त्यांनीं त्याला शोभा येण्याऐवजीं तो बिचारा त्या अलंकारांच्या भारानेंच मरून जाईल ! अनधिकारी माणसानें कर्म केल्यास त्याचीहि तशीच स्थिति होते. ३९ मेघ निर्मळ जलाचा वर्षाव करितो; परंतु जसें बीज असेल तसेंच फल येतें. कांहीं भागांत भरपूर पीक येतें. कोठें तांदळाचीं शेतें येतात; तर कोठें केळीं पिकतात; ४० किंवा निर्मळ दूध असलें तरी तें आजारी माणसाच्या जिभेला कडु लागतें आणि निरोगी माणसाला मोठें गोड लागतें. त्याचें सेवन त्याला जसें पुष्टिदायक होतें ४१ त्याचप्रमाणें सकाम कर्म अत्यंत बाधक होतें आणि तेंच कर्म निष्कामबुद्धीनें केलें असतां मोक्षसुखाचा लाभ करून देतें. ४२ आपल्या अधिकारानुसार स्वकर्माचें आचरण करणें हाच येथें मुख्यत्वेंकरून गुण आहे आणि अधिकार नसलेलें कर्म करणें हा महादोष व मोठा अवगुण आहे. ४३ याप्रमाणें कर्माचरण

चरण । उपजवी दोष आणि गुण । हेंचि गुणदोषलक्षण । शास्त्रज्ञ जाण बोलती ॥ ४४ ॥ तेंचि गुणदोषलक्षण । शुद्धयशुद्धींचें कारण । तेंचि अर्थीचें विवंचन । देवो आपण सांगत ॥ ४५ ॥

शुद्ध्यशुद्धी विधीयेते समानेष्वपि वस्तुषु । द्रव्यस्य विचिकित्सार्थं गुणदोषौ शुभाशुभौ ॥ ३ ॥

पंचभूतें समान जाण । वस्तु सर्वत्र समसमान । तेथ गुणदोष अप्रमाण । परी केलें प्रमाण या हेतू ॥ ४६ ॥ न प्रेरितां श्रुतिस्मृती । आविद्यक विषयप्रवृत्ती । अनिवार सकळ भूतीं । सहजस्थितिस्वभावें ॥ ४७ ॥ ऐसी स्वाभाविक विषयस्थिती । तिची करावया उपरती । नाना गुणदोष बोले श्रुती । विषयनिवृत्ती लागुनी ॥ ४८ ॥ हें एक शुद्ध एक अशुद्ध । पैल शुभ हें विरुद्ध । मीचि बोलिलों वेदानुवाद । विषयबाध छेदावया ॥ ४९ ॥ विषयाची जे निवृत्ती । तीचि वेदरूपें म्यां केली स्तुती । निंदिली विषयप्रवृत्ती । चिळसी चित्तीं उपजावया ॥ ५० ॥ चालतां कर्मप्रवृत्ती । होय विषयांची निवृत्ती । ऐशी वेदद्वारें केली युक्ती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ५१ ॥

धर्मार्थं व्यवहारार्थं यात्रार्थमिति चानघ । दर्शितोऽयं मयाऽऽचारो धर्ममुद्वहतां धुरम् ॥ ४ ॥

उद्धवा तूं निष्पाप त्रिशुद्धी । यालागीं तुझी शुद्ध बुद्धी । धर्मादि व्यवहारसिद्धी । ऐक तो विधि सांगेन ॥ ५२ ॥ करितांही धर्माचरण । प्रवृत्तिधर्म तो अप्रमाण । निवृत्तिधर्म तो अतिशुद्ध जाण । हे

---

गुण-दोष उत्पन्न करितें. गुण-दोषांचें हेंच लक्षण शास्त्रज्ञांनीं सांगितलें आहे. ४४ तेंच गुणदोषलक्षण व शुद्धि-अशुद्धीचें कारण देव स्वतः विवेचन करून सांगत आहे. ४५.

—याचाच अधिक विस्तार—

द्रव्यस्य विचिकित्सार्थं समानेषु अपि वस्तुषु शुद्ध्यशुद्धी विधीयेते—द्रव्याच्या विचिकित्सेसाठीं म्ह० हें द्रव्य योग्य आहे कीं अयोग्य असा संदेह आला असतां विचार करून स्वाभाविक प्रवृत्तीला प्रतिबंध करण्यासाठीं समान—एकाच वस्तूंतील योग्यत्व व अयोग्यत्व यांच्या अनुरोधानें शुद्धि व अशुद्धि यांचें विधान केलें जातें. गुणदोषौ—योग्याचें ग्रहण व अयोग्याचा त्याग करण्यासाठीं गुण व दोष यांचें विधान करितात व, शुभाशुभौ—शुभाशुभाच्या निमित्तानें अर्थ व अनर्थ यांचा निश्चय केला जातो. ३.

पंचभूतें समान आहेत आणि ब्रह्मतत्त्वहि सर्वत्र सारखेंच आहे. असें असतां गुणदोष अप्रमाण ठरतात खरें; परंतु पुढील कारणामुळें त्यास प्रमाण मानितात. ४६ श्रुति-स्मृतींनें प्रेरणा केल्यावांचून सर्व भूतांमध्यें विषयांविषयीं अनिवार प्रवृत्ति स्वाभाविकच असते. ४७ स्वाभाविक विषयप्रवृत्तीपासून निवृत्त होण्यासाठीं श्रुतीनें अनेक गुण-दोष सांगितले आहेत. ४८ हें शुद्ध, हें अशुद्ध, हें विहित, हें निषिद्ध, असें विषयांची बाधा घालविण्यासाठीं मीच वेदवाणीनें बोललों आहें. ४९ मीं वेदरूपानें विषयनिवृत्तीची स्तुति केली आहे व मनाला तिटकारा येण्यासाठीं विषयप्रवृत्तीची निंदा केली आहे. ५० विहित कर्ममार्गानें चाललें असतां मन विषयांपासून सहजच निवृत्त व्हावें, अशी मीं वेदाच्या द्वारां युक्ति योजून ठेविली आहे. तीच आतां तुला सांगतों, ऐक. ५१.

हे अनघ धर्मार्थं व्यवहारार्थं यात्रार्थं इति च अयं धर्मं धुरं उद्वहतां आचारः मया दर्शितः—हे निष्पापा, धर्म, व्यवहार व यात्रा, यांसाठीं शुद्ध कर्मानें धर्म, अशुद्ध कर्मानें अधर्म, याप्रमाणें शुद्धि व अशुद्धि हे गुण-दोष; अशुद्धीमध्येंहि राजादिकांना व्यवहारदर्शनादि राजकार्य ग्राह्य आहे, इतर ग्राह्य नाहीं; याप्रमाणें शुभ व अशुभ; त्याचप्रमाणें जीवनासाठीं दोषत्व जरी असलें तरी आपत्कालीं केवळ शरीरनिर्वाहासाठीं अवश्य तेवढ्याच वस्तूंचें ग्रहण करण्यांत पाप नाहीं; त्यापेक्षां अधिक ग्रहण करण्यांत पाप आहे, असे गुण-दोष मीं मन्वादिरूपानें क्रमानें धर्मरूप भार धारण करणाऱ्या कर्मजडांचा हा आचार म्हणून सांगितले आहेत. ४.

हे उद्धवा ! खरोखर तूं निष्पाप आहेस, म्हणून तुझी बुद्धि शुद्ध आहे. तुला धर्मादि व्यवहाराच्या सिद्धीचा विधि सांगतों, ऐक. ५२ धर्माचरणांत कर्ममार्ग अप्रमाण असून ज्ञानमार्ग अत्यंत शुद्ध आहे. हेच स्वधर्मांतील गुण-

दोषगुण स्वधर्मीं ॥ ५३ ॥ जो व्यवहार विषयासक्तीं । तो अशुद्ध व्यवहारस्थितीं । जे परोपकारप्रवृत्ती । तो व्यवहार वंदिती सुरनर ॥ ५४ ॥ अदृष्टदाता ईश्वर । हें विसरोनि उत्तम नर । द्रव्यलोभें नीचांचे दारोदार । हिंडणें अपवित्र ते यात्रा ॥ ५५ ॥ आळस सांडोनि आपण । करूं जातां श्रवण कीर्तन । कां तीर्थयात्रा साधुदर्शन । पूजार्थ गमन देवालयीं ॥ ५६ ॥ का अनाथप्रेतसंस्कार । करितां पुण्य जोडे अपार । पदीं कोटियज्ञफळसंभार । जेणें साचार उपजती ॥ ५७ ॥ जेणें पाविजे परपार । तिये नांव यात्रा पवित्र । हा यात्रा शास्त्रार्थ संचार । गुणदोषविचार वेदोक्त ॥ ५८ ॥ राजा निजपादुका हटेंसीं । वाहवी ब्राह्मणाचे शिसीं । तो दोष न पवे द्विजासी । स्वयें सदोषी होय राजा ॥ ५९ ॥ तेवीं आपत्काळबळें जाण । पडतां लंघन लंघनीं । तैं घेऊनि नीचाचें धान्य । वांचवितां प्राण दोष नाहीं ॥ ६० ॥ तेंचि नीचाचें दान । अनापदीं घेतां जाण । जनीं महादोष दारुण । हेंही जाण वेदोक्त ॥ ६१ ॥ जे कर्मधर्मप्रवर्तक शुद्ध । मनुपराशरादि प्रसिद्ध । तिहीं गुणदोष विविध । शुद्धाशुद्ध बोलिले ॥ ६२ ॥ तेंचि शुद्धाशुद्धनिरूपण । तीं श्लोकीं नारायण । स्वयें सांगताहे आपण । गुणदोषलक्षणविभाग ॥ ६३ ॥

भूम्यम्ब्वग्न्यनिलाकाशा भूतानां पञ्च धातवः । आब्रह्मस्थावरादीनां शारीरा आत्मसंयुताः ॥ ५ ॥
वेदेन नामरूपाणि विषमाणि समेष्वपि । धातुषूद्धव कल्प्यन्त एतेषां स्वार्थसिद्धये ॥ ६ ॥

---

दोष आहेत. ५३ व्यवहारांतहि विषयासक्तीनें जो व्यवहार करावा तो निंद्य व अपवित्रच होय आणि जो व्यवहार परोपकारवृत्तीनें करावा तो देव व मनुष्य यांना वंद्य असतो. ५४ आपल्या प्रारब्धानुसार फल देणारा ईश्वर आहे, हें विसरून चांगलीं जाणतीं माणसेंहि द्रव्यलोभानें नीच लोकांच्या दारोदार हिंडतात. ही अपवित्र यात्रा होय. ५५ परंतु आळस टाकून कथाकीर्तन ऐकणें; तीर्थ-यात्रा, साधुसंतांचें दर्शन करणें; पूजेसाठीं देवालयांत जाणें; ५६ किंवा अनाथ प्रेताला अग्निसंस्कार करणें इत्यादि कर्मांनीं अपार पुण्य जोडतें. हीं कर्में करीत असतां पावलोंपावलीं कोट्यवधि यज्ञांच्या फलांचें पुण्य गांठीं पडतें. ५७ त्यायोगें संसाराच्या पार जातां येतें. तीच खरी यात्रा होय. हीच शास्त्रार्थाला धरून यात्रा, म्हणजेच वेदोक्त गुण-दोष होत. ५८ एखाद्या राजानें मोठ्या दुराग्रहानें स्वतःच्या वहाणा जर ब्राह्मणाच्या डोकीवर दिल्या, तर त्याचा दोष त्या ब्राह्मणाला नाहीं, राजा दोषी होईल. ५९ त्याप्रमाणें आपत्कालीं अन्नाच्या अभावीं उपासमार होण्याचा प्रसंग आला असतां नीच माणसाकडून धान्य घेऊन प्राण वांचविणारास दोष लागत नाहीं. ६० परंतु तेंच सुसंपन्न स्थितींत नीच माणसाकडून ब्राह्मणानें दान घेतलें तर त्याला भयंकर दोष लागतो, असेंहि वेदवचन आहे. ६१ धर्मकर्मांचे आद्य प्रवर्तक अशा प्रसिद्ध मनु-पराशरादिकांनींहि हे अनेक प्रकारचे शुद्ध-अशुद्ध गुण-दोष सांगून ठेविलें आहेत. ६२ त्याच गुणदोषांचे विभाग शुद्ध-अशुद्धाचें निरूपण करून स्वतः नारायण पुढील तीन श्लोकांनीं सांगत आहे. ६३.

—आतां शुद्धि व अशुद्धि यांचा विस्तार करणारे भगवान् वेदानें सांगितलेले असल्यामुळें त्यांविषयीं वृथा अभिनिवेश होऊं नये म्हणून तिसऱ्या श्लोकांत ‘ समानेषु अपि वस्तुषु ’ असें जें म्हटलें आहे त्याचाच पुढील तीन श्लोकांनीं विस्तार करितात—

भूमि-अंबु-अग्नि-अनील-आकाशाः आब्रह्मस्थावरादीनां भूतानां शारीराः आत्मसंयुताः पंचधातवः—पृथ्वी जल, अग्नि, वायु, व आकाश हे आब्रह्मस्तंबपर्यंत प्राण्यांचे शरीराचा आरंभ करणारे आत्मचैतन्ययुक्त पांच धातु म्ह० कारणें आहेत. [ धारण करितात म्हणून धातु. ‘आत्मसंयुक्ताः’ या पदानें सर्व प्राण्यांचें जीवदृष्ट्या साम्य सांगून बाकीच्या सर्व पदांनीं देहतः साम्य सांगितलें आहे. ] ५.

उद्धव–हे उद्धवा ! समेषु अपि धातुषु वेदेन विषमाणि नामरूपाणि कल्प्यन्ते—याप्रमाणें सर्वप्रकारें समान असलेल्या देहांमध्येंहि वेदानें वर्णाश्रमादि विषम नाम-रूपें कल्पिलेलीं आहेत. ( या कल्पनेचें प्रयोजन– ) एतेषां स्वार्थसिद्धये—या प्राण्यांच्या प्रवृत्तिनियमद्वारां धर्मादि पुरुषार्थसिद्धीसाठीं. [ वेदानें पांचभौतिक सम शरीरांतहि विषम नाम-रूपांची कल्पना केली आहे. ] ६.

पृथ्वी आप तेज वायु गगन । ब्रह्मादि स्थावरान्त जाण । भूतीं पंचभूतें समान । वस्तूही आपण सम सर्वी ॥ ६४ ॥ नाहीं नाम रूप गुण कर्म । ऐसें जें केवळ सम । तेथ माझेनि वेदें विषम । केलें निरुपम नाम हितार्थ ॥ ६५ ॥ तळीं पृथ्वी वरी गगन । पाहतां दोनी समान । तेथ दश दिशा कल्पिल्या जाण । देशांतरगमनसिद्धय्र्थ ॥ ६६ ॥ तेवीं नाम रूप वर्णाश्रम । समाच्या ठायीं जें विषम । हा माझेनि वेदें केला नेम । स्वधर्मकर्मसिद्धय्र्थ ॥ ६७ ॥ येणेंचि द्वारें सुलक्षण । धर्मार्थकाममोक्षसाधन । पुरुषांच्या हितालागीं जाण । म्यां केलें नियमन वेदाज्ञा ॥ ६८ ॥ रूप नाम आश्रम वर्ण । वेद नेमितां ना आपण । तैं व्यवहारू न घडता जाण । मोक्ष-साधन तैं कैचें ॥ ६९ ॥ एवं वेदें चालवूनि व्यवहारू । तेथेंचि परमार्थविचारू । दाविला असे चमत्कारू । सभाग्य नरू तोचि जाणे ॥ ७० ॥ अत्यंत करितां कर्मादरू । तेण कर्मठचि होय नरू । तेथ परमार्थ नाहीं साचारू । विधिनिषेधीं थोरू पीडिजे ॥ ७१ ॥ केवळ स्वधर्मकर्म सांडितां । अंगीं आदळे पाषंडता । तेणेंही मोक्ष न ये हाता । निजस्वार्था नागवले ॥ ७२ ॥ यालागीं स्वधर्म आचरितां । निजमोक्ष लाभे आयिता । हे वेदार्थाची योग्यता । जाणे तो ज्ञाता सज्ञान ॥ ७३ ॥ हे वेदार्थनिजयोग्यता । सहसा न ये कवणाचे हाता । याचिलागीं गा परमार्था । गुरु तत्त्वतां करावा ॥ ७४ ॥ त्या सद्गुरूची पूर्ण कृपा होय । तरीच आतुडे वेदगुह्य । गुरुकृपेवीण जे उपाय । ते अपाय साधकां ॥ ७५ ॥ यालागीं माझा वेद जगद्गुरू । दावी आपातता व्यवहारू । नेमी स्वधर्मकर्मादरू । जनाचा उद्धारू करावया ॥ ७६ ॥ ऐसा माझा वेद हितकारी । दावूनि गुणदोष नानापरी । जन काढी विषयाबाहेरी । वेद उपकारी जगाचा ॥ ७७ ॥

---

पृथ्वी, जल, तेज, वायु व आकाश हीं पंचभूतें आब्रह्मस्तंभपर्यंत म्ह० ब्रह्मदेवापासून क्षुद्र कीटकापर्यंत सर्व प्राणिमात्रांत सारखीं आहेत आणि ब्रह्मतत्त्वहि सर्वत्र सम भरलेलें आहे. ६४ माझ्या वेदानें लोकांच्या हितासाठीं नाम-रूप, गुण-कर्म, यांनीं रहित असलेल्या केवळ सम ब्रह्माचे नामरूपादि भेद कल्पून ठेविले आहेत. ६५ वास्तविक पाहिलें, तर खालीं पृथ्वी आणि वर आकाश असतें; पण देशान्तरीं जाण्यास सोपें पडावें म्हणून जशा दशदिशा कल्पिल्या आहेत, ६६ त्याचप्रमाणें नाम-रूप वर्णाश्रम हे सम असतां स्वधर्मकर्म व्यवस्थित चालण्यासाठीं माझ्या वेदानें ते विषम करून ठेविले आहेत. ६७ त्याच्याच द्वारां लोकांच्या हितासाठीं मीं धर्म-अर्थ-काम-मोक्ष यांच्या साधनांचे नियम वेदाज्ञेच्या रूपानें करून ठेविले आहेत. ६८ वेदानें जर रूप-नाम, आश्रम, वर्ण यांचे नियम घालून दिले नसते तर मग लोकांचा व्यवहार व्यवस्थितपणें घडलाच नसता; मग मोक्षसाधन कोठचें घडणार ! ६९ याप्रमाणें वेदानें लौकिक व्यवहार चालवून त्यांतच परमार्थाचा विचार करून ठेविला आहे, असा त्यानें मोठा चमत्कार दाखविला आहे; परंतु तो भाग्यवान् पुरुषच जाणतो. ७० कर्मांवर अत्यंत निष्ठा ठेवणारा पुरुष कर्मठ होतो व त्यांत खरा पुरुषार्थ साधत नाहीं. तो विधि-निषेधानें अतिशय पीडित होतो. ७१ बरें, स्वधर्मकर्म सोडून द्यावें तर नास्तिकपणा अंगीं येतो व त्यानें मोक्ष हातीं येत नाहीं. अशा प्रकारें मनुष्य आपल्या स्वार्थाला मात्र मुकतो. ७२ म्हणून स्वधर्म आचरिला असतां अनायासें मोक्ष प्राप्त होतो, हें वेदार्थाचें रहस्य जाणणाराच खरा ज्ञानसंपन्न होय. ७३ पण वेदाचा हा गूढ अर्थ सहज कोणाच्या लक्षांत येत नाहीं. यासाठींच परमार्थाचा मार्ग दाखविणारा गुरु करावा. ७४ त्या सद्गुरूची जेव्हां पूर्ण कृपा होते, तेव्हांच वेदाचा गुह्य अर्थ कळतो. गुरूच्या कृपेवांचून सर्व साधनें साधकाला अपाय करणारीं आहेत. ७५ यास्तव माझा वेद जगद्गुरूच आहे. तो लोकांचा उद्धार करण्यासाठीं वरून सर्व व्यवहार दाखवितो. ७६ व स्वधर्मकर्माविषयीं अत्यादरानें नियम सांगतो. माझा वेद असा हित करणारा आहे. तो अनेक प्रकारचे गुण-दोष दाखवून लोकांना विषयांतून बाहेर काढितो व अशाप्रकारें तो जगावर उपकार करितो. ७७.

देशकालादिभावानां वस्तूनां मम सत्तम । गुणदोषौ विधीयेते नियमार्थं हि कर्मणाम् ॥ ७ ॥

**भक्तांमाजीं भक्तोत्तम । साधुलक्षणी साधुसम । यालागीं उद्धवासी सत्तम । म्हणे पुरुषोत्तम अतिप्रीतीं ॥ ७८ ॥ उद्धवा येथ भलता नर । भलता करील कर्मादर । यालागीं वर्णाश्रमविचार । नेमिला साचार वेदांनीं ॥ ७९ ॥ जेथ करूं नये कर्मतंत्र । ऐसा जो देश अपवित्र । आणि काळादि द्रव्य विचित्र । पवित्रापवित्र सांगेन ॥ ८० ॥**

अकृष्णसारो देशानामब्रह्मण्योऽशुचिर्भवेत् । कृष्णसारोऽप्यसौवीरकीकटासंस्कृतेरिणम् ॥ ८ ॥

**कोणे एके पृथ्वीतळीं । मेघ न वर्षतां जळीं । पेरिले धान्यें सदा निळीं । वसुधा जिव्हाळी ते म्हणती ॥ ८१ ॥ तेंचि पाहतां पृथ्वीवरी । एके भागीं गा उखरीं । मेघ वर्षतां शरधारीं । अंकुर ना डिरी उखरत्वें ॥ ८२ ॥ तेवीं देशाची शुद्ध्यशुद्धी । तुज मी सांगेन यथाविधी । जेथ कर्मी नोहे कार्यसिद्धी । तेथ कर्म त्रिशुद्धीं न करावें ॥ ८३ ॥ कृष्णमृग जेंथ नाहीं । ते जाण पां अपवित्र भुयी । कर्मादरू तिये ठायीं । न करावा पाहीं सर्वथा ॥ ८४ ॥ जेथ ब्राह्मणचि नाहीं । तो देश अपवित्र पाहीं । ब्राह्मण अकर्मी जे ठायीं । भूमी तेही अपवित्र ॥ ८५ ॥ जेथ ब्राह्मणाची अभक्ती । शेखीं हेळूनि निंदिती ।**

---

हे सत्तम—हे साधूत्तमा उद्धवा ! केवल देहादिकांविषयीं नव्हे तर, मम देशकालादिभाव नां वस्तूनां गुणदोषौ कर्मणां नियमार्थं हि विधीयेते—माझ्याकडून देश, काल इत्यादि भावांच्या ( आदिशब्दानें अग्राह्य असलेलें फल, निमित्त व अधिकारी यांचें ग्रहण करावें. ) व ग्राह्य असलेल्या व्रीहि-यवादि वस्तूंच्या गुण-दोषांचें विधान कर्मांच्या संकोचासाठींच केलें जातें. [ कर्मांच्या संकोचासाठींच मी देशादि अग्राह्य व व्रीह्यादि ग्राह्य वस्तूंच्या गुण-दोषांचें विधान करितों. ] ७.

उद्धव भक्तांमध्यें उत्तम भक्त व साधूंमध्यें साधूंच्या श्रेष्ठ गुणांनीं युक्त असल्यामुळें श्रीकृष्णानें त्याला अतिशय प्रीतीनें ' सत्तम ' म्ह० साधुश्रेष्ठ असें म्हटलें आहे. ७८ उद्धवा ! हवा तो मनुष्य हव्या त्या कर्माचा आदर करील, म्हणून वेदानें वर्णाश्रमांचा विचार सांगून ठेविला आहे. ७९ आतां कर्म आचरण्यास अपवित्र असलेला देश व अमंगल काल व अशुद्ध द्रव्यादि यांचा पवित्र-अपवित्रपणा सांगतों ऐक. ८०.

—याप्रमाणें गुण-दोषविषयाचें परिशोधन करून ते गुण-दोष शुद्धि--अशुद्धिमूलक असल्यामुळें या पुढील आठ श्लोकांनीं शुद्धि व अशुद्धि यांचाच अधिक विस्तार करितात—

देशानां अकृष्णसारः अशुचिः भवेत्—देशांतील जो देश कृष्णसार हरिणरहित असतो तो अशुचि आहे. त्यांतहि, अब्रह्मण्यः-ब्राह्मणभक्तिशून्य प्रदेश तर अतिशय अशुचि आहे. कृष्णसारः अपि असौवीरकीकट-असंस्कृत-ईरिणं-कृष्ण मृगाच्या योगानें श्रेष्ठ असलेलाहि असौवीर कीटक, असंस्कृत व ईरण– [ ओसाड प्रदेश हे अशुचि होत. सुवीर म्ह० सत्पुरुष त्यांनीं युक्त असलेला जो प्रदेश तो सौवीर, असा कीकट प्रदेशहि शुची होय. ' कारण जेथें सत्पात्राचा लाभ होतो तो पुण्यतम देश होय ' असें वचन आहे. पण सौवीररहित कीकट म्ह० अंग, वंग, कलिंग इत्यादि देश, संमार्जनादि संस्कारशून्य किंवा म्लेच्छप्रचुर देश व ईरण-ऊषर देश कृष्णमृगानें युक्त असले तरी अशुचि आहेत. यांना सोडून बाकीचे शुचि आहेत.] ८.

पृथ्वीवर कांहीं ठिकाणीं मुळींच पाऊस पडत नसल्यामुळें थेंबभरहि पाणी नसतें; पण तेथें पेरलेलीं शेतें हिरवीचार दिसतात व तेथली जमीनहि पाणथळच असते; ८१ पण याच्या उलट याच पृथ्वीवर कांहीं जागीं अशी खडकाळ जमीन असते कीं, तेथें कितीहि पाऊस पडला तरी गवताचा एक अंकुरहि उगवत नाहीं. ८२ त्याचप्रमाणें देशाची शुद्धि-अशुद्धि आहे. तीच मी तुला सविस्तर सांगतों. जेथें कर्मानें कार्यसिद्धि होत नाहीं, तेथें कर्मच करूं नये. ८३ ज्या जागेंत काळ्या पाठीचीं हरिणें नसतात, ती जागा अपवित्र समजून तेथें कसलेंहि कर्म करण्याचा प्रयत्न करूं नये. ८४ ज्या देशांत ब्राह्मण नसतील तो देश अपवित्र समजावा. त्याचप्रमाणें जेथें निषिद्ध कर्म करणारे ब्राह्मण असतील, तोहि देश अशुद्धच समजावा ८५ किंवा जेथें ब्राह्मणांवर भक्ति नसून त्यांची उलट

तो देशू कर्माप्रती । जाण निश्चितीं अपवित्र ॥ ८६ ॥ जे देशीं कृष्णमृग असती । परी नाहीं भगवद्भक्ती । तो देशू कर्माप्रती । जाण निश्चितीं अपवित्र ॥ ८७ ॥ भक्तिहीन देश प्रसिद्ध । कीकट कलिंग मागध । तेथ स्वधर्म नव्हती शुद्ध । जाण अशुद्ध ते देश ॥ ८८ ॥ नाहीं उपलेप संमार्जन । ते स्वगृहीं भूमी अशुद्ध जाण । कां जेथ वेदबाह्य असज्जन । तेंही स्थान अपवित्र ॥ ८९ ॥ जे भूमी केवळ उखर । ते जाण सदा अपवित्र । आतां काळाचें काळतंत्र । पवित्रापवित्र सांगेन ॥ ९० ॥

कर्मण्यो गुणवान्कालो द्रव्यतः स्वत एव वा । यतो निवर्तते कर्म स दोषोऽकर्मकः स्मृतः ॥ ९ ॥

देश काळ द्रव्य पात्र । हे सामग्री होय स्वतंत्र । तोचि काळ अतिपवित्र । वेदशास्त्रसंमत ॥ ९१ ॥ ग्रहणकपिलाषष्ठ्यादिद्वारा । तो काळ परम पवित्र खरा । कां संतसज्जन आलिया घरा । काळाचा उभारा अतिपवित्र ॥ ९२ ॥ हो कां संपत्ती आलिया हाता । कां धर्मीं उल्हासा जेव्हां चित्ता । तो पुण्यकाळ तत्त्वतां । वेदशास्त्रार्थी अनुकूल ॥ ९३ ॥ पुरुषासी पर्वकाळ । जन्मांत जोडे एक वेळ । मातापित्यांचा अंतकाळ । ते धर्माची वेळ अतिपवित्र ॥ ९४ ॥ हा पर्वकाळ मागुता । पुरुषासी नातुडे सर्वथा । तेथ श्रद्धेनें धर्म करितां । पवित्रता अक्षय ॥ ९५ ॥ स्वभावें काळाची पवित्रता । तुज मी सांगेन आतां । जो परोपकारी सर्वथा । निजस्वार्था साधक ॥ ९६ ॥ ब्राह्म मुहूर्त तत्त्वतां । पवित्र जाण स्वभावतां । जो साधकांच्या निजस्वार्था । होय वाढविता अनुदिनीं ॥ ९७ ॥ काळाची अकर्मकता । ऐक सांगेन मी आतां । कर्म करूं नये स्वभावतां । निषिद्धता महादोषू ॥ ९८ ॥ जेथ जळस्थळादि सर्वथा । विहित द्रव्य न ये हाता ।

---

हेलना होत असेल, तोहि देश कर्माला अशुद्धच समजावा; ८६ किंवा ज्या प्रान्तांत कृष्णमृग आहेत, पण भगवद्भक्ति नाहीं तोहि देश कर्म करण्यास अपवित्रच समजावा. ८७ कीकट, कलिंग व मागध या देशांची भक्तिहीन म्हणून प्रसिद्धि आहे. ते देश अशुद्ध असल्यामुळें तेथें आचरिलेला स्वधर्म शुद्ध नसतो. ८८ जेथें सडा-संमार्जन नाहीं अशी आपल्या घरांतील जमीन सुद्धां अपवित्रच समजावी. किंवा वेदबाह्य आचरण करणारे दुर्जन जेथें रहातात तेंहि स्थान अपवित्रच मानावें. ८९ सदोदित ओसाड पडलेली जागाहि अपवित्रच समजावी. आतां काळामुळें उद्भवणारा पवित्र-अपवित्रपणा सांगतों, तो ऐक. ९०.

—आतां कालाची शुद्धि व अशुद्धि सांगतात—

द्रव्यतः स्वतः एव वा यः कर्मण्यः कालः स गुणवान्—द्रव्यसंपत्तीनें किंवा स्वतःच-स्वभावतःच जो पूर्वाह्णादि काल कर्माला योग्य असतो त्या कर्मामध्यें गुणवान्-प्रशस्त होय. यतः कर्म निवर्तते यः च अकर्मकः स्मृतः सः दोषः—ज्या कालीं द्रव्यादि सामग्री न मिळाल्यामुळें किंवा मानुषी व दैवी आपत्तींनीं राष्ट्राचा विप्लव झाल्यामुळें कर्म यथासांग होत नाहीं व सूतकादि निमित्तांनीं जो काल कर्माला अयोग्य म्हणून शास्त्रानें सांगितला आहे तो काल अशुद्ध होय. ९.

ज्या वेळीं देश, काल, द्रव्य, पात्र हीं सर्व सामग्री स्वतंत्रपणें प्राप्त होते, तीच वेळ पवित्र होय, असें वेदशास्त्राला संमत आहे. ९१ ग्रहण, कपिलाषष्ठी इत्यादि पर्वांचा काळ खरा पवित्र असतो; किंवा जेव्हां साधु-संत, सज्जन घरीं येतात, तो काळ अत्यंत पवित्र समजावा; ९२ किंवा अकल्पितपणें हातीं पुष्कळ द्रव्य आलें; किंवा कांहीं धर्मकृत्य करण्यास मन उत्सुक झालें तर तो पुण्यकाळ वेदशास्त्रासहि मान्य आहे. ९३ मनुष्याच्या सगळ्या जन्मांत एकदांच पर्वकाळ येत असतो. माता-पित्यांचा मरणकाळ ही धर्म करण्याची उत्तम संधि असते. ९४ असा पर्वकाळ पुनः कधीं प्राप्त होत नाहीं. त्या वेळीं श्रद्धेनें धर्म केला असतां कायमचा पवित्रपणा येतो. ९५ आतां काळाचा स्वाभाविक पवित्रपणा कसा असतो तो मी तुला सांगतों, ऐक. सर्वप्रकारें परोपकार करणारा व स्वतःला हितकर असा ९६ काळ म्हणजे ब्राह्ममुहूर्त—पहांट होय. ही वेळ स्वभावतःच पवित्र असते. हीच वेळ साधकाचें हित दिवसें-दिवस वाढवीत असते. ९७ आतां कर्म करण्यास अयोग्य असलेला काळ सांगतों ऐक. अशा वेळीं जाणून-बुजून कर्म करूं नये. कारण निषिद्ध काळीं कर्म केल्यानें मोठा दोष लागतो. ९८ ज्या वेळीं जल, स्थल किंवा

तो काळ अकर्मकता। जाण तत्त्वतां निश्चित ॥ ९९ ॥ जो काळ सूतकें व्यापिला। कां राष्ट्रा उपद्रव आला। जे काळीं देह परतंत्र झाला। तो काळ बोलिला अकर्मक ॥ १०० ॥ जो काळ दुर्भिक्षासी आला। जो कां ज्वरादि दोषीं दूषिला। काळ चोराकुलित झाला। तो काळ बोलिला अकर्मक ॥ १ ॥ जे काळीं क्रोध संचरला। जेथ तमोगुण क्षोभला। निद्राआलस्यें व्यापिला। तो काळ बोलिला अकर्मक ॥ २ ॥ अकस्मात् सुखसंपदा। कां अभिनव वार्ता एकदा। कां लंघिजे भल्याची मर्यादा। तो काळ सर्वदा अकर्मक ॥ ३ ॥ कां मार्गीं विषमता। पंथ क्रमिजे चालता। तेथ पडे दुर्धर्षता। तो काळ तत्त्वतां अकर्मक ॥ ४ ॥ जे काळीं द्रव्यलोभ दारुण। जे काळींचिंता गहन। जेव्हां विकल्पें भरे मन। तो काळ जाण अकर्मक ॥ ५ ॥ ऐशी काळाची अकर्मकता। तुज म्यां सांगीतली तत्त्वतां। आतां द्रव्याची शुद्धाशुद्धता। ऐक सर्वथा सांगेन ॥ ६ ॥

द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी च द्रव्येण वचनेन च। संस्कारेणाथ कालेन महत्त्वाल्पतयाऽथवा ॥ १० ॥

पुरुषें गोमूत्र सेवितां। तात्काळ पावे पवित्रता। तेंचि ताम्रपात्रें घेतां। ये अपवित्रता तत्काळ ॥ ७ ॥ पुरुषें जळ प्रोक्षितां। पुष्पासी ये पवित्रता। तें पुरुषें अवघ्राणितां। अपवित्रता पुष्पासी ॥ ८ ॥ अग्नीची सेवा करितां। द्विजासी परम पवित्रता। तोचि द्विज अग्नीनें जाळितां। ये अपवित्रता अग्नीसी ॥ ९ ॥ दर्भीं पिंड ठेवितां पवित्र। पिंडस्पर्शें दर्भ अपवित्र। ऐशी शुद्ध्यशुद्धी विचित्र। बोलिलें धर्मशास्त्र

---

विहित द्रव्यादि हातीं येत नसेल, तो काळ कर्म करण्यास अयोग्य समजावा. ९९ जेव्हां आपल्याला सुतक असेल किंवा राष्ट्रावर कांहीं संकट आलेलें असेल, किंवा आपला देह रोगादिकांनीं परतंत्र झाला असेल तो कालहि कर्म करण्यास योग्य नव्हे. १०० जेव्हां देशांत दुष्काळ पडला असेल, तापाची सांथ पसरली असेल, किंवा चोर दरोडेखोर यांचें प्राबल्य झालें असेल, तो काळ अपवित्र समजावा. १ किंवा ज्या वेळीं आपल्याला क्रोध आलेला असेल, तमोगुणाचा क्षोभ झालेला असेल, निद्रा-आळस यांनीं व्यापिलें असेल, तो काळ कर्म करण्यास योग्य नव्हे. २ अकस्मात् सुखसंपत्ति प्राप्त झाली किंवा कधीं न ऐकलेला चमत्कार घडला किंवा सज्जनांच्या मर्यादेचा भंग झाला तर ती वेळ कर्म करण्यास अयोग्य समजावी; ३ किंवा मार्गानें जात असतां वाटेंत कांहीं संकट येऊन त्यामुळें जीवावर बेतलें, तर तो काळहि कर्म करण्यास अनुकूल नाहीं; त्याचप्रमाणें मन विकल्पानें भरलेलें असेल तर तोहि काळ कर्म करण्यास योग्य नव्हे. ५ याप्रमाणें कर्माचा अनुकूल-प्रतिकूल काल मीं तुला सांगितला. आतां शुद्ध-अशुद्ध द्रव्याविषयीं सांगतों, ऐक. १०६.

—आतां सातव्या श्लोकांत वस्तुशब्दानें ज्यांचें ग्रहण केलें आहे त्या द्रव्यांची शुद्धि व अशुद्धि चार श्लोकांनीं सांगतात—

द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी द्रव्येण–द्रव्याची जलादि द्रव्यानें शुद्धि व मूत्रादिकांच्या योगानें अशुद्धि होते. वचनेन च–हें द्रव्य शुद्ध आहे कीं अशुद्ध असा संशय आला असतां ' शुद्ध आहे ' अशा प्रकारच्या ब्राह्मणवचनानें शुद्धि व ' अशुद्ध आहे ' अशा वचनानें अशुद्धि होते. संस्कारेण–प्रोक्षणादिकांच्या योगानें पुष्पादि द्रव्याची शुद्धि व वास घेणें इत्यादिकांच्या योगानें अशुद्धि, अथ कालेन–तसेंच ( दशाहादि कालेन– ) दहा दिवसांनीं नव्या जलादिकांची शुद्धि ( योग्यकालीं मेघोदक घ्यावें, पण त्याचें ग्रहण करितांनाहि तीन दिवस सोडावे; पण अकालीं दहा दिवस नवें जल घेऊं नये. त्यानंतर तें शुद्ध होतें, असें धर्मशास्त्राचें वचन आहे. ) शिळें अन्न अशुद्ध आहे. अथवा महत्त्वाल्पतया–अंत्यजादिकांनीं स्पर्श केलेल्या तडागादिकांत जल विपुल असेल तर तें शुद्ध व अल्प असेल तर अशुद्ध असें जाणावें. १०.

पुरुषानें गोमूत्र घेतलें असतां तो तत्काल पवित्र होतो. पण तेंच जर तांब्याच्या भांड्यांतून घेतलें तर लगेच अपवित्र होतें. ७ पुरुषानें पुष्पावर पाणी शिंपिलें असतां तीं पवित्र होतात, पण त्यांचा वास घेतांच तीं अपवित्र होतात. ८ ब्राह्मण अग्नीची सेवा केल्यानें पवित्र होतो; पण ब्राह्मणाचें दहन केलेला अग्नि अपवित्र होतो. ९ दर्भावर

श्रुत्यर्थें ॥ ११० ॥ जे वस्तु संशयापन्न । त्याच्या शुद्धीसी ब्राह्मणवचन । ज्याचें वचन प्रमाण । हरिहर जाण मानिती ॥ ११ ॥ घृतसंस्कारें शुद्ध अन्न । होमसंस्कारें नवधान्य । अग्निसंस्कारें लवण । पवित्र जाण शास्त्रार्थें ॥ १२ ॥ राकारापुढें मकार । मांडूनि करितां उच्चार । जिणोनि पापांचा संभार । होय तो नर शुद्धात्मा ॥ १३ ॥ त्याची मकारापुढें यकार । ठेवूनि करितां उच्चार । अंगीं आदळे पाप घोर । तेणें होय नर अतिबद्ध ॥ १४ ॥ रजस्वला शुद्ध चतुर्थेहनीं । मेघोदक शुद्ध तिसरे दिनीं । वृद्धिसूतक दहावे दिनीं । काळ शुद्धपणीं या हेतू ॥ १५ ॥ पूर्व दिवशींचें जें अन्न । तें काळेंचि पावे गा दूषण । ज्यासी आलें शिळेपण । तें अन्न जाण अशुद्ध ॥१६॥ तैसें नव्हे घृतपाचित । तें बहुत काळें तरी पुनीत । जें विटोनि विकारी होत । तें अपुनीत काळेंचि ॥ १७ ॥ जें सांचवणी अल्प जळ । त्यासी स्पर्शल्या चांडाळ । तें अपवित्र गा केवळ । नये अळुमाळ स्पर्श करूं ॥ १८ ॥ तेंचि निर्झर कां अक्षोभ जळ । तेथ स्पर्शल्याही चांडाळ । त्यासी लागेना तो विटाळ । तें नित्य निर्मळ पवित्र ॥ १९ ॥ अल्प केलिया स्वयंपाक । त्यासी जैं आतळे श्वान काक । तैं तें सांडावें निःशेख । अपवित्र देख तें अन्न ॥ १२० ॥ तोचि सहस्रभोजनाचा पाक । त्यासी आतळल्या श्वान काक । सांडावें जेथ लागलें मुख । येर अन्न निर्दोख भोजनीं ॥ २१ ॥

शक्त्याऽशक्त्याथवा बुद्ध्या समृद्ध्या च यदात्मने । अघं कुर्वन्ति हि यथा देशावस्थानुसारतः ॥११॥

---

पिंड ठेविला असतां तो पवित्र असतो; पण पिंडाचा स्पर्श होतांच तो दर्भ अपवित्र होतो. धर्मशास्त्रानें वेदानुसार अशी विचित्र शुद्धि-अशुद्धि सांगितली आहे. ११० जी वस्तु संशयित असते तिच्या शुद्धीला ब्राह्मणवचन पुरेसें असतें. कारण त्यांचें वचन सत्य असल्यामुळें तें हरि-हरांसहि मान्य असतें. ११ तुपानें अन्नशुद्धि होते. होमानें नवीन धान्यें शुद्ध होतात. अग्निसंस्कारानें मीठ शुद्ध होतें, असा शास्त्रार्थ आहे. १२ 'रा' या अक्षरापुढें 'म' हा वर्ण ठेवून 'राम' असा उच्चार करितांच मनुष्य सर्व पातकांच्या राशींना जिंकून शुद्धचित्त होतो. १३ पण 'म-' च्या पुढें 'द्य' ठेवून 'मद्य' हा शब्द उच्चारतांच मनुष्य घोर पातकानें बद्ध होतो. १४ रजस्वला स्त्री चवथ्या दिवशीं शुद्ध होते, पावसाचें पाणी तिसऱ्या दिवशीं शुद्ध होतें, वृद्धिसुतक दहाव्या दिवशीं निवृत्त होतें, असा शुद्धीचा काळ नेमलेला आहे. १५ आदल्या दिवशींच्या अन्नाला काळच दोषी करितो आणि तें शिळें म्हणून अशुद्ध मानितात. १६ पण तुपांत तळलेलें अन्न असलें तर त्याला दोष नाहीं. तें बरेच दिवसपर्यंत पवित्रच असतें. जें काळानें नासून जातें तें काळामुळेंच अपवित्र होतें. १७ थोड्याशा सांठवणीच्या पाण्याला चांडालानें स्पर्श केला असतां तें तत्काल अपवित्र होतें. त्याला क्षणभरहि स्पर्श करूं नये. १८ तेंच वहातें किंवा पुष्कळ पाणी असल्यास त्याला जरी चांडालाचा स्पर्श झाला, तरी त्याचा विटाळ होत नाहीं. तें पाणी नित्य निर्मलच असतें. १९ थोडासा स्वयंपाक शिजविलेला असला व त्याला कुत्रें किंवा कावळा शिवला तर तें अन्न अपवित्र समजून निःशेष टाकून द्यावें; १२० पण तेंच जर कां सहस्रभोजनाचें अन्न शिजलेलें असलें व त्याला कावळा किंवा कुत्रें शिवलें तर जेवढ्या अन्नाला त्याचें तोंड लागलें असेल तेवढेंच टाकावें. बाकीचें सर्व अन्न भोजनास अपवित्र होत नाहीं. १२१.

शक्त्या अशक्त्या—सूर्यग्रहणादि निमित्तानें प्राप्त झालेल्या सूतकांतील अन्न अशक्त, रोगी इत्यादिकांसाठीं शुद्ध आहे पण तेंच सशक्तांना अशुद्ध आहे, अथवा बुद्ध्या—किंवा पुत्रजननादिप्रसंगीं दहा दिवसानंतर तें कळल्यास शुद्धि व दशाहाच्या आंत कळल्यास अशुद्धि, समृद्ध्या—जीर्ण व मलिन झालेलें वस्त्र धनिकाला अशुद्ध व दरिद्राला शुद्ध, ( आतां त्यांविषयींहि विशेष सांगतात- ) एते आत्मने यद् अघं कुर्वन्ति तत् देशावस्थानुसारतः एव यथा कुर्वन्ति—हे द्रव्य, वचन इत्यादि पदार्थ आपल्याला द्रव्याच्या अशुद्धिद्वारां जें पाप करितात तें देश, अवस्था इत्यादिकांच्या अनुसारच यथासंभव करितात. [ सर्वत्र करीत नाहींत. जसें— निर्भय प्रदेशींच तें करितात, चोरादिकांनीं व्यापिलेल्या प्रदेशीं करीत नाहींत. तसेंच रोगादि-व्यतिरिक्त तारुण्यादि अवस्थांतच करितात, बाल्य—रोगादि अवस्थांत करीत नाहींत. कारण धर्मशास्त्रांत 'देश, काल, आपलें सामर्थ्य, द्रव्य, द्रव्याचें प्रयोजन, उपपत्ति व अवस्था यांचा विचार करून शुद्धीची योजना करावी' असें सांगितलें आहे. ]११

झालिया चंद्रसूर्यग्रहण । शक्तें स्नान न करितां दूषण । बाळक वृद्ध आतुर जन । न करितां स्नान दोष नाहीं ॥ २२ ॥ पुत्र जन्मलिया देख । स्वगोत्रज जे सकळिक । त्यांसी जाण आवश्यक । बाधी सूतक दहा दिवस ॥ २३ ॥ तेंचि स्थळांतरीं पुत्रश्रवण । सूतकाअंतीं झाल्या जाण । त्या सूतकाचें बंधन । न बाधी जाण सर्वथा ॥ २४ ॥ पूर्वदिनीं गोत्रज मरे । तें स्वगोत्रीं सूतक भरे । येरे दिवशीं दुसरा जैं मरे । तैं सूतकें सूतक उतरे दोहींचें ॥ २५ ॥ जेणें घेतलें होय विख । त्यासी सर्पू लाविलिया देख । तेणें विखें उतरे विख । तेवीं सूतकें सूतक निवारे ॥ २६ ॥ जें बुद्धिपूर्वक केलें आपण । तें अवश्य भोगावें पापपुण्य । जें बुद्धीसी नाहीं विद्यमान । तें अहेतुकपण बाधीना ॥ २७ ॥ आपुलें जें अंतःकरण । त्यासी पवित्र करी निजज्ञान । हे बुद्धीची शुद्धि जाण । विवेकसंपन्न वैराग्य ॥ २८ ॥ जो धनवंत अतिसंपन्न । त्यासी जुनें वस्त्र अपवान । शिविलें दंडिलें तेंही जाण । नव्हे पावन समर्था ॥ २९ ॥ तेंचि दुर्बळाप्रति जाण । अतिशयें परम पावन । हे वेदवाद अतिगहन । स्मृतिकारें जाण प्रकाशिलें ॥ १३० ॥ समर्थासी असाक्षभोजन । तें जाणावें अशुद्धान्न । दुर्बळासी एकल्या अशन । परम पावन श्रुत्यर्थें ॥ ३१ ॥ स्वयें न करितां पंचयज्ञ । भोजन तें पापभक्षण । सकळ सुकृतासी नागवण । जैं पराङ्मुखपण अतिथीसी ॥ ३२ ॥ स्वग्रामीं सर्वही स्वाचार । ग्रामांतरीं अर्ध आचार । पुरीं पट्टणीं पादमात्र । मार्गीं कर्मादर संगानुसारें ॥ ३३ ॥ विचारोनि देशावस्था । हे वेदमर्यादा तत्त्वतां । याहूनि अन्यथा करितां । दोष सर्वथा कर्त्यासी ॥ ३४ ॥ पाटव्य असतां स्वदेहासी । कर्म न करी तो महादोषी । रोगें व्यापिल्या शरीरासी । कर्मकर्त्यासी अतिदोषु ॥ ३५ ॥ पूर्वीं द्रव्यें द्रव्यशुद्धी । सांगीतली यथाविधी । तेंचि मागुतेनि प्रतिपादी । धर्मशास्त्रसिद्धी वेदोक्त ॥ ३६ ॥

---

चंद्र-सूर्यांच्या ग्रहणाच्या वेळीं निरोगी माणसांनीं स्नान न केल्यास त्याला दोष लागतो; पण तेंच लहान मूल, वृद्ध किंवा दुखणेकरी असल्यास त्यांना स्नान न करण्यानें दोष लागत नाहीं. २२ एखाद्याच्या कुळांत पुत्र जन्माला येतांच त्याच्या सर्व गोत्रजांना दहा दिवस सुवेर येतो. २३ परंतु परगांवीं पुत्र जन्म होऊन तें वृत्त उशीरां कानीं आल्यास सुवेराचें बंधन नाहीं. २४ आदल्या दिवशीं गोत्रांतील एखादा भाऊबंद मरण पावल्यास त्याचें सुतक असतें. परंतु दुसऱ्या दिवशीं लगेच दुसऱ्या एखाद्या गोत्रजाला मरण आल्यास पहिल्या सुतकांतच दुसरें सुतक फिटून जातें. २५ एखाद्यानें विष खाल्लें असल्यास त्याला सर्पदंश करवितांच तें विषानें विष जसें उतरतें, तसेंच एका सुतकांत दुसरें सुतक फिटतें. २६ आपण जें कर्म जाणून-बुजून आचरिलें असेल, त्याच्या पाप-पुण्याचें फल अवश्य भोगावें लागतें. पण तें कर्म अजाणतेपणें घडलें तर तें बाधत नाहीं. २७ अंतःकरणाला आत्मज्ञान पवित्र करितें व विवेकयुक्त वैराग्यानेंच चित्तशुद्धि होते. २८ धनवान् माणसानें जुनें वस्त्र वापरणें अपवित्र होय. त्यानें दंड भरलेलें किंवा शिवलेलें वस्त्र नेसणेंहि पवित्र नव्हे. २९ तेंच गरिबानें वापरल्यास त्याला दोष नाहीं. हें वेदाचें रहस्य फार गूढ आहे. तें स्मृतिकारांनींच स्पष्ट करून ठेविलें आहे. १३० पंक्तीला कोणी घेतल्यावांचून श्रीमंतानें भोजन करण्यांत वेदानें दोष सांगितला आहे. पण त्याच वेदानें गरिबाला एकटेंच जेवणें अत्यंत पावनकारक म्हटलें आहे. ३१ पंचमहायज्ञ न करितां भोजन करणें म्हणजे आपलें पातकच भक्षण करण्याप्रमाणें होय. ( सु. गी. ३–१३ पृ. ६२ ) अतिथीला भोजन न घालितां विमुख केलें असतां सर्व पुण्य नाहींसें होतें. ३२ आपल्या गांवांत रहात असतां सगळे आचार पाळावे. परगांवीं गेल्यास अर्धे आचार पाळावेत. एखाद्या शहरांत किंवा नगरांत गेल्यास तेथें एक चतुर्थांश आचार पाळावा आणि प्रवासांत मार्गांतील संगतीच्या लोकांप्रमाणें व्यवहार करावा. ३३ देशाचाराचा विचार करून वेदानें ही मर्यादा घालून दिली आहे. याप्रमाणें देशाचार व परिस्थिति यांच्या विरुद्ध वागणाराला अवश्य दोष लागतो. ३४ कर्म करण्यास शरीरसामर्थ्य असूनहि कर्म न करणारास जसा अतिशय दोष लागतो, ३५ त्याप्रमाणेंच शरीरव्याधीनें पीडिलें असतांहि कर्म करणारा भयंकर दोषी होतो. पूर्वीं द्रव्यानें द्रव्यशुद्धि सविस्तर सांगितलीच आहे. आतां त्याचेंच धर्मशास्त्रानुसार वेदोक्त प्रतिपादन करीत आहे. १३६.

धान्यदार्वस्थितन्तूनां रसतैजसचर्मणाम् । कालवाय्वाग्निमृत्तोयैः पार्थिवानां युतायुतैः ॥ १२ ॥

शूद्रप्रतिग्रहाचें धान्य । एकरात्रीं शुद्धत्व जाण । स्त्रुक्स्त्रुवादिकाष्ठभाजन । जलप्रक्षालनें शुद्धत्व ॥ ३७ ॥ व्याघ्रनख गजदंत । अपवित्र जंव स्नेहयुक्त । जेव्हां होती स्नेहातीत । अतिपुनीत ते काळीं ॥ ३८ ॥ पट्टतंतु स्वयें पुनीतू । वायूनें शुद्ध ऊर्णातंतू । वस्त्रतंतु जळाआंतू । होय पुनीतू प्रक्षाळिल्या ॥ ३९ ॥ गोक्षीर पवित्र कांस्यमृत्पात्रीं । तेंचि अपवित्र ताम्रपात्रीं । ताम्र पवित्र आम्लेंकरीं । आम्ल लवणांतरीं पवित्र ॥ १४० ॥ घृत पवित्र अग्निसंस्कारीं । अग्नि पवित्र ब्राह्मणमंत्रीं । ब्राह्मण पवित्र स्वाचारीं । पवित्रता आचारीं वेदविधी ॥ ४१ ॥ वेद पवित्र गुरुमुखें । गुरु पवित्र निजात्मसुखें । आत्मा पवित्र गुरुचरणोदकें । पवित्र उदकें द्विजचरणीं ॥ ४२ ॥ पृथ्वी पवित्र जळसंस्कारीं । जळ पवित्र पृथ्वीवरी । चर्म पवित्र तैलेंकरीं । तैल चर्मपात्रीं पवित्र ॥ ४३ ॥ व्याघ्रादि जें मृगाजिन । इयें स्वभावें पवित्र जाण । अग्निसंस्कारें सुवर्ण । पवित्र स्वभावें ॥ ४४ ॥ एवं इत्यादि परस्परीं । शुचित्व बोलिलें शास्त्रीं । आतां मळलिप्त झालियावरी । त्याचें अवधारीं शुचित्व ॥ ४५ ॥

अमेध्यलिप्तं यद्येन गन्धं लेपं व्यपोहति । भजते प्रकृतिं तस्य तच्छौचं तावदिष्यते ॥ १३ ॥

---

—द्रव्यादिकांनीं द्रव्याची शुद्धि होते. असें सांगितलें. त्यांतील वचनादिकांनीं होणारी शुद्धि एकरूपच असते; पण द्रव्यतः होणारी शुद्धि अनेकरूप आहे. यास्तव तिचाच अधिक विस्तार करितात—

धान्य-दारु-अस्थि-तंतूनां रस-तैजस-चर्मणां काल-वायु-अग्नि-मृत्-तोयैः—धान्याची शुद्धि जल व उष्णोदक यांनीं होते. हस्तिदंतादि अस्थींची शुद्धि कालानें होते. तंतूंची जलानें, तैल घृतादि रस व सुवर्णादि तैजस पदार्थांची शुद्धि अग्नीनें होते. चामड्याची शुद्धि तें वाळलें असतां होते. पार्थिवानां युतायुतैः—आणि रस्त्यांतील चिखल, घटादि मातीची भांडीं, विटा, इत्यादिकांची शुद्धि यथासंभव कालादि एक किंवा अनेक निमित्तांनीं होते. [ त्यांतहि कावळे, अंत्यज इत्यादिकांच्या संसर्गानें होणाऱ्या अशुद्धीचें तारतम्य पाहून व देश-काल-अवस्था इत्यादिकांचा विचार करूनच कालादि सर्व किंवा त्यांतील एकेकच यांच्या योगानें शुद्धि कल्पावी. ] १२.

शूद्रानें दान दिलेलें धान्य एका रात्रींत शुद्ध होतें. स्रुक, स्रुवा इत्यादि यज्ञांतील लांकडाचीं भांडीं पाणी शिंपडल्यानें शुद्ध होतात. ३७ वाघनख, हस्तिदंत इत्यादि जोंवर ताजें, ओलसर असतें, तोंवर तें अशुद्ध होय. तेंच एकदां वाळलें कीं, शुद्ध होतें. ३८ रेशमाचा धागा मुळचाच शुद्ध असतो. लोंकरीचें वस्त्र वाऱ्यावर ठेविलें असतां शुद्ध होतें व कापसाचें वस्त्र पाण्यानें धुतलें असतां शुद्ध होतें. ३९ काशाच्या किंवा मातीच्या भांड्यांत ठेविलेलें गायीचें दूध शुद्ध; पण तेंच तांब्याच्या भांड्यांत ठेविल्यानें अशुद्ध होतें. आंबट पदार्थानें तांबें स्वच्छ होतें व मिठानें आंबट पदार्थ शुद्ध होतो. १४० तूप अग्नीवर कढविल्यानें शुद्ध होतें. अग्नि ब्राह्मणाच्या मंत्रांनीं शुद्ध होतो. ब्राह्मण स्वधर्माचरणानें पावन होतो व धर्माचरण वेदविधीनें पवित्र ठरतें. ४१ वेद गुरुमुखानें पवित्र होतो. गुरु आत्मज्ञानानें पवित्र होतो. आत्मा ( जीव ) गुरूच्या चरणतीर्थानें पावन होतो. जल ब्राह्मणाच्या चरणानें पवित्र होतें. ४२ जलसंस्कारानें म्ह० सडा-संमार्जनानें पृथ्वी शुद्ध होतें व जल मातीनें शुद्ध होते. तेलानें कातडें पवित्र होतें व चामड्याच्या भांड्यांत ठेविल्यानें तेल शुद्ध होतें. ४३ व्याघ्रांबर, कृष्णाजिन इत्यादि कातडें मूळचेंच पवित्र असतें, असें समजावें. सोनें अग्नींत घातलें असतां स्वभावतःच पवित्र होतें. ४४ अशा प्रकारें परस्परावलंबी शुद्धि शास्त्रानें सांगितली आहे आतां अपवित्र झालेल्या वस्तूला शुद्ध करण्याचा प्रकार ऐक. १४५.

— अस्पृश्याचा स्पर्श झाला असतां शुद्धीचा प्रकार सांगून अशुद्ध पदार्थाचा लेप झाला असतां त्याच्या शुद्धीचाहि प्रकार सांगतात —

यत् अमेध्यलिप्तं येन गंधं लेपं व्यपोहति प्रकृतिं च भजते तस्य तत् तावत् शौचं इष्यते-पाट, पोळपाट वगैरे काष्ठाची वस्तु, पात्र, वस्त्र इत्यादि जें कांहीं ज्या तासणें, क्षार, आम्लोदक इत्यादि उपायानें गंध व लेप यांचा त्याग करितें व आपल्यांतील मल सोडून मूळ रूपाला प्राप्त होतें, त्याचें तेंच शौच होय. [ जितकें तासणें, धुणें इत्यादि केल्यानें त्यांतील अमंगलपणा जातो, तितकें तें तें करावें. म्ह० अमंगल झालेली वस्तु आपल्या पूर्व स्वरूपाला प्राप्त होईपर्यंत पूर्वोक्त उपाय करावेत. ] १३.

पात्र पीठ कां आसन। अमेध्यें लिप्त झाल्या जाण। त्या गंधाचें निःशेष क्षालन। तेणें पवित्रपण तयासी ॥ ४६ ॥ नाभी खालता ज्याच्या शरीरा। अमेध्य लेप लागल्या खरा। ते ठायींचा गंधू जाय पुरा। ऐसें धुतल्या त्या नरा शुचित्व लाभे ॥ ४७ ॥ नाभीवरतें अमेध्यलेपन। अवचटें झालिया जाण। तैं करावें मृत्तिकास्नान। तेणें पावन तो पुरुष ॥ ४८ ॥ मळ धुतल्या तत्काळ जाती। परी त्या गंधाची होय निवृत्ती। प्रकृति पावे जैं निजस्थिती। मळनिष्कृति त्या नांव ॥ ४९ ॥ बाह्य पदार्थ निवृत्तिनिष्ठें। वेद बोलिला या खटपटें। आतां कर्त्याचें शुचित्व प्रगटे। ते ऐक गोमटे उपाय ॥ १५० ॥

स्नानदानतपोवस्थावीर्यसंस्कारकर्मभिः। मत्स्मृत्या चात्मनः शौचं शुद्धः कर्माचरेद्द्विजः ॥ १४ ॥

गर्भादानादि अन्नप्राशन। ते बाल्यावस्था संपूर्ण। चौल तें कुमारावस्था जाण। ब्राह्मणपण उपनयनें ॥ ५१ ॥ कर्मभूमिकेलागीं स्नान। द्रव्यशुद्धीलागीं कीजे दान। वैराग्यालागीं तप जाण। कर्माचरण जडत्वत्यागा ॥ ५२ ॥ [ मद्भजनीं दृढ बुद्धि। त्या नांव जाण वीर्यशुद्धि। माझेनि स्मरणें चित्तशुद्धि। जाण त्रिशुद्धि उद्धवा ॥ ५३ ॥ ] ऐसऐसिया विधीं। ब्राह्मण जे कां सुबुद्धी। सबाह्य पावावया शुद्धी। वेद उपपादी स्वकर्में ॥ ५४ ॥

मन्त्रस्य च परिज्ञानं कर्मशुद्धिर्मदर्पणम्। धर्मः संपद्यते षड्भिरधर्मस्तु विपर्ययः ॥ १५ ॥

---

भांडें, ओटा, किंवा आसन यांस कांहीं अमंगल पदार्थ लागला तर तीं स्वच्छ धुवून त्याची दुर्गंधी जातांच शुद्ध होतात. ४६ एखाद्या मनुष्याच्या नाभीखालचा भाग अमंगल पदार्थानें लिप्त झाल्यास, तेवढा भाग स्वच्छ धुतल्यानें तो मनुष्य शुद्ध होतो; ४७ पण नाभीच्या वरच्या अंगास अमंगल पदार्थ लागल्यास त्याला माती लावून स्वच्छ स्नान केल्यानें मनुष्य पावन होतो. ४८ घाण धुवून टाकिली असतां तत्काल जाते; पण त्याचा दुर्गंध गेल्यावांचून स्वाभाविक शुद्धता येत नाहीं. यालाच 'मलाचें क्षालन' म्हणतात. ४९ बाह्य पदार्थांच्या अपवित्रपणापासून निवृत्त होण्यासाठीं वेदानें एवढी खटपट सांगितली आहे. आतां कर्त्याच्या शुचिर्भूतपणाचें उत्तम उपाय सांगतात, ते ऐक. १५०.

—याप्रमाणें द्रव्यशुद्धि सांगितली. आतां कर्त्याची शुद्धि सांगतात—

**स्नान-दान-तपःअवस्था-वीर्य-संस्कारकर्मभिः-मत्स्मृत्या च आत्मनः शौचं**—स्नान दान, तप कौमारादि अवस्था, शक्ति, उपनयनादिसंस्कार, संध्योपासन-दीक्षादिरूप कर्म व माझें स्मरण, यांच्या योगानें साहंकार कर्त्यांची यथासंभव त्या त्या कर्मानुसार शुद्धि होते. [ पण ही शुद्धि व्यवहारासाठीं नसून कर्मासाठीं आहे, असें सांगतात– ] **शुद्धः द्विजः कर्म आचरेत्**—याप्रमाणें शुद्ध झालेल्या ब्राह्मणांनीं व शूद्रादि इतरांनींहि कर्म आचरावें. १४.

जीवाचे गर्भधारणेपासून अन्नप्राशनापर्यंतचे सर्व संस्कार बाल्यावस्थेंत होतात. चौलादि संस्कार कुमारावस्थेंत होतात व उपनयानें तो द्विज होतो. ५१ कर्माचरणासाठीं स्नान करावें, द्रव्यशुद्धीसाठीं दान द्यावें व वैराग्यासाठीं तप करावें. आलस्यादि जाड्य जाण्यासाठीं कर्माचरण करावें. ५२ ( हे उद्धवा ! माझ्या भजनांत दृढ बुद्धि ठेविल्यानें पुरुषार्थप्राप्ति होते व माझ्या स्मरणानें चित्तशुद्धि होते, हें निश्चित जाण ) ५३ बुद्धिवान् ब्राह्मणानें अशा प्रकारें अंतर्बाह्य शुद्ध व्हावें, म्हणून वेदानें त्यास हीं स्वकर्में नेमून दिलीं आहेत. १५४.

—आतां मंत्रांची शुद्धि सांगतात—

**मंत्रस्य च परिज्ञानं**—सद्गुरुमुखानें मंत्राचें यथाशास्त्र सांगोपांग विनियोगासह परिज्ञान संपादन करणें ही मंत्राची शुद्धि आहे. ( कर्मशुद्धि सांगतात– ) **मदर्पणं कर्मशुद्धिः**—कर्म ईश्वरार्पण करणें हीच कर्माची शुद्धि आहे. ( धर्मादिकांसाठीं शुद्धि व अशुद्धि सविस्तर सांगून आतां उपसंहार करितात– ) **षड्भिः धर्मः संपद्यते**—देश, काल, द्रव्य, कर्ता, मंत्र व कर्म या सहा शुद्ध पदार्थांनीं धर्म सिद्ध होतो. **विपर्ययः तु अधर्मः**—पण या देशादिकांचा जो विपर्यय तो अधर्म म्ह० अधर्माचें कारण होय. १५.

मंत्रशुद्धि मंत्रार्थज्ञानें । कर्मशुद्धि ब्रह्मार्पणें । हें कर्त्यांचे शुद्धीकारणें । साही लक्षणें वेदू बोले ॥५५॥ देश काळ द्रव्यसंपन्नता । मंत्र कर्म निरुज कर्ता । या साहींच्या शुद्धावस्था । स्वधर्मतां फलोन्मुख ॥ ५६ ॥ जें द्रव्य पावे दीनाचे आर्ता । कां माझिया निजभक्तां । या नांव द्रव्यपवित्रता । जाण तत्त्वतां निश्चित ॥ ५७ ॥ धर्मशास्त्रार्थे शुद्ध धन । कष्टें मिळवूनियां जाण । धनलोभीं ठेविल्या प्राण । अवघेंचि जाण अशुद्ध ॥ ५८ ॥ या नांव द्रव्यशुद्धता । ऐक मंत्राची पवित्रता । जेणें मंत्रें पाविजे मंत्रार्था । शुद्ध सर्वथा तो मंत्र ॥ ५९ ॥ जेथ केलिया मंत्रग्रहण । अंगीं चढता वाढे अभिमान । कां जेथ जारण मारण उच्चाटण । ते मंत्र जाण अपवित्र ॥ १६० ॥ या नांव मंत्रशुद्धि जाण । ऐक कर्माचें लक्षण । जेणें कर्में तुटे कर्मबंधन । तें कर्माचरण अतिशुद्ध ॥ ६१ ॥ स्वयें करितां कर्माचरण । जेथ खवळे मोहाभिमान । कर्त्यासी लागे दृढबंधन । तें कर्म जाण अपवित्र ॥ ६२ ॥ जेणें कर्में कर्माचा निरास । तें शुद्ध कर्म सावकाश । जेथ समबुद्धि सदा अविनाश । तो पुण्यदेश उद्धवा । ६३ ॥ जरी सुक्षेत्रीं केला वास । आणि पराचे देखे गुणदोष । तो देश जाणावा तामस । कचुक नाश कर्त्यासी ॥ ६४ ॥ अन्य क्षेत्रीं देखिल्या दोष । त्याचा सुक्षेत्रीं होय नाश । सुक्षेत्रीं देखिल्या दोष । तो न सांडी जीवास कल्पांतीं ॥ ६५ ॥ जेथ उपजे साम्यशीळ । तो देश जाणावा निर्मळ । चित्त सुप्रसन्न जे वेळ । तो पुण्यकाळ साधकां ॥ ६६ ॥ स्वभावें शुद्ध ब्राह्ममुहूर्त । तेथही क्षोभल्या चित्त । तोही काळ अपुनीत । जाण निश्चित वेदार्थ ॥ ६७ ॥ येथ जो कां कर्मकर्ता । त्याची गेलिया कर्मअहंता । पुढें कर्म चाले स्वभावतां । हे पवित्रता कर्त्याची ॥ ६८ ॥ येथ म्हणे जो 'अहं कर्ता' । तो पावे अतिबद्धता । हे कर्त्याची अपवित्रता । देहअहंता अभिमानें ॥ ६९ ॥ धर्माधर्माचे साही प्रकार । हें

मंत्राच्या अर्थज्ञानानें मंत्रशुद्धि होते. ब्रह्मार्पण केल्यानें कर्मशुद्धि होते. कर्त्याच्या शुद्धीसाठींहि वेदानें सहा लक्षणें सांगितलीं आहेत. ५५ देश, काल, द्रव्य, मंत्र, कर्म आणि निरोगी कर्ता हीं सहा मुख्य साधनें शुद्ध असतील तरच स्वधर्माचें फल मिळतें. ५६ ज्या द्रव्याचा उपयोग अनाथ, दीन लोकांना संकटाच्या वेळीं होतो किंवा ज्या द्रव्याचा विनियोग माझ्या भक्ताकडे होतो तीच द्रव्याची खरी पवित्रता आहे, असें तूं जाण. ५७ स्वकष्टार्जित द्रव्य धर्मशास्त्रानुसार शुद्ध आहे; परंतु धनलोभानें त्यांत जीव गुंतलेला असल्यास तें सर्व धन अपवित्र होय. ५८ यालाच द्रव्याची शुद्धता म्हणतात. आतां मंत्राची पवित्रता ऐक. ज्या मंत्रानें मंत्राचा खरा अर्थ समजतो, तोच मंत्र शुद्ध होय. ५९ ज्या मंत्राचें ग्रहण करितांच अभिमान वाढतो, किंवा ज्या मंत्रानें जारण-मारण-उच्चाटन करितात ते मंत्र अपवित्र जाणावे. १६० यालाच मंत्रशुद्धि म्हणतात. आतां कर्माचें लक्षण ऐक. ज्या कर्मानें संसाराचें बंधन तुटतें तें अत्यंत शुद्ध कर्माचरण होय; ६१ परंतु स्वतः कर्म आचरीत असतां जेथें मोह-अभिमान खवळतो व त्यानें कर्त्याला दृढ बंधन प्राप्त होतें तें अपवित्र कर्म होय. ६२ ज्या कर्मानें प्रपंचाचा बंध नाहींसा होतो, तेंच शुद्ध कर्म होय. उद्धवा ! जेथें निरंतर समबुद्धि असते, तोच पुण्य देश समजावा ! ६३ चांगल्या पुण्य क्षेत्रांत राहून लोकांचे गुण-दोष पहात बसले तर तो देशहि तामस समजावा. तेथें कर्म केलें असतां कर्त्याचा अचुक नाश होतो. ६४ दुसऱ्या देशांतील गुण-दोष पहात बसल्यानें आपण रहातों त्या पुण्यक्षेत्रांतच आपला नाश होतो. उत्तम क्षेत्रांत दोषदृष्टि ठेविल्यास ती कल्पांतींहि जीवाला सोडीत नाहीं. ६५ जेथें मनांत ऐक्यभाव उत्पन्न होतो, तो देश पवित्र मानावा. ज्या वेळीं चित्त प्रसन्न होतें तेव्हांच साधकानें पुण्यकाळ समजावा. ६६ ब्राह्ममुहूर्त (म्ह० प्रातः-कालापूर्वीच्या सुमारें चार घटका) स्वभावतःच शुद्ध मानलेला आहे. परंतु त्या वेळींहि चित्तक्षोभ झाल्यास ती वेळ अपवित्र जाणावी. ६७ कर्म आचरणाऱ्या कर्त्याचा 'मी कर्मकर्ता' हा अभिमान जाऊन स्वभावतःच सर्व कर्म होऊं लागलें म्हणजे तीच त्याची पवित्रता होय. ६८ परंतु जो 'मी कर्ता' असें म्हणतो, तो अतिशय बद्ध होतो, देह-अहंतेचा अभिमान ठेवणारा कर्ता अपवित्र होय. ६९ धर्म-अधर्माचे हे सहा प्रकार वेदार्थाचें सार आहेत. या

वेदार्थाचें तत्त्वसार । येही धर्मीं मुक्त होय नर । अधर्मीं अपवित्र अतिबद्ध ॥ १७० ॥ गुणदोषांचें लक्षण । सांगतां अतिगहन । येथ गुंतले सज्ञान । अतिविचक्षण पंडित ॥ ७१ ॥

क्वचिद्गुणोऽपि दोषः स्याद्दोषोऽपि विधिना गुणः । गुणदोषार्थनियमस्तद्भिदामेव बाधते ॥ १६ ॥

ज्याचा मानिजे उत्तम गुण । तोचि दोष होय परतोन । एवं कर्मचि कर्मासी जाण । दोष दारुण उपजवी ॥ ७२ ॥ कर्मीं मुख्यत्वें गा आचमन । हें कर्मशुद्धीचें निजकारण । तेंचि दक्षिणाभिमुखें केल्या जाण । दोष दारुण उपजवी ॥ ७३ ॥ कानींचि जेणें जाय तिडिक । तेंचि मुखें घालितां देख । होय अत्यंत बाधक । प्राणांतिक पावती बाधा ॥ ७४ ॥ आचमनीं माषमात्रजीवन । घेतल्या होईजे पावन । तेंचि अधिक घेतां जाण । सुरापानासम दोष ॥ ७५ ॥ फणस खातां लागे गोड । तें जैं अधिक खाय तोंड । तैं शूळ उठे प्रचंड । फुटे ब्रह्मांड अतिव्यथा ॥ ७६ ॥ सूर्यपूजनीं पुण्य घडे । तेथ जैं बेलपत्र चढे । तैं पुण्य राहे मागिलीकडे । दोष रोकडे पूजकां ॥ ७७ ॥ ऐसा कर्मीं कर्मविन्यास । गुण तोचि करी दोष । कोठें दोषांचाही विलास । पुण्य बहुवस उपजवी ॥ ७८ ॥ चोराकुलित मार्गीं जाण । ब्राह्मण करितां प्रातःस्नान । तो नेतां कर्म त्यागून । दोषचि परी गुण गंभीर होय ॥ ७९ ॥ सर्पगरळेचें जीवन । ब्राह्मणें करितां प्राशन । तें पात्र घेतां हिरोन । दोष परी गुण गंभीर होय ॥ १८० ॥ गृहस्थासी अग्निहोत्र गुण । तोचि संन्याशासी अवगुण । ब्राह्मणीं विहित वेदमंत्रपठण । शूद्रासी जाण तो दोष ॥ ८१ ॥ विषयनिवृत्तीलागीं सुगम । गुणदोषांचा केला नेम । नेणोनि वेदाचें वर्म । विषयभ्रम

---

धर्मांनीं पुरुष मुक्त होतो व अधर्मांनीं अपवित्र व अतिबद्ध होतो. १७० गुण दोषांचें लक्षण अत्यंत गहन आहे. त्यांत मोठे ज्ञानी व कुशल पंडितहि गोंधळून जातात. १७१.

—हा गुण-दोषविभाग नियत नाहीं असें आतां सांगतात—

**क्वचित् गुणः अपि दोषः स्यात्**—आपत्ति इत्यादि प्रसंगीं प्रतिग्रह जरी गुण असला तरी आपत्ति नसतांना त्याचा निषेध केलेला असल्यामुळें तो दोष होतो. परधर्म पराला गुणरूप असला तरी याला तो दोष होतो. **दोषः अपि विधिना गुणः**—कुटुंबत्यागादि हा जरी दोष असला तरी विधिबलानें विरक्तादिकांना तो दोष नाहीं, तर गुणच आहे. **गुणदोषार्थनियमः तद्भिदां एव बाधते**—हा जो गुण व दोष यांचा एका अर्थीं नियम किंवा गुण-दोषासाठी जें हें नियामकशास्त्र तें त्यांच्या भेदाचाच बाध करितें. १६.

एखादा उत्तम गुण समजावा तर तोच पुनः उलटून दोष ठरतो, याप्रमाणें कर्मच कर्मामध्यें दोष उत्पन्न करवीत असतें. ७२ धार्मिक कर्मांत मुख्य आचमन सांगितलेलें आहे. तें कर्म शुद्धीचें मूळ कारण आहे; परंतु तेंच जर दक्षिणेकडे तोंड करून घेतलें तर दारुण दोष लागतो. ७३ ज्या औषधानें कानाच्या ठणका बऱ्या होतात, तेंच औषध जर तोंडांत घातलें तर त्यानें अतिशय क्लेश होतात व प्राणान्तिक वेदना सोसाव्या लागतात. ७४ उडीद बुडेल इतक्या पाण्याचें आचमन केलें असतां तें पावन करितें, पण तेंच त्याहून अधिक पाणी घेतलें असतां मद्यपानाचा दोष लागतो. ७५ किंवा फणस खावयास गोड लागतो; पण तोच जर कां बेसुमार खात सुटलें तर असा भयंकर पोटशूळ उठतो कीं, त्या व्यथेनें ब्रह्मांड आठवतें. ७६ सूर्याची पूजा केली असतां पुण्य घडतें. पण त्याला जर कां बेलाचें पान वाहिलें तर पुण्याऐवजीं पूजा करणाराला नेमकें पातक लागतें. ७७ असा कर्मांतच कर्मांचा भिन्न प्रकार आहे. गुणच दोष ठरतो. कोठें कोठें दोषापासूनहि पुष्कळ पुण्य उत्पन्न होतें. ७८ चोरांनीं युक्त असलेल्या मार्गांत ब्राह्मणाला प्रातःस्नान करूं न देतां तें कर्म सोडवून तसेंच पुढें नेलें तर त्यांत दोष नसून पुण्यच आहे. ७९ सर्पाचें गरळ पडलेलें पाणी कोणी पीत असल्यास त्याच्या हातचें तें पाण्याचें भांडें हिसकावून घेण्यांत दोष नसून तो उत्कृष्ट गुणच ठरतो. १८० अग्निहोत्र गृहस्थाला भूषण आहे, पण तेंच संन्याशाला दूषण आहे. ८१ वेदमंत्रांचें पठण हा ब्राह्मणाचा विहित धर्म आहे. पण तेंच शूद्रानें केल्यास त्याला त्यांत दोष आहे. याप्रमाणें मनुष्यानें विषयांपासून निवृत्त व्हावें, म्हणून वेदानें हे गुणदोषाचे नियम करून ठेविले आहेत. परंतु त्याचा खरा

भ्रांतासी ।। ८२ ।। जंव भ्रांति तंव कर्मप्रवृत्ती । तेथ गुणदोषांची थोर ख्याती । जेवीं कां खद्योत लखलखिती । आंधारे रातीं सतेज ।। ८३ ।। तेवीं गुणदोषामाजीं जाण । अवश्य अंगीं आदळे पतन । तोचि अर्थीचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ८४ ।।

समानकर्माचरणं पतितानां न पातकम् । औत्पत्तिको गुणः सङ्गो न शयानः पतत्यधः ॥ १७ ॥

स्वकर्मे पतित जाहले जाण । डोंब भिल्ल कैवर्तक जन । त्यांसी मद्यपानादि दोषीं जाण । नाहीं पतन पतितांसी ।। ८५ ।। जें नीळीमाजीं काळें केलें । त्यासी काय बाधावें काजळें । कां अंधारासी मसीं माखिलें । तेणें काय मळलें तयाचें ।। ८६ ।। जो स्वभावें जन्मला चांडाळ । त्यासी कोणाचा बाधी विटाळ । हो काळें करावें काजळ । ऐसें नाहीं बळ कवणासी ।। ८७ ।। निर्जीवा दीधलें विख । तेणें कोणासी द्यावें दुःख । तेवीं पतितासी पातक । नव्हे बाधक सर्वथा ।। ८८ ।। जो केवळ खालें निजेला । त्यासी पडण्याचा भेवो गेला । तेवीं देहाभिमानें जो आला । तो नीचाचा झाला अतिनीच ।। ८९ ।। रजतमादि गुणसंगीं । जो लोलंगत विषयांलागीं । त्यासी तिळगुळादि कामभोगीं । नव्हे नवी आंगीं देहबुद्धी ।। १९० ।। जो कनकबीजें भुलला । तो गाये नाचे हरिखेला । परी संचितार्थ चोरीं नेला । हा नेणेचि आपुला निजस्वार्थ ।। ९१ ।। तेवीं देहाभिमानें उन्मत्त । अतिकामें कामासक्त । तो नेणे बुडाला निजस्वार्थ । आपुला अपघात देखेना ।। ९२ ।। ज्यासी चढला विखाचा बासटा ।

---

अर्थ न जाणल्यामुळें भ्रांत लोकांना विषयांचा भ्रम होतो. ८२ जोंवर भ्रम असतो, तोंवर कर्मप्रवृत्ति असते व अंधाऱ्या रात्रीं काजवे जसे लुकलुकत असतात, ८३ त्याप्रमाणें तेथें गुण-दोषांचें मोठें अवडंबर असतें. गुण-दोषांमध्यें अधःपात अवश्य होतो. याच अर्थाचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. १८४.

—कांहीं प्रसंगी दोषाला दोषत्व नसून गुणत्वच कसें असतें याविषयीं उदाहरण—

**समान कर्माचरणं पतितानां न पातकं**—सुरापानादि, याच समान कर्माचें आचरण करणें हें अपतितांच्या पतनाला जरी कारण होत असलें, तरी जन्मानें व कर्मानें पतित झालेल्यांना तें अधिक पतित करीत नाहीं. [ कारण तो पूर्वींच पतित झालेला असतो, त्यामुळें त्याच्या ठिकाणीं दोषालाहि दोषत्व नाहीं. ] **संगः औत्पत्तिकः गुणः**—त्याचप्रमाणें विषयासक्ति हा यतींना जरी दोष असला तरी पूर्वींच स्वीकारिलेला असल्यामुळें गृहस्थांना तो दोष नाहीं, गुणच आहे. [ कारण ऋतुकालीं भार्यागमन करावें असें विधान आहे. या दोहोंविषयीं दृष्टान्त— ] **अधः शयनाः न पतति**—अगोदरच भूमीवर निजणारा खालीं पडत नाहीं. १७.

महार, भिल्ल, कोळी हे आपल्या कर्मानेंच पतित झालेले आहेत. त्या पतितांना मद्यपानादि दोष लागत नाहीं. कारण पतितांनाच पुनः पतन नाहीं. ८५ एकदां निळींत बुडवून काळें केलेल्या वस्त्राला काजळ आणखी जास्त काळें तें काय करणार ! किंवा अंधकाराला काजळानें माखिलें तर तो कांहीं अधिक काळा थोडाच होणार आहे ! ८६ त्याचप्रमाणें जो जन्मतांच चांडाळ आहे, त्याला कोणाचा विटाळ बाधणार ! अहो ! काजळाला जास्त काळें करण्याचें सामर्थ्य कोणालाहि नसतें ! ८७ मृत देहाला विष पाजिलें तर त्यानें त्याला कसलें दुःख होणार ! त्याचप्रमाणें पतिताला पातक बाधत नाहीं. ८८ जो मनुष्य भूमीवरच निजलेला असतो, त्याला पडण्याची जशी भीति नसते, तसाच जो देहाभिमान ठेवितो तो नीचाहूनहि नीच होतो. ८९ रज-तमादि गुणामुळें जो विषयासक्त होतो त्याला तीळ-गुळासारखा सामान्य पदार्थ खाण्यासाठीं नवीन देहबुद्धि धारण करावी लागत नाहीं. १९० एखादा मनुष्य धोतऱ्याचें बीं खाऊन त्याच्या निशेंत गातो, नाचतो व मोठी मजा करीत असतो, पण इकडे सांठविलेलें धन चोरानें लुटून नेलें तरी त्याला त्याचा पत्ताहि नसतो. ९१ त्याप्रमाणें देहाभिमानानें अति उन्मत्त झालेला मनुष्य विषयासक्त होतो व आपला खरा स्वार्थ बुडालेला पहात नाहीं व आपली हानि झालेली त्याला कळत नाहीं. ९२ विष चढलेल्या माणसाला जशी डुकराची विष्ठा पाजतात,

त्यासी पाजावी सूकरविष्ठा । तेवीं अतिकामी पापिष्ठा । म्यां स्वदारानिष्ठा नेमिली ॥ ९३ ॥ ज्यासी विख चढलें गहन । त्यासी सुकरविष्ठेचें अनुपान । हें ते काळींचें विधान । स्वयें सज्ञान बोलती ॥ ९४ ॥ तेवीं जेथवरी स्त्रीपुरुषव्यक्ती । तेथवरी स्वेच्छा कामासक्ती । त्याची करावया निवृत्ती । स्वदारास्थिति नेमिली ॥ ९५ ॥ वेदें निरोपू दिधला आपण । तें दिवारातीं स्वदाराग्मण । तेंही वेदें नेमिलें जाण । स्वदारागमन ऋतुकाळीं ॥ ९६ ॥ तेथ जन्मलिया पुत्रासी । 'आत्मा वै पुत्रनामासी' । येणें वेदवचनें पुरुषासी । स्त्रीकामासी निवर्तवी ॥ ९७ ॥ निःशेष विष उतरल्यावरी । तो सुकरविष्ठा हातीं न धरी । तेवीं विरक्ति उपजल्या अंतरीं । स्वदारा दूरी त्यागिती ॥ ९८ ॥ यापरी विषयनिवृत्ती । माझ्या वेदाची वेदोक्ती । दावूनि गुणदोषांची उक्ती । विषयासक्ती सांडवी ॥ ९९ ॥

यतो यतो निवर्तेत विमुच्येत ततस्ततः । एष धर्मो नृणां क्षेमः शोकमोहभयापहः ॥ १८ ॥

माझिया वेदाचें मनोगत । विषयीं व्हावें निवृत्त । यालागीं गुणदोष दावित । विषयत्यागार्थ उपावो ॥ २०० ॥ एकाएकीं सकळ विषयांसी । त्याग न करवे प्राण्यासी । यालागीं निषेधें निंदूनी त्यासी । शनैः शनैः विषयांसी त्यागवी ॥ १ ॥ जैं जैं विषयांची निवृत्ती । तैं तैं निजसुखाची प्राप्ती । पूर्ण बाणल्या विरक्ती । साधक होती मद्रूप ॥ २ ॥ मद्रूपतेचिये प्राप्ती- । आड असे विषयासक्ती । ते झालिया विषयनिवृत्ती । साधक होती मद्रूप ॥ ३ ॥ जेथ माझिया स्वरूपाची प्राप्ती । तेथ निःशेष निमे अहंकृती । तेव्हां शोकमोहेंसीं होय सती । जाण निश्चितीं अविद्या ॥ ४ ॥ अविद्यानाशासवें जाण । नासती जन्मभाव दारुण । तेव्हां मरणासीच ये मरण । हारपे जीवपण जीवाचें ॥ ५ ॥ अविद्या निमाल्या जीवेंसीं । ठावो नाहीं भवभयासी । जेवीं सबळबळें अंधारेंसीं । नुरेचि निशी

---

त्याप्रमाणें कामासक्त पातकी लोकांसाठीं मी पत्नीव्रताची मर्यादा घालून दिली आहे. ९३ कारण विष भिनलेल्या माणसाला डुकराची विष्ठा हेंच योग्य अनुपान जसें स्वतः शास्त्रज्ञांनीं सांगून ठेविलें आहे, ९४ त्याप्रमाणें जोंवर स्त्री व पुरुष या दोन जाती आहेत तोंवर ते स्वेच्छेनें कामासक्त असणारच, हें जाणून वेदानें त्यांना स्वेच्छाचरणापासून निवृत्त करण्यासाठीं स्वपत्नीधर्माचा नियम करून ठेविला आहे. ९५ वेदानें स्वस्त्रीगमनाची आज्ञा देतांच लोक रात्रं-दिवस त्यांत आसक्त होऊन रहातील, म्हणून वेदानेंच ऋतुकालाचा निर्बंध घातला आहे, ९६ त्याचप्रमाणें 'आत्मा वै पुत्रनामासि' या श्रुतिवचनानें पुरुषाला पुत्र झाल्यावर स्त्रीसंगापासून निवृत्त होण्यास सांगितलें आहे. ९७ विषाचा अंमल पूर्णपणें उतरल्यावर मग तो मनुष्य डुकराच्या विष्ठेला जसा स्पर्शहि करीत नाहीं, त्याप्रमाणें पुरुषाच्या मनांत विरक्ति उत्पन्न झाली म्हणजे तो स्वस्त्रीपासूनहि निवृत्त होतो. ९८ याप्रमाणें माझा वेद लोकांना विषयनिवृत्त होण्यासाठीं त्यांतील गुण-दोष दाखवून वेदाज्ञेनें विषयासक्तीचा त्याग करवितो. १९९.

—यास्तव गुण-दोषनियमविधीचें प्रवृत्तिसंकोचद्वारा निवृत्तीतच तात्पर्य असतें; अशा अभिप्रायानें भगवान् म्हणतात—यतः यतः निवर्तेत—ज्या-ज्यापासून निवृत्त होतो, ततः ततः विमुच्येत—त्या-त्यापासून तो मुक्त होतो. एषः नृणां क्षेमः शोक–मोह भयापहः धर्मः—हा मनुष्यांचा क्षेमकर आणि शोक, मोह व भय घालविणारा धर्म आहे. १८.

विषयांपासून निवृत्त व्हावें हा माझा वेदाचा हेतु आहे. त्यासाठींच तो विषयत्यागाचा उपाय म्हणून त्यांतील गुण-दोष दाखवितो. २०० मनुष्याला सर्व विषय एकदम टाकवत नाहींत. म्हणून वेद त्यांतील दोष दाखवून त्यांची निंदा करून हळूहळू विषयांचा त्याग करवितो. १ जशी जशी विषयांची निवृत्ति होते, तशी तशी आत्मज्ञानाची प्राप्ति होते आणि साधकाच्या मनांत विरक्ति पूर्णपणें ठसली कीं, तो मद्रूप होतो. २ विषयासक्ति माझ्या प्राप्तीच्या आड येत असते. यास्तव विषयनिवृत्ति झाली कीं, साधक तत्काल मद्रूप होतो. ३ एकदां आत्मस्वरूपाला प्राप्त झालें कीं, अहंकार निःशेष मावळतो. त्यावेळीं शोक-मोहासह अविद्या अहंकाराबरोबर सती जाते. ४ आणि अविद्येचा नाश झाला कीं, दारुण जन्मभाव नाहींसा होतो. मरणालाच मरण येतें व जीवाचा जीवपणा निघून जातो. ५ सूर्योदय होतांच गाढ अंधकारासह रात्र जशी पळ काढिते, त्याप्रमाणें अविद्येचा नाश होतांच संसारभयाला

दिनोदयीं ॥ ६ ॥ जेवीं कां मृगजळाचा पूर । न साहे दृष्टीचा निर्धार । तेवीं भवभयेंसीं संसार । झाला साचार वाउगा ॥ ७ ॥ प्राणी पावावया कल्याण । हें वेदोक्त स्वधर्माचरण । विषयत्यागालागीं जाण । केलें निरूपण गुणदोषां ॥ ८ ॥ जे साच वेदार्थातें नेणती । ते वेदा प्रवृत्तिपर म्हणती । परी वेदें द्योतिली विरक्ती । विषयासक्तिच्छेदक ॥ ९ ॥ वेदोक्त स्वधर्मस्थितीं । होय विषयांची विरक्ती । प्राणी निजमोक्ष पावती । हे वेदोक्ती पैं माझी ॥ २१० ॥ सांडोनियां वेदस्थिती । केवळ विषयांची आसक्ती । प्राणी अतिदुःख पावती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ११ ॥ प्रवृत्ति तितुकी अनर्थहेतू । येचि अर्थीचा वृत्तान्तू । चौं श्लोकीं श्रीभगवंतू । असे सांगतु उद्धवा ॥ १२ ॥

विषयेषु गुणाध्यासात्पुंसः सङ्गस्ततो भवेत् । सङ्गात्तत्र भवेत्कामः कामादेव कलिर्नृणाम् ॥ १९ ॥
कलेर्दुर्विषहः क्रोधस्तमस्तमनुवर्तते । तमसा ग्रस्यते पुंसश्चेतना व्यापिनी द्रुतम् ॥ २० ॥

विषयांचें गोडपण । सदा ध्याय ज्याचें मन । त्यासी विषयासक्ति जाण । अतिगहन उल्हासे ॥ १३ ॥ विषयासक्तीचा संभ्रम । तेथ निर्लज्ज खवळे काम । कामास्तव अतिविषम । सोशी दुर्गम उपाय ॥ १४ ॥ विषयकामार्थ जे उपाय । त्यांसी पदीं अपाय । जेव्हां विषयकामासिद्धि न होय । तेव्हां महाकलहें विवादू ॥ १५ ॥ जेथ अतिजल्पाचा विवाद । तेथ खटाटोपेंसीं सन्नद्ध । खवळला उठी क्रोध । अतिविरुद्ध दुर्धर ॥ १६ ॥ क्रोध खवळल्या दारुण । बुद्धीचें तत्काळ नासे ज्ञान । तेव्हां विवेकाचें प्राशन । करिजे जाण महामोहें ॥ १७ ॥ विवेकाचें लोपल्या भान । स्तब्ध चेतना होय जाण । तेव्हां कार्याकार्य आठवण । हेंही स्मरण बुडालें ॥ १८ ॥

---

कोठेंच थारा मिळत नाहीं. ६ दृष्टि निश्चित्त झाल्यावर मृगजळाचा पूर जसा टिकाव धरीत नाहीं, त्याप्रमाणें अविद्येच्या नाशाबरोबर भवभयासह संसार मिथ्या होतो. ७ जीवाचें कल्याण होण्यासाठीं हें वेदोक्त धर्माचरण सांगितलें आहे. विषयात्यागासाठींच गुण-दोषांचें निरूपण केलें आहे. ८ ज्यांना वेदाचा खरा अर्थ कळत नाहीं, ते वेदाला प्रवृत्तिपर व कर्ममार्ग दाखविणारा म्हणतात; परंतु वेदानें वास्तविक विषयासक्तीचा छेद करणारी विरक्तीच प्रतिपादन केली आहे. ९ वेदाज्ञेप्रमाणें स्वधर्माचरण केल्यानें विषयांची विरक्ति येऊन जीव मोक्षाला प्राप्त होतात. हीच माझी खरी वेदोक्ति आहे. २१० वेदाज्ञा न मानितां केवळ विषयासक्त झाल्यानें मनुष्याला अतिशय दुःख भोगावें लागतें. ११ तोंहि मी सांगतों, ऐक. सर्व प्रवृत्ति अनर्थकारक आहे, या अर्थाचें निरूपण पुढील चार श्लोकांनीं भगवान् उद्धवाला सांगत आहे. २१२.

——वेद यथाश्रुत प्रवृत्तिपर आहे या मताचें निराकरण करण्यासाठीं पुढील चार श्लोकांनीं भगवान् प्रवृत्तिमार्गाचें अनर्थहेतुत्व दाखवितात——

विषयेषु गुणाध्यासात् पुंसः ततः संगः भवेत्—विषयांमध्यें गुणांचा आरोप केल्यामुळें पुरुषाची त्यांवर आसक्ति जडते. तत्र संगात् कामः भवेत्—त्या विषयांच्या आसक्तीमुळें त्यांची इच्छा होते. कामात् एव नृणां कलिः ( भवेत् )—आणि ती इच्छा पूर्ण होण्यांत अडथळा करणाऱ्या बरोबर मनुष्याचा कलह होतो. कलेः दुर्विषहः क्रोधः—कलहामुळें तीव्र क्रोध उत्पन्न होतो. तमः तं अनुवर्तते—त्या क्रोधाला मोह अनुसरतो. तमसा पुंसः व्यापिनी चेतना द्रुतं ग्रस्यते—आणि मोहाकडून पुरुषाची कार्य-अकार्याविषयींची स्मृति तत्काल ग्रासली जाते. १९-२०.

ज्याचें मन निरंतर विषयांच्या गोडीचेंच ध्यान करीत असतें त्याच्या मनांत प्रबल विषयासक्ति उत्पन्न होते. १३ विषयासक्तीचा अंमल बसला कीं, निर्लज्ज काम खवळलाच म्हणून समजावें. मग त्या कामासाठीं पुरुष अत्यंत दुर्घट उपाय योजितो. १४ त्यांत क्षणोक्षणीं विघ्नें येतात व विषयवासना पूर्ण झाली नाहीं कीं, भयंकर कलह उत्पन्न होतो. १५ जेथें जल्परूप वाद-विवाद चालतो, तेथें त्यांस साहाय्य करण्यास क्रोध खवळून उठतो. १६ असा क्रोध एकदां चवताळला कीं, बुद्धीचें ज्ञान नाहींसें होतें व महामोह विवेकाला गिळून टाकितो. १७ विवेकाचेंच भान हरपलें कीं, बुद्धि कुंठित होते व तिला कर्तव्यअकर्तव्याचा साफ विसर पडतो. २१८.

तया विरहितः साधो जन्तुः शून्याय कल्पते । ततोऽस्य स्वार्थविभ्रंशो मूर्च्छितस्य मृतस्य च ॥ २१ ॥

**विवेकशून्य स्तब्धवत । तेथ विषयो ना परमार्थ । न कळे सन्मार्गपंथ । आत्मघात पदोपदीं ॥ १९ ॥ केवळ जड मूढ होउनी । जेवीं कां मूर्च्छित प्राणी । तैसेपरी स्तब्ध होऊनि । अज्ञानपणीं श्रमला ॥ २२ ॥ यापरी जीत ना मेला । जड मूढ होऊनि ठेला । थित्या निजस्वार्था मुकला । अंगीं वाजला अनर्थू ॥ २१ ॥**

विषयभिनिवेशेन नात्मानं वेद नापरम् । वृक्षजीविकया जीवन् व्यर्थं भस्त्रेव यः श्वसन् ॥ २२ ॥

**एवं विषयांचे आसक्तीं । तमोगुणें ग्रासिली वृत्ती । तेव्हां एकही स्फुरेना स्फूर्ती । मी कोण हें चित्तीं स्फुरेना ॥ २२ ॥ ऐसा भ्रमें भुलला प्राणी । जैसा उन्मत्त मदिरापानी । त्यासी स्मरणाची विस्मरणी । भ्रमिस्त मनीं पडिला ॥ २३ ॥ कां विषमसंधीचा ज्वरू । तेणें ज्वरें हुंबरे थोरू । त्यासी नावडे आपपरू । वृथा विकारू बडबड करीं ॥ २४ ॥ फांटा फुटलियावरी । भलतेंचि स्मरण करी । तया नाठवे कांहीं ते परी । प्राणी अघोरीं पडले जाण ॥ २५ ॥ कां झालिया भूतसंचार । प्राणी हुंबरे हुंहुंकार । पडिला चित्तासी विसर । म्हणे मी कुकर म्हणोनी भुंके ॥ २६ ॥ ऐसें जीविके नेणोनि प्राणी । घाबरे जैसा स्वप्नीं । म्हणे मी पडलों रणीं । ऐसे प्राणी स्वप्नीं भुलले ॥ २७ ॥ तैशी भुली लटकी भुलवणी । काममोहें व्यापिले प्राणी । जडमूढपण ठाकूनी । अंतःकरणीं वेडावले ॥ २८ ॥ मुक्यानाकीं**

---

साधो—हे सज्जना, तया विरहितः जंतुः शून्याय कल्पते—कार्याकार्यस्मृतीनें रहित असलेला प्राणी नसल्यासारखाच होतो. ततः मूर्च्छितस्य मृतस्य च अस्य स्वार्थविभ्रंशः—त्यामुळें अविवेकी व म्हणूनच मृततुल्य झालेल्या याच्या पुरुषार्थाची हानि होते. २१.

याप्रमाणें मनुष्य विचारशून्य होऊन केवळ मूढ बनला कीं, मग त्याला प्रपंचपरमार्थ कांहीं कळत नाहीं, सन्मार्ग दिसत नाहीं व तो पावलोंपावलीं आत्मघात करीत असतो. १९ तो केवळ जड-मूढ बनून एखाद्या मूर्च्छित माणसाप्रमाणें ताठून जातो व अज्ञानांत कुचंबत पडतो. २२० अशा प्रकारें धड सजीवहि नाहीं व निर्जीवहि नाहीं अशा स्थितींत तो मूढ होऊन रहातो. आपल्या खऱ्या स्वार्थाला मुकतो व आपल्या अंगावर अनर्थ ओढून घेतो. २२१.

—त्याचें मृततुल्यत्वच सविस्तर सांगतात—

विषयाभिनिवेशेन आत्मानं न, न च अपरं वेद—विषयांच्या अभिनिवेशानें तो स्वतःला जाणत नाहीं व दुसऱ्यालाहि जाणत नाहीं तर, व्यर्थं वृक्षजीविकया जीवन् वर्तते—जो व्यर्थ वृक्षाप्रमाणें आपलें जीवित कंठित असतो, तो मृततुल्य होय. यः भस्त्रः इव श्वसन् ( वर्तते सः मृततुल्यः )—म्हणूनच जो लोहाराच्या भात्याप्रमाणें नाकानें श्वास सोडितो, तो मृततुल्य होय. २२.

अशाप्रकारें विषयांच्या आसक्तीमुळें तमोगुणानें वृत्ति ग्रस्त झाली असतां कसलेंच स्मरण होत नाहीं. 'मी कोण' याची देखील त्याला आठवण रहात नाहीं. २२ अशा भ्रमानें मनुष्यप्राणी भाळतो. मद्यपी माणसासारखा उन्मत्त होऊन तो स्वतःलाच विसरतो. तो असा भ्रांत होतो; २३ किंवा विषमज्वर झाला असतां रोगी अनावर बडबड करीत असतो, त्याला आपलें व परकें कांहीं आवडत नाहीं. तो निरर्थक बरळत असतो. २४ चित्ताला भ्रम झाल्यामुळें भलत्याच गोष्टीचें स्मरण करीत असतो. नसत्या गोष्टी त्याला आठवतात. तो असा खितपत पडलेला असतो. २५ किंवा एखाद्याच्या अंगांत भूतसंचार झाला म्हणजे तो हुं हुः, हुं हुः, करून हुंकार देत असतो, किंवा चित्ताला भ्रम झाल्यामुळें 'मी कुत्रा आहें' असें म्हणून भुंकत असतो. २६ किंवा एखादा निजलेला मनुष्य स्वप्नांत स्वतःचें भान न राहून घाबरतो व मी 'युद्धांत पडलों' असें म्हणतो. त्याचप्रमाणें हे सगळे मनुष्यप्राणी भ्रान्त झाले आहेत. २७ मिथ्या भुलवणीनें भ्रमांत पडले आहेत व काम-मोहानें व्यापिल्यामुळें जड-मूढ होऊन त्यांचें अंतःकरण वेडावलें आहे.२८ एखाद्या मुक्या माणसाच्या नाकांत डांस शिरला तर तो जसा घाबरून, फेंफें बेंबें करूं लागतो, रडतो, ओरडतो, पण काय झालें तें कळत नाहीं. त्याची ती खटपट जशी व्यर्थ होते, २९ तसेंच हें

भरे मुरकुट । तें फेंफे बेंबें करी निकृष्ट । न कळे रडे करी हाहाट । ते खटपट वाउगी ॥ २९ ॥ तैसें दुःखबळें प्राणी । परी न कळें उंच करणी । पडिले मोहमदें भुलोनि । मुकेंपणीं बेंबात ॥ २३० ॥ अहंकृतीचा उभारा । शरीरीं भरलासे वारा । तो होऊनि बाधक नरा । पडले आडद्वारा अंधकूपीं ॥ ३१ ॥ कां तेलियाचा ढोर पाहीं । डोळां झांपडी स्वदेही । अवघा वेळ चाले परी पाहीं । पंथ कांहीं न ठकेचि ॥ ३२ ॥ भवंता फिरे लागवेगीं । परी पाहतां न लगे आगी । घाणियाचि भोंवतें वेगीं । भोंवंडी अंगीं जिराली ॥ ३३ ॥ तैसे विषय भवंडित भवू । परी नकळेचि विधिमावू । जैसा सर्प भ्रमला लागे धांवूं । तैसे विषय आघवे धांवती ॥ ३४ ॥ अंवसेचें काळें गडद । तैसा जड मूढ झाला स्तब्ध । स्फुरेना आप पर हा बोध । जगदांध्य ओढवलें ॥ ३५ ॥ जेवीं लोहकराची भाती । तेंवीं वृथा श्वासोच्छ्वास होती । वृक्षाची जैशी तटस्थ स्थिती । यापरी जीती जीत ना मेलें ॥ ३६ ॥ सकामासी स्वर्गप्राप्ती । म्हणसी बोलिली वेदोक्ती । तेही प्रलोभाची वदंती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ३७ ॥

फलश्रुतिरियं नृणां न श्रेयो रोचनं परम् । श्रेयोविवक्षया प्रोक्तं यथा भैषज्यरोचनम् ॥ २३ ॥

निष्काम जे कां कर्मस्थिती । ते मूर्ख सर्वथा न करिती । त्यांसी दावूनियां फळश्रुती । स्वकर्मप्रवृत्ती लाविले ॥ ३८ ॥ सकाम अथवा निष्काम । कर्म क्रिया दोहींची सम । येथ वासनाचि विषम । सकामनिष्कामफलहेतू ॥ ३९ ॥ जेवीं कां स्वातीचें जळ । शिंपीमाजीं होय मुक्ताफळ । तेंचि

---

मनुष्यप्राणी दुःखाच्या तडाख्यानें विव्हल होतात व योग्य मार्ग न कळल्यामुळें मोहरूपी मदानें मुक्यासारखे विवळत पडतात. २३० अहंकाराचा प्रबळ वात मनुष्याच्या देहांत शिरतो व तो बाधक होऊन त्या वाताच्या जोरांत मनुष्य आडवाटेला जाऊन अंधकूपांत पडतो. ३१ किंवा तेल्याचा बैल डोळ्यावर झांपड बांधून घाण्याभोंवतीं दिवसभर जरी फिरत असतो, तरी त्याची वाट कांहीं संपत नाहीं. ३२ तो अत्यंत वेगानें जरी चालत असला तरी आपल्या भोंवतींच फिरून रस्त्याच्या टोंकाला कधींच पोंचत नाहीं. घाण्याच्या भोंवतीं फिरून फिरून त्याच्या अंगांतील भोंवळहि जिरून जाते. ३३ त्याप्रमाणें हे विषय मनुष्याला भवचक्रांत फिरवीत असतात; पण त्यास दैवगती कळत नाहीं. भ्रांत साप जसा सैरावैरां धांवत सुटतो, त्याप्रमाणें सगळे विषय धांवत असतात. ३४ अमावास्येचा अंधार जसा काळाकभिन्न असतो, त्याप्रमाणें जड-मूढ मनुष्य दगडासारखा होतो. त्याला आप-पर हें भान रहात नाहीं. सारें जगत् दिसेनासें होतें. ३५ लोहाराच्या भात्याप्रमाणें त्याचा श्वासोच्छ्वास तेवढा चालू असतो. वृक्ष जसा तटस्थ उभा असतो, तसा तो धड जिवंत ना धड मृत, अशासारखा तटस्थ होऊन रहातो. ३६ यावर तूं असें म्हणशील कीं, सकाम कर्म करणारांस स्वर्ग मिळतो, हें वेदांतच सांगितलें आहे. तर हें बोलणेंहि लोभमूलकच आहे. तेंच तुला आतां सांगतों, ऐक. २३७.

—' अहोपण प्रवृत्त कर्मानुष्ठान करणाराला स्वर्गादिफल प्राप्त होतें, असें श्रुत असल्यामुळें त्याचा स्वार्थविभ्रंश म्ह० पुरुषार्थहानि कशी सांगतां ? ' उत्तर—

इयं फलश्रुतिः न श्रेयः—ही फलश्रुति श्रेष्ठ नव्हे, ( परम पुरुषार्थ नव्हे तर ) नृणां श्रेयो विवक्षया परं रोचनं प्रोक्तं—बहिर्मुख पुरुषांची मोक्षविवक्षेनें अवांतर फलांनीं कर्मविषयीं रुचि उत्पन्न करणें आहे, तें केवल रोचन सांगितलें आहे. यथा भैषज्यरोचनम्—जशी औषधविषयीं रुचि उत्पन्न केली जाते त्याप्रमाणें. [ बाळा ! हें औषध घे, म्ह० मी तुला लाडू देईन, असें बाप सांगतो; व पुत्र तें खातो, पण लाडू हें कांहीं त्याच्या औषधपानाचे फल नव्हे. ' बाळा ही गुळवेल खा, म्ह० तुझी शेंडी वाढेल ' असें आई सांगते व बालक ती खातो. पण शेंडी वाढणें, एवढेंच कांहीं त्याचें फल नव्हे, तर आरोग्य हें त्याचें फल आहे. ] २३.

मूर्ख लोक निष्काम कर्म कधींच करीत नाहींत. म्हणून वेदानें त्यांना फलश्रुति सांगून स्वकर्मांत प्रवृत्त केलें आहे. ३८ सकाम व निष्काम कर्मांची क्रिया सारखीच घडते. परंतु हेतु मात्र भिन्न असतो. सकाम कर्म कामनायुक्त असतें व निष्काम हेतुरहित असतें. ३९ स्वाती नक्षत्राचे पर्जन्यबिंदु शिंपींत पडले असतां पाणीदार मोतीं होतात;

सेवीं जें महाव्याळ । तें हाळाहळ होऊनि ठाके ॥ २४० ॥ तेवीं आपुली जे कां कल्पना । निष्कामें आणी मुक्तपणा । तेचि सकामत्वें जाणा । दृढबंधना उपजवी ॥ ४१ ॥ वेदु बोलिला जें स्वर्गफळ । तें मुख्यत्वें नव्हे केवळ । जेवीं भेषज घ्यावें बाळ । देऊनि गूळ चाळविजे ॥ ४२ ॥ ओखद घेतलियापाठीं । क्षयरोगाची होय तुटी । परी बाळ हातींचा गूळ चाटी । ते नव्हे फळदृष्टी भेषजीं ॥ ४३ ॥ तेवीं वेदाचे मनोगतीं । स्वर्गफळाची अभिव्यक्ती । मूर्खांसी द्यावया मुक्ती । स्वधर्मस्थितीं लावितू ॥ ४४ ॥ म्हणसी कर्मवादी जे नर । वेद सांगती प्रवृत्तिपर । तो वेदार्थ निवृत्तिपर । केवीं साचार मानावा ॥ ४५ ॥ श्रुत्यर्थ जैं प्रवृत्ती धरी । तैं वेदू झाला अनर्थकारी । ते प्रवृत्ति दूषूनि श्रीहरी । दावी निवृत्तिवरी वेदार्थ ॥ ४६ ॥

उत्पत्त्यैव हि कामेषु प्राणेषु स्वजनेषु च । आसक्तमनसो मर्त्या आत्मनोऽनर्थहेतुषु ॥ २४ ॥
नतानविदुषः स्वार्थं भ्राम्यतो वृजिनाध्वनि । कथंयु ञ्ज्यात्पुनस्तेषु तांस्तमो विशतो बुधः ॥ २५ ॥

उपजतांचि प्राणिमात्रासी । देह आवडे सर्वस्वेंसीं । देहात्मवादें विषयांसी । जीवेंप्राणेंसीं लोलुप ॥ ४७ ॥ विषयकामाच्या आसक्तीं । स्त्रीपुत्रांची गोडी चित्तीं । स्वजनधनांची अतिप्रीती । स्वभावस्थिति अनिवार ॥ ४८ ॥ जेणें जाइजे अधोगती । ऐशी जे कां कामासक्ती । ते प्राण्यासी सहजगती ।

---

पण तेंच जल मोठ्या सापानें प्राशन केल्यास भयंकर विष उत्पन्न होतें. २४० त्याचप्रमाणें आपली कल्पनाच निष्काम कर्मानें मुक्त करिते व सकाम कर्मानें बद्ध करिते. ४१ वेदानें जें स्वर्गफल सांगितलें आहे तें वास्तविक खरें नव्हे. पिता लहान मुलाला औषध घेण्यासाठीं जसा गुळाचा खडा दाखवितो, तशी ती फसवणूक आहे. ४२ मुलानें औषध घेतल्यावर क्षय रोग हटतो, पण तें मूल हातांतील गूळच चाटीत बसतें; परंतु गूळ मिळणें हें वास्तविक औषधाचें फल नसून रोग हटणें हें जसें मुख्य फल आहे, ४३ त्याचप्रमाणें वेदानें मोक्षाची प्राप्ति करून देण्यासाठीं स्वर्गफलाची लालुच दाखवून त्यांना स्वधर्मात प्रवृत्त केलें आहे. ४४ यावर तूं म्हणशील कीं, सगळे कर्मवादी लोक वेदाला प्रवृत्तिपर म्हणत असतात; तेव्हां त्याला निवृत्तिपर कसा मानावा ! ४५ ( त्याचें उत्तर ऐक. ) श्रुतीचा अर्थ जर प्रवृत्तिपर असता तर वेद अनर्थकारक होऊन बसला असता. यास्तव आतां श्रीकृष्ण त्या प्रवृत्तीला दूषण देऊन वेदाचा अर्थ निवृत्तिपरच आहे, हें दाखवीत आहे. २४६.

—' अहोपण, कर्मकांडांत मोक्षाचें नांवहि ऐकूं येत नाहीं, मग तुम्ही असें व्याख्यान कसें करितां ? ' अशी आशंका घेऊन ' कर्मकांडांत जें सांगितलें आहे, त्याचा असंभव असल्यामुळें आम्ही असें व्याख्यान करितो, ' असें समाधान भगवान् दोन श्लोकांनीं सांगतात—

मर्त्याः उत्पत्त्या एव हि कामेषु प्राणेषु स्वजनेषु आत्मनः अनर्थहेतुषु आसक्तमनसः—मनुष्य स्वभावतःच पश्वादि कामांमध्यें आयुष्य, इंद्रियें, बल, वीर्य इत्यादिकांमध्यें, पुत्रादिकांमध्यें व आपल्या अनर्थहेतूंमध्यें म्ह० परिणामीं स्वतःला अत्यंत दुःख देणाऱ्या वस्तूंमध्यें आसक्तचित्त असतात. अतः स्वार्थं अविदुषः नतान् वृजिनाध्वनि भ्राम्यतः तमः विशतः तान् बुधः तेषु एव पुनः कथं युंज्यात्—तेव्हां परम सुखाला न जाणणाऱ्या त्यामुळेंच वेद जें सांगतो तेंच श्रेय होय, अशी श्रद्धा ठेवणाऱ्या म्ह० विचारावांचून वेदविधींचे दास झालेल्या, काममार्गांतील देवादियोनीमध्यें भ्रमण करणाऱ्या व त्याहूनहि अत्यंत हीन अशा वृक्षादिस्थावर योनींस प्राप्त होणाऱ्या मर्त्यांना स्वतः सर्वज्ञ असलेला वेद ' पशुकामः, आयुरिंद्रियादिकामः पुत्रादिकामः ' इत्यादिप्रकारें वस्तुतः त्याच कामांमध्यें पुनः प्रवृत्त कसा करील ! [ मनुष्य स्वभावतःच ज्यांत आसक्त आहे, त्याच विषयांमध्यें वेद जर प्रवृत्त करूं लागला तर तो अनाप्त व त्यामुळेंच अप्रमाण ठरेल, असा याचा भावार्थ. ] २४–२५.

प्रत्येक प्राणिमात्राला जन्मतांच आपला देह सर्वस्वी आवडत असतो. ' देहच आत्मा ' असें मानून तो जीवाभावानें विषयांत लोलुप होतो. ४७ विषयाच्या आसक्तीमुळें मनांत स्त्री-पुत्राविषयीं प्रेम उत्पन्न होतें. आपल्या आप्तमित्रांवर व द्रव्यावर अत्यंत प्रीति जडते. हा स्वभाव अनिवार आहे. ४८ जिच्या योगानें मनुष्य अधोगतीला जातो

**विषयासक्ति स्वभावें ॥ ४९ ॥ तेचि विषयांची प्रवृत्ती । वेद बोले जैं विध्युक्ती । तैं सर्वांचा स्वार्थघाती । झाला अनर्थी वेदवादु ॥ २५० ॥ मरतया तरटमारू केला । बुडत्याचे डोयीं दगड दीधला । आंधळा अंधकूपीं घातला । तैसा वेदु झाला अनर्थी ॥ ५१ ॥ वेदु जैं विषयीं गोंवी । तैं प्राण्यातें कोण उगवी । राजा सर्वस्वें नागवी । तैं कोण सोडवी दीनातें ॥ ५२ ॥ नेणोनि वेदाचा मथितार्थु । स्वयें जो कां विषयासक्तु । तो मानी प्रवृत्तिपर श्रुत्यर्थु । अनर्थहेतू बालिशां ॥ ५३ ॥ पुत्र पित्यास पुसे जाण । ग्रहणीं जेवूं परान्न । येरू म्हणे सुटल्या ग्रहण । उष्ण भोजन स्वगृहीं करूं ॥ ५४ ॥ तैशी माझ्या वेदाची उक्ती । निषेधमुखें दावी प्रवृत्ती । येणें वेदाच्या मनोगती । विषयनिवृत्ती मुख्यत्वें ॥ ५५ ॥ विषयीं बुडते जे जन । त्यांचें करावया उद्धरण । माझा वेदवादु जाण । सकामपण त्या नाहीं ॥ ५६ ॥ कोणी एक मंदबुद्धी । केवळ विषयांध विशुद्धी । सकाम जल्पती वेदविधी । त्यांची कुबुद्धि हरि सांगे ॥ ५७ ॥**

एवं व्यवसितं केचिदविज्ञाय कुबुद्धयः । फलश्रुतिं कुसुमितां न वेदज्ञा वदन्ति हि ॥ २६ ॥

**फलत्यागें स्वधर्मस्थिती । सर्वथा सकाम न करिती । यालागीं वेद बोले फलश्रुती । स्वधर्मप्रवृत्तीलागूनी ॥ ५८ ॥ सैन्धव सागरा भेटूं जातां । जेवीं कां हारपे सैन्धवता । तेवीं स्वधर्मीं प्रवर्ततां । सकामता उरेना ॥ ५९ ॥ जैशी दों दिव्यांची वाती । एकवट केलिया ज्योती । तेथ न दिसे भेदगती । पाहतां ज्योती एकचि ॥ २६० ॥ जेवीं अग्नीं कापुर मिळतां । तो अग्निचि होय तत्त्वतां । तेवीं स्वधर्मकर्मीं प्रवर्ततां । कर्मीं निष्कर्मता स्वयें प्रकटे ॥ ६१ ॥ कर्माकर्मांची वेळूजाळी । ते स्वधर्माचे काचाणि-**

---

ती कामासक्ति प्राण्यामध्यें उपजतच असते. ४९ अशा विषयांची प्रवृत्ति वेदानें जर विधियुक्त सांगितली, तर वेदवचन लोकांचा घात करणारें व अनर्थकारकच झालें ! २५० मरणाराला चाबकानें बडवावें किंवा बुडणाराच्या डोकीवर थोरला दगड द्यावा किंवा आंधळ्याला अंधकूपांत ढकलून द्यावें, त्याप्रमाणें वेद अनर्थकारक झाला. ५१ वेदानेंच जर मनुष्याला विषयांत गुंतविलें तर त्याना मुक्त कोण करणार ! राजानें जर स्वतः प्रजेला नागविलें तर त्या गरिबांना सोडविणारा कोण ! ५२ विषयासक्त लोकांनीं वेदाचा खरा अर्थ न जाणतां श्रुतीचा अर्थ प्रवृत्तिपर मानिला आहे. त्यामुळेंच तो मूर्खांना अनर्थकारक होतो. ५३ एक पुत्र आपल्या पित्याला ग्रहणामध्यें म्हणाला कीं, शेजारच्या घरीं चांगलें मिष्टान्न केलें आहे, तेथें जाऊन आपण जेऊं या. त्याला पित्यानें उत्तर दिलें कीं, ग्रहण सुटल्यावर आपण आपल्या घरींच ऊन-ऊन ताजें जेवण जेऊं. ५४ हें जसें त्यानें मोठ्या खुबीनें उत्तर दिलें, तशीच वेदानें निषेधमुखानें प्रवृत्ति दाखवून मुख्यतः विषयनिवृत्ति केली आहे. ५५ विषयांत बुडणाऱ्या लोकांचा उद्धार करण्यासाठीं माझी वेदोक्ति आहे. त्यांत सकामपणा नाहीं. ५६ परंतु कित्येक मंदमति लोक केवळ विषयांध असतात व लोभानें वेदविधि प्रवृत्तिपर आहे अशी बडबड करितात. श्रीहरि त्यांच्या दुर्बुद्धीचेंच वर्णन करीत आहे. २५७.

—'तर मग कर्ममीमांसक वेदांचें फलपरत्व कसें सांगतात ?' उत्तर—

**केचित् कुबुद्धयः एवं व्यवसितं अविज्ञाय कुसुमितां फलश्रुतिं वदन्ति—कित्येक हीनबुद्धीचे लोक वेदाचा हा** अशा प्रकारचा आशय न जाणितां अवांतर फलरोचनेनें रमणीय वाटणारी परम फलश्रुति सांगतात. [ **कुबुद्धित्व** हेंच याचें कारण आहे. पण ] **वेदज्ञाः न वदन्ति हि**—पण वेदज्ञ व्यासादिक तसें सांगत नाहींत. २६.

सकाम लोक फलाची आसक्ति टाकून स्वधर्माचरण करीत नाहींत. म्हणून त्यांची स्वधर्माकडे प्रवृत्ति होण्यासाठींच वेदानें फलश्रुति सांगितली आहे. ५८ मीठ समुद्राला भेटावयास गेलें असतां त्याचा मीठपणा जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें स्वधर्माचरण करीत असतां सकाम बुद्धि रहात नाहीं. ५९ दोन दिव्यांची ज्योति एक केली असतां त्यांत भेद दिसत नाहीं. दोन्ही ज्योति जशा एकरूप दिसतात, २६० कापूर अग्नीला लागतांच तो अग्निरूपच होतो, त्याप्रमाणें स्वधर्माचरण केलें असतां निष्कामता स्वतःच प्रकट होते. ६१ कर्म-अकर्म या वेळूच्या जाळींत

**मेळीं । पडे चित्तशुद्धीची इंगळी । ते करी होळी कर्माकर्मांची ॥ ६२ ॥ सकामता करितां कर्म । स्वधर्म नाशी फळकाम । तेव्हां सकाम आणि निष्काम । दोहींचें भस्म स्वधर्म करी ॥ ६३ ॥ जेवीं दों काष्ठांच्या घसणी- । माजीं प्रकटे जो कां वन्ही । दोहींतेंही जाळूनी । स्वतेजपणीं प्रकाशे ॥ ६४ ॥ तेवीं माझा वेदवादू । स्वकर्मे छेदी कर्मबाधू । हें नेणोनि जो विषयांधू । जडला सुबद्धू फळाशे ॥ ६५ ॥ वेदें प्रवृत्तिरोचनेकारणें । स्वर्गादि नाना फळें बोलणें । त्यालागीं ज्याचें बैसे धरणें । तेणें नागवणें निजस्वार्था ॥ ६६ ॥ कष्टोनि शेतीं पेरिले चणे । त्यांची उपडोनि भाजी करणें । तो लाभ कीं तेणें नाडणें । तैसें फळ भोगणें सकामीं ॥ ६७ ॥ बोलीं जोंधळियाचीं करबाडें । खातां अत्यंत लागती गोडें । त्यालागीं शेत जैं उपडे । तैं लाभू कीं नाडे निजस्वार्थी ॥ ६८ ॥ तैशी सकाम कामना उन्मत्ते । जे फळीं फळाशा लोलिंगते । ते नाडली स्वधर्मलाभातें । ऐक तूतें सांगेन ॥ ६९ ॥ शेतीं पेरावया आणिले चणे । त्यांचे आदरें करी जो फुटाणे । तो शाहणा कीं मूर्ख म्हणणें । तैसें फळ भोगणें सकामीं ॥ २७० ॥ घोडा विकोनि पलाण घेणें । लोणी देऊनि ताक मागणें । भात सांडूनि वेळण पिणें । तैसें फळ भोगणें सकामीं ॥ ७१ ॥ ऐसें सकाम अतिदुर्बुद्धी । जे नाडले स्वधर्मसिद्धी । यालागीं देवो म्हणे कुबुद्धी । ते कुबुद्धीचा विधी हरि सांगे ॥ ७२ ॥**

॥ कामिनः कृपणा लुब्धाः पुष्पेषु फलबुद्धयः । अग्निमुग्धा धूमतान्ताः स्वं लोकं न विदन्ति ते ॥ २७॥

---

स्वधर्मकर्माच्या चकमकींतून उत्पन्न झालेली चित्तशुद्धीची ठिणगी पडतांच ती कर्म-अकर्माची होळी करून टाकिते. ६२ सकाम कर्म केलें तरी स्वधर्म फलाशेचा नाश करितो व तोच सकाम आणि निष्काम कर्मांचें भस्म करितो. ६३ दोन काष्ठें एकावर एक घांसलीं असतां त्यांतून अग्नि प्रकट होतो व तो जसा त्या दोन्हीं काष्ठांना जाळून आपल्या तेजानें प्रकाशतो, ६४ त्याप्रमाणें माझी वेदवाणी स्वकर्मानेंच कर्मबंध नाहींसा करविते. परंतु हें न कळल्यामुळें विषयांध मनुष्य फलाशेंत गुरफटला जातो. ६५ वेदानें प्रवृत्तीची रुचि उत्पन्न करण्या-साठीं स्वर्गादि नानाप्रकारच्या फलांचें आमिष दाखविलें आहे; परंतु त्या स्वर्गादि फलप्राप्तीसाठीं जे खरोखरच धरणें धरून बसतात, ते स्वतःच्या स्वार्थालाच मुकतात. ६६ एखाद्या शेतकऱ्यानें मोठे कष्ट करून हरबऱ्याचें शेत पेरावें आणि झाडें येतांच तीं उपटून त्याची भाजी करावी. याला लाभ म्हणावें कीं हानि ! असेंच फल सकाम माणसाला मिळतें. ६७ ओल्या जोंधळ्याचीं ताटें खावयास मोठीं गोड लागतात, म्हणून सगळें शेतच उपटून आणलें तर तो लाभ कीं, स्वतःचीच फसवणूक ! ६८ त्याचप्रमाणें जे सकाम बुद्धीनें उन्मत्त होतात, फलाशेवर लोलुप होतात, ते स्वधर्माच्या लाभाला अंतरतात. त्याविषयींच तुला सांगतों, ऐक. ६९ शेतांत पेरण्यासाठीं हरबरे आणले व ते भाजून त्याचे फुटाणे केले तर त्याला शहाणा म्हणावें कीं मूर्ख ! अशाच प्रकारचें सकाम लोकांचें फलभोगणेंहि असतें. २७० घोडा विकून खोगीर घ्यावें, किंवा लोणीं देऊन ताक मागावें, किंवा भात टाकून पेज प्यावी, तसेंच हे सकामाचे भोग आहेत. ७१ हे सकाम जन असे अत्यंत दुर्बुद्धि असतात; त्यामुळें ते स्वधर्मसिद्धीला मुकतात. म्हणून देव त्यांना कुबुद्धि म्हणतात. त्यांच्या दुर्बुद्धीचीं लक्षणें श्रीहरि आतां सांगत आहे. २७२.

—मीमांसकांचें कुबुद्धित्वच पुढील आठ श्लोकांनीं सविस्तर वर्णितात—

कामिनः कृपणाः लुब्धाः पुष्पेषु फलबुद्धयः अग्निमुग्धाः धूमतान्ताः ते स्वं लोकं न विदन्ति-विषयांची अत्यंत कामना करणारे, त्यामुळेंच कृपण–दीन, दैन्यामुळें लोभी, तृष्णेनें व्याकुळ झालेले, अवान्तर फलांमध्येंच फलबुद्धि ठेवणारे, ( पुष्पालाच फळ समजणारे भ्रान्त ) म्हणून अग्निसाध्य कर्मांच्या अभिनिवेशानें विवेकहीन बनलेले, त्यामुळेंच धूमादि मार्ग हाच ज्यांचा अन्त–शेवट आहे असे ते कर्मठ आत्मतत्त्व जाणत नाहींत. ( याविषयीं ' अग्निमुग्धो ह वै धूमतान्तः ' इत्यादि श्रुति प्रमाण आहे. ) २७.

सकामाची तृष्णा पूर्ण । कदाकाळीं नव्हे जाण । कामेच्छा तो सदा दीन । कृपणपण या हेतू ॥ ७३ ॥ जळीं बक धरोनि ध्यान । जेवीं कां टपत राहे मीन । तेवीं सकामा अनुष्ठान । लुब्धोनि जाण कामासी ॥ ७४ ॥ जावया परपुरुषापासीं । लवोंठवों दावी निजपतीसी । तेवीं काम धरोनि मानसीं । स्वधर्मकर्मासी आचरे ॥ ७५ ॥ जेवीं कां अज्ञान बाळ । फूल तेंचि म्हणे फळ । तेवीं स्वर्गभोग केवळ । मानी अढळ मूर्खत्वें ॥ ७६ ॥ त्याही स्वर्गभोगासी पाहें । कर्मवैकल्य होय कीं नोहे । हाही संदेह वर्तताहे । तेणेंही होये अतिदीन ॥ ७७ ॥ सकाम तो सदा दीन । दीनत्वें अतिकृपण । कृपणत्वें सलोभपण । लोभास्तव ज्ञान महामोह ग्रासी ॥ ७८ ॥ मोहाचें खवळल्या भान । सविवेक ग्रासी ज्ञान । तेव्हां बुद्धीमाजीं तमोगुण । सबाह्य परिपूर्ण उल्हासे ॥ ७९ ॥ तमें कोंदाटल्या वृत्ती । धूमांकित होय स्थिती । जेवीं कां आंधळ्याचा सांगाती । आंधारे रातीं आडवीं चुके ॥ २८० ॥ त्या आंधळ्याची जैशी स्थिती । तैशी सकामाची होय गती । चुकला विवेकाचा सांगाती । आंधळी वृत्ति अतिमुग्ध ॥ ८१ ॥ जैसें कां अज्ञान बाळ । तैसा मुग्ध होय केवळ । कोण कर्म काय तें फळ । नेणो विकळ मुग्धत्वें ॥ ८२ ॥ माझी कोण लोकीं स्थिती । पुढें कोण आपुली गती । हें कांहींच न स्मरे चित्तीं । धूम्रवृत्ती देहातू ॥ ८३ ॥

न ते मामङ्ग जानन्ति हृदिस्थं य इदं यतः । उक्थशस्त्रा ह्यसुतृपो यथा नीहारचक्षुषः ॥ २८ ॥

वेदतात्पर्याचें निजखुणें । तुवां पुसिलें मजकारणें । ती वेदाची गुह्य निरूपणें । तुजकारणें म्यां निरूपिली ॥ ८४ ॥ परिसोनि वेदाचे विभाग । उद्धव सुखावला चांग । तेणें संतोषें श्रीरंग । संबोखोनि

---

सकाम माणसाची कधींच तृप्ति होत नाहीं. कामेच्छेनें तो सदा दीन व त्यामुळेंच कृपण असतो. ७३ जलामध्यें बगळा ध्यान धरून माशासाठीं जसा टपून बसतो, तसा सकाम मनुष्य नेहमीं फलेच्छेनेंच कर्मानुष्ठान करीत असतो. ७४ स्वैरिणी स्त्री परपुरुषाकडे जाणें सुलभ व्हावें, म्हणून पतीच्या पुढें पुढें जशी नाचत असते, त्याप्रमाणेंच सकाम मनुष्य मनांत कामना ठेवून स्वधर्मकर्म आचरीत असतो. ७५ एखादें अज्ञान मूल जसें फुलाला फळ म्हणतें, त्याप्रमाणें सकाम मनुष्य मूर्खपणानें स्वर्गसुखाला शाश्वत समजत असतो. ७६ त्या स्वर्गसुखाच्या प्राप्तीसाठीं यथासांग कर्म घडेल किंवा नाहीं या संशयानें तो अत्यंत व्याकुल होत असतो. ७७ विषयासक्त मनुष्य अत्यंत दीन होतो. दीनपणानें तो कृपण होतो. कृपणत्वामुळें लोभी होतो; लोभामुळें त्याच्या ज्ञानाला महामोह ग्रासून टाकितो; ७८ मोह खवळला म्हणजे तो विवेकासह ज्ञानाला गिळून टाकितो. तेव्हां तमोगुण म्ह० अज्ञान, बुद्धीला मोठ्या उल्हासानें सबाह्य व्यापून रहातें.७९ अज्ञानानें वृत्तीला व्यापिलें म्हणजे धुकें कोंदटल्याप्रमाणें वृत्तीची स्थिति होते. अंधाऱ्या रात्रीं आंधळ्याच्या सोबतीनें गेल्यास अरण्यांत जशी वाट चुकते, २८० तशी सकाम पुरुषाची अवस्था होते. विवेकाची सोबत चुकली कीं, आंधळी वृत्ति अत्यंत मुग्ध होते. ८१ सकाम पुरुष अज्ञ बालकासारखा अत्यंत मुग्ध होतो व त्या मुग्धपणानें त्याला कर्म कोणतें व फल कोणतें हें कळेनासें होतें. ८२ मी कोणत्या लोकीं आहे, पुढें माझी गति काय होणार, हें कांहींच त्याला कळेनासें होतें व मरणोत्तर धूममार्ग प्राप्त होतो. २८३.

—' हा स्वलोक कोणता ? ' उत्तर—

अंग—उद्धवा ! ते हृदिस्थं मां न जानन्ति—ते हृदयामध्यें स्थित असलेल्या मज आत्म्याला जाणत नाहींत. ( ' अहो-पण, ते हृदयस्थ अहंकारास्पद जीवाला जाणतात ! ' होय, हें खरें; पण हृदयस्थ परमात्म्याला जाणत नाहींत, असें सांगतात—) यः इदं यतः च इदं—ज्या परमात्म्याहून हें जगत् पृथक् नाहीं व ज्याच्यापासून हें उत्पन्न झालें आहे त्याला जाणत नाहींत. हि उक्थशस्त्राः असुतृप यथा नीहारचक्षुषः—कारण उक्थ म्ह० कर्म हेंच ज्यांचें शस्त्र म्ह० कथनीय किंवा पशुहिंसा-साधन आहे, असे ते असतात. त्यामुळें केवळ प्राणांचें-इंद्रियांचें तर्पण करण्यांत ते तत्पर असतात. नीहार म्ह० धुकें, त्यानें ज्यांचे नेत्र व्याप्त असतात ते जवळ असलेली वस्तूहि पाहूं शकत नाहींत, तसेंच अविवेकानें अंध झालेले हे कर्मठ समीप असलेल्याहि आत्मवस्तूला पहात नाहींत ( याविषयीं ' न तं विदाथ य इमा० ' इत्यादि श्रुति प्रमाण आहे. ) २८.

वेदतात्पर्याचें गूढ सार तूं मला विचारिलेंस म्हणून मीं तुला वेदाच्या गुह्य अर्थाचें निरूपण करून सांगितलें. ८४ हा वेदाचा विभाग ऐकून उद्धवाला अत्यंत संतोष झाला. त्यामुळें श्रीकृष्णाला अतिशय आनंद वाटला व त्यानें

अंग उद्धवासी म्हणे ।। ८५ ।। जो मी हृदयामाजिले वस्ती । परमात्मा निकटवर्ती । त्या मातें सकाम नेणती । कामासक्तीं नाडले ।। ८६ ।। तो मी हृदयामाजीं असें । हें एकदेशित्व मज नसे । जगदाकारें मीचि भासें । जेवीं कल्लोळविलासें सागरू ।। ८७ ।। अलंकार झालेपणें । जेवीं असे निखळ सोनें । तेवीं जगदाकारें म्यां श्रीकृष्णें । परिपूर्ण असणें पूर्णत्वें ।। ८८ ।। नाम रूप वर्ण विविध । माझेन प्रकाशे जगदुद्बोध । परी नामरूपजातिभेद । मजसी संबंध असेना ।। ८९ ।। आकाश जळीं बुडाले दिसे । परी तें न माखे जळरसें । तेवीं मी जगदाकारें असें । जगदादि दोषें अलिप्त ।। २९० ।। ऐसा मी विश्वात्मा विश्वंभरू । विश्वमूर्ति विश्वेश्वरू । त्या मज नेणती अज्ञान नरू । जे कां शिश्नोदरूपोषक ।। ९१ ।। ज्यासी आंधारें दाटे गाढें । कां महा कुहरीं जो सांपडे । तो कांहीं न देखे पुढें । अवचितां पडे महागतीं ।। ९२ ।। तेवीं अतिमोहममताभ्रांतें । अज्ञानविहारें सबाह्य व्याप्तें । जवळिला न देखोनि मातें । पडिले मोहगर्तें तमामाजीं ।। ९३ ।। न कळोनि माझ्या वेदार्थातें । केवळ जीं कां कामासक्तें । तीं पावलीं अधःपातातें । जवळिला मातें नेणोनी ।। ९४ ।। तो मी जवळी कैसा म्हणसी । तरी सर्वांच्या हृदयदेशीं । वसतसें अहर्निशीं । चेतनेसी चेतविता ।। ९५ ।। त्या माझे वेदार्थमत । नेणतीची कामासक्त । तेचि विखीं श्रीकृष्ण-नाथ । विशदार्थ स्वयें सांगे ।। ९६ ।।

ते मे मतमविज्ञाय परोक्षं विषयात्मकाः । हिंसायां यदि रागः स्याद्यज्ञ एव न चोदना ।। २९ ।।

---

उद्धवाला 'अरे बाबा !' अशी हांक मारून म्हटलें कीं, ८५ मी जो सर्वांच्या हृदयांत राहाणारा, म्हणूनच अत्यंत समीप असणारा परमात्मा त्या मला सकाम लोक जाणत नाहींत. इतके ते कामासक्तीनें नाडलेले असतात. ८६ मी हृदयांतच असतों, हा एकदेशीपणा मला नाहीं. कारण समुद्र जसा लाटांच्या योगानें भासतो तसा मी सर्व जगदाकारानें भासतों. ८७ सोन्याचे अनेक आकाराचे दागिने केले तरी त्या सर्वांतील सोनें जसें एकच असतें, त्याप्रमाणें मी श्रीकृष्ण जगदाकारानें परिपूर्णच आहें. ८८ नाम-रूप व अनेक प्रकारचे वर्ण इत्यादि सर्व जगाचा भास माझ्यामुळें अनुभवास येतो. परंतु नाम-रूप-जाति ह्या भेदाचा माझ्याशीं संबंध नाहीं. ८९ आकाश समुद्रांत बुडालेलें दिसतें; पण तें खरोखर जसें पाण्यानें भिजत नाहीं, त्याप्रमाणें मी जरी जगदाकारानें भासतों तरी जगाच्या दोषापासून अलिप्त असतों. २९० अशा मज सर्वात्म्या, विश्वंभर, विश्वमूर्ति, विश्वेश्वराला विषयासक्त, पोटभरू, अज्ञ पुरुष जाणत नाहींत. ९१ ज्याच्या डोळ्यापुढें अंधारी येते किंवा जो खोल गुहेंत सांपडतो, त्याला पुढला मार्ग दिसत नाहीं व तो अकस्मात मोठ्या खाड्यांत पडतो. ९२ तसाच अज्ञजनहि मोह-ममतेच्या अत्यंत भ्रांतीनें व्याप्त झाल्यामुळें त्यांच्याजवळ असलेल्या मलाहि ते पहात नाहींत आणि मोहरूपी गर्तेतील अज्ञानांधकारांत जाऊन पडतात.९३ माझ्या वेदांचा अर्थ न जाणतां जे केवल कामासक्त होतात त्यांचा समीप असलेल्याहि मला न जाणल्यामुळें अधःपात होतो. ९४ 'मी त्यांच्याजवळ कसा असतों' असें जर म्हणशील तर मी परमात्मा सर्वांच्या हृदयांत रात्रंदिवस राहून ज्ञानाला प्रज्ज्वलित करीत असतों. ९५ त्या माझ्या वेदाचा खरा अर्थ कामासक्त जन जाणत नाहींत. आतां श्रीकृष्ण याचाच स्पष्ट अर्थ सांगत आहे. २९६.

—वेदतात्पर्याचें ज्ञान नसल्यामुळें ते अन्य देवतांचें यजन करितात, असें आतां सांगतात—

ते विषयात्मकाः परोक्षं मे मतं अविज्ञाय—ज्यांचें चित्त विषयांमध्यें आसक्त झालें आहे असे ते माझें अस्पष्ट मत बरोबर न जाणतां ( देवादिकांचें यजन करितात, असा पुढें संबंध. आतां स्वमतच सांगतात— ) हिंसायां यदि रागः स्यात् तर्हि यज्ञे एव—मांसभक्षण किंवा त्याचें फल, यांविषयीं जर कामना होईल तर यज्ञांतच ती तृप्त करून घ्यावी, अशा अनुज्ञेच्या द्वारां हा परिसंख्या विधि आहे. ( कारण 'कोणत्याहि प्राण्याची हिंसा करूं नये व अग्निष्टोम ही ज्याची देवता आहे, अशा पशूची हिंसा करावी' असे परस्पर विरुद्ध विधि-निषेध आढळतात. यास्तव येथें परिसंख्या विधीच कल्पावा लागतो. )—न चोदना—पण त्या हिंसेविषयीं अत्यंत आवश्यक म्हणून विधि नाहीं. [ नित्य व नैमित्तिक कर्मांशीं कामाचा साक्षात् संबंध जरी नाहीं, तरी 'कर्मानें पितृलोक प्राप्त होतो' अशी श्रुति असल्यामुळें त्या कर्मांमध्यें सामान्यतः पितृलोककामना व अन्तःकरणशुद्धिचीहि कामना आहेच. कारण मनुस्मृतींत—'कामनाशून्य जंतूची कोणतीच क्रिया येथें उपलब्ध होत नाहीं. प्राणी जें जें करितो तें तें कामाचेंच चेष्टित—परिणाम आहे.' असें म्हटलें आहे. ] २९.

**माझा वेदार्थाचा अगम्य भावो । न कळोनि गूढ अभिप्रावो । तेणें सकामासी उत्साहो । स्वर्गातें पहा हो मानिती सत्य ॥ ९७ ॥ रोचनार्थ स्वर्ग बोले वेद । तो प्रकटार्थ मानूनि शुद्ध । मग स्वर्गसाधनें विविध । कामलुब्ध आदरती ॥ ९८ ॥ तेथ यज्ञ हें मिषमात्र जाण । स्वयें करावया मांसभक्षण । अविधीं करिती पशुहनन । अतिदृप्त जाण कामार्थी ॥ ९९ ॥ त्यांसी त्याचि पैं गा देहांतीं । मारिले पशु मारावया येती । हातीं घेऊनि खड्ग काती । सूड घेती यमद्वारीं ॥ ३०० ॥ तेथ कैंचें स्वर्गसुख । अविधी साधनें महामूर्ख । पावले गा अघोर नरक । सकाम देख नाडले ॥ १ ॥ यथेष्ट करावया मांसभक्षण । स्वेच्छा जें कां पशुहनन । त्यांसी वेदें केलें निर्बंधन । पशुहनन यज्ञार्थ ॥ २ ॥ तेथही अर्गळा घातली जाण । देश काळ आणि वर्तमान । मंत्र तंत्र विधि विधान । धन संपूर्ण अतिशुद्ध ॥ ३ ॥ शक्त सज्ञान धनवंत । ऐसा कर्ता पाहिजे येथ । मुष्टिघातें करावया पशुघात । पडे प्रायश्चित्त मेंमातां ॥ ४ ॥ ऐशी वेदाज्ञा नाना अगड । घातलीं प्रायश्चित्तें अतिगूढ । तरी सकाम जे महामूढ । ते धांवती दृढ पशूहनना ॥ ५ ॥ ऐसें झाल्या पशूहनन । विभागा येईल कवण प्रमाण । तेंचि करावें भक्षण । दातांसी जाण न लागतां ॥ ६ ॥ विभाग भक्षितां आपण । जो करी रसस्वादन । त्यासी प्रायश्चित्त जाण । हेंही निर्बंधन वेदें केलें ॥ ७ ॥ करावें मांसभक्षण । हे वेदाज्ञा नाहीं जाण । त्याचें करावया निराकरण । लाविलें विधान यज्ञाचें ॥ ८ ॥ स्वेच्छा पशू न मारावया जाण । यज्ञीं नेमिलें पशूहनन । न करावया मांसभक्षण । नेमिला प्रमाण यज्ञभाग ॥ ९ ॥ हेंही वेदाचें बोलणें । मूर्खप्रलोभाकारणें । येऱ्हवीं पशूहिंसा न करणें । मांस न भक्षणें हें वेदगुह्य ॥ ३१० ॥**

हिंसाविहाराह्यालब्धैः पशुभिः स्वसुखेच्छया । यजन्ते देवता यज्ञैः पितृभूतपतीन् खलाः ॥ ३० ॥

---

माझ्या वेदार्थाचा अर्थ अगम्य आहे. माझा गूढ अभिप्राय न कळल्यामुळें सकाम लोक मोठ्या उत्साहानें स्वर्गाला सत्य मानितात. ९७ वेदानें रुचि उत्पन्न करण्यासाठीं स्वर्गाचें वर्णन केलें आहे. तेंच अगदीं खरें मानून कामासक्त लोक स्वर्गप्राप्तीसाठीं मोठ्या आदरानें अनेक साधनांचें अनुष्ठान करितात. ९८ स्वतःला मांसभक्षण करावयास पाहिजे म्हणून यज्ञाचें निमित्त पुढें करून ते कामलोलुप अविधीनें पशुवध करितात. ९९ अशा लोकांना मरणोत्तर तेच पशु हातांत शस्त्र घेऊन मारावयास येतात व यमलोकीं त्यांचा सूड घेतात. ३०० तेव्हां मरणानंतर त्यांना स्वर्गसुख कोठचें मिळणार ! अशास्त्रीय कर्म करून ते महामूर्ख घोर नरकांत पडतात. सकाम लोकांची अशी अवस्था होते ! १ यथेष्ट मांसभक्षणासाठीं होणारी जी पशुहत्या तिला आळा घालण्यासाठीं वेदानें 'यज्ञांत पशुवध करावा' असा निर्बंध घालून ठेविला. २ त्यांतहि त्यानें अनेक प्रतिबंध ठेविले आहेत. देश, काल, वर्तमान, मंत्र, तंत्र विधि-विधान व द्रव्य हीं सर्व पवित्र असावींत. ३ कर्ता इतका सशक्त असावा कीं, त्याच्या मुठीच्या एका प्रहारानेंच पशूनें प्राण सोडिला पाहिजे. तो जर में में करून ओरडला तर उलट प्रायश्चित्त घ्यावें लागतें. ४. वेदानें असे अनेक अवघड नियम घालून ठेविले आहेत. अत्यंत उग्र प्रायश्चित्तें सांगून ठेविलीं आहेत. तरीहि सकाम महामूढ लोक पशुवध करावयास धांवत असतात. ५ अशाप्रकारें पशुयज्ञ केल्यावर त्या मांसाचा केवढा विभाग घ्यावा, त्याचेंहि प्रमाण सांगून ठेविलें आहे. दाताला लागणार नाहीं, इतकें मांस भक्षण करावें. ६ आपला भाग मोठ्या चवीनें खाणारासहि वेदानें प्रायश्चित्त सांगितलें आहे. अशाप्रकारें वेदांत अनेक निर्बंध घालून ठेविले आहेत. ७ यावरून मांसभक्षण करावें अशी वेदाज्ञा नसून त्यापासून निवृत्त व्हावें यासाठीं यज्ञाचें विधान आहे, हें उघड होतें. ८ हवा तेव्हां पशु मारितां येऊं नये म्हणून यज्ञांत पशुवध सांगितला आहे आणि मांसभक्षणाला आळा घालण्यासाठीं यज्ञभागाचें प्रमाण नेमून दिलें; ९ हेंहि वेदाचें सांगणें कामासक्त मूर्खलोकांसाठीं आहे. वास्तविक पशुहिंसा करूं नये व मांसभक्षण वर्ज करावें हेंच वेदाचें खरें गुह्य आहे. ३१०.

**हिंसाविहाराः हि खलाः**–अज्ञत्वामुळेंच हिंसेनें ज्यांची क्रीडा चालते असे दुष्ट, **स्वसुखेच्छया**–आपल्या सुखाच्या इच्छेनें, **आलब्धैः पशुभिः**–हिंसा केलेल्या पशूंनीं, **यज्ञैः**–व हिंसाप्रचुर यज्ञांनीं, **देवताः पितृ–भूतपतीन् यजन्ते**–देवता, पितर व भूतपति यांचें यजन करितात. ३०.

न मानूनि वेदविधानासी । पशुहननीं क्रीडा ज्यांसी । अविधि मारूनि पशूंसी । मिरविती श्लाघेसी याज्ञिकत्वें ॥ ११ ॥ अविधि करूनि जीवहनन । तेणें पशूनें करिती यज्ञ । पितृदेवभूतगण । करिती यजन सुखेच्छा ॥ १२ ॥ बापडें बीज पेरिल्या शेतीं । पिकास नाडले निश्चितीं । शेखीं निजबीजा नागवती । राजे दंडूनि घेती करभार ॥ १३ ॥ तैशी अविधी याज्ञिकांची गती । स्वर्ग स्वप्नींही न देखती । थित्या नरदेहा नागवती । शेखीं दुःख भोगिती यमदंडें ॥ १४ ॥ वृथा पशूंस दुःख देती । तेणें दुःखें स्वयें दुःखी होती । ऐसी याज्ञिकांची गती । आश्चर्य श्रीपति सांगत ॥ १५ ॥

स्वप्नोपममनुं लोकमसन्तं श्रवणप्रियम् । आशिषो हृदि सङ्कल्प्य त्यजन्त्यर्थान्यथा वणिक् ॥ ३१ ॥

स्वप्न दिसे सवेंचि नासे । तेवीं काल्पनिक जग भासे । येथ सकाम कामनापिसें । स्वर्ग विश्वासें मानिती सत्य ॥ १६ ॥ मुळींच मिथ्या मृगजळ । त्यामाजीं शीतळ जळ । थाया घेऊनि मागे बाळ । तैसे सकाम केवळ स्वर्गालागीं ॥ १७ ॥ पिंपळावरून मार्ग आहे । ऐकोनि रुखा वेंघों जाये । तो जेवीं भ्रमें गुंतोनि राहे । तेवीं स्वर्गश्रवणें होय सकाम ॥ १८ ॥ स्वधर्ममार्गीं चालावया नर । वेदू स्वर्ग बोले अवांतर । ते फांटां भरले अपार । स्वर्गतत्पर सकाम ॥ १९ ॥ वाट पिंपळावरी ऐकोनी । शाहाणा चाले मार्ग लक्षोनी । अश्वत्थ सांडी डावलोनी । तो पावे स्वस्थानीं संतोषें ॥ ३२० ॥ तेवीं स्वधर्माच्या अनुष्ठानीं । जो सांडी स्वर्गफळें उपेक्षूनी । तो चित्तशुद्धीतें पावोनी । ब्रह्मसमाधानीं स्वयें

---

वेदविधीला प्रमाण न मानितां ज्यांस पशुवधांत मोठी मौज वाटते, ते अविधीनें पशूचा जीव घेऊन याज्ञिकत्वाची मोठी प्रौढि मिरवितात. ११ अविधीनें जीवहिंसा करून त्या पशूनें यज्ञ करितात आणि पितृ-देव-भूतगण यांना खुशाल हविर्भाग अर्पण करितात; १२ पण पोकळ बियाणें शेतांत पेरिलें तर त्याला अंकुरहि फुटत नाहीं, तें बीं मात्र वायां जातें व वर आणखी सारा भरावा लागतो तो वेगळाच ! १३ अशी या सगळ्या याज्ञिकांची स्थिति होते. त्यांना स्वर्गसुख स्वप्नांतहि दिसत नाहीं, पण असलेल्या नरदेहाला मुकतात व शेवटीं भयंकर यमयातना भोगतात. १४ पशूला व्यर्थ क्लेश देतात. व त्यामुळें स्वतः दुःखी होतात अशी याज्ञिकांची स्थिति होते; श्रीपति आतां हेंच आश्चर्य स्वतः सांगत आहे. ३१५.

—शिवाय ते मतिमंद असतात, असें सांगतात—

यथा वणिक्—ज्याप्रमाणें वैश्य समुद्रतरणादि साहसांनीं अधिक धनप्राप्तीच्या लोभानें जवळ असलेलें धन भांडवलाच्या रूपानें व्यापारांत अडकवितात, त्याप्रमाणें हे मंदमति कर्मठ स्वप्नोपमं असन्तं श्रवणप्रियं अमुं लोकं आशिषः च हृदि संकल्प्य अर्थान् त्यजन्ति—स्वप्नाप्रमाणें असलेला, म्हणूनच क्षणभंगुर, पण ऐकण्यास मोठा गोड, असा त्या परलोकाविषयीं व त्या लोकांतील कामांविषयीं या लोकीं संकल्प करून ( निश्चय करून नव्हे, तर नुसता संकल्प करून ) आपल्यापाशीं असलेल्या किंवा याचना वगैरे करून संपादन केलेल्या धनाचा कर्मांत विनियोग करितात. [ पण दृष्टान्तांतील वैश्याप्रमाणेंच ते उभयभ्रष्ट होतात. म्ह० धनहि जातें व सुखहि मिळत नाहीं, असा भावार्थ ] ३१.

स्वप्न दिसतें व तें तत्काल जसें नाहींसें होतें, तसें हें काल्पनिक जगत् भासतें; परंतु कामनेच्या वेडानें विषयासक्त लोक स्वर्ग सत्य आहे असें खात्रीनें समजतात. १६ आधींच मिथ्या मृगजळ, त्यांतील गार पाणी प्यावयास मागून त्यासाठीं मुलानें जसा हट्ट घ्यावा तसा सकाम लोकांचा हा स्वर्गाचा छंद आहे. १७ 'पिंपळावरून मार्ग आहे' हें ऐकून एखाद्या मूर्खानें जसें पिंपळाच्या झाडावर लगबगीनें चढून तेथेंच भ्रमानें गोंधळून पडावें तशीच या सकाम लोकांची स्वर्गाचें वैभव ऐकून स्थिति होते. १८ मनुष्यानें स्वधर्माच्या मार्गानें चालावें म्हणून वेदानें स्वर्ग-सुखाचें आमिष लावून ठेविलें आहे. पण सकाम लोक त्यालाच भाळतात व स्वर्गप्राप्तीच्या मागें लागतात. १९ 'पिंपळावरून रस्ता जातो ' हें वाक्य ऐकून शहाणा मनुष्य त्या दिशेनें चालूं लागतो व पिंपळाच्या बाजूनें जाऊन सरळ मोठ्या समाधानानें स्वस्थानीं पोंचतो. ३२० त्याप्रमाणें स्वधर्माचरण करणारा मनुष्य स्वर्गसुखाची उपेक्षा करून,

**पावे ॥ २१ ॥ या सांडूनि स्वधर्ममार्गासी । श्रवणप्रिय स्वर्गसुखासी । सकाम भुलले त्यासी । जेवीं घंटानादासी मृग लोधे ॥ २२ ॥ तेवीं जन्मोनि कर्मभूमीसी । वेंचूनि धनधान्यसमृद्धीसी । थित्या नाडले नरदेहासी । स्वर्गसुखासी भाळोनी ॥ २३ ॥ जैसा कोणी एक वाणी । जुनी नाव आश्रयोनी । द्वीपांतरींचा लाभ ऐकोनी । न विचारितां मनीं समुद्र रिघे ॥ २४ ॥ उन्मत्त कर्णधाराचे संगतीं । फुटकी नाव धरोनि हातीं । घेऊनियां सकळ संपत्ती । रिघे कुमती महार्णवीं ॥ २५ ॥ तो जेवीं समुद्रीं बुडे । तैसेंचि सकामांसी घडे । स्वर्ग वांछितां बापुडे । बुडाले रोकडे भवार्णवीं ॥ २६ ॥ वांछितां स्वर्गसुखफळ । बुडालें स्वधर्मवित्त सकळ । बुडालें चित्तशुद्धीचें मूळ । बुडालें मुद्दल नरदेह ॥ २७ ॥ एव्हडें हानीचें कारण । देवो सांगत आपण । सकामतेसी मूळ गुण । तेंही लक्षण स्वयें सांगे ॥ २८ ॥**

रजःसत्त्वतमोनिष्ठा रजःसत्त्वतमोजुषः । उपासते इन्द्रमुख्यान् देवादीन्न तथैव माम् ॥ ३२ ॥

**रजतमांचेनि उन्मत्तें । सत्त्व संकीर्ण होय तेथें । तेव्हां रजतमांचेनि संमतें । काम चित्तातें व्यापूनि खवळे ॥ २९ ॥ अतिकाम खवळल्या चित्तीं । गुणानुसारें विषयीं प्रीती । तेव्हां सकामाची संगती । धरी निश्चितीं भावार्थें ॥ ३३० ॥ सकामसंगती साचार । कामकर्मीं अत्यादर । स्वर्गभोगीं महातत्पर । यजी देव पितर प्रमथादिक ॥ ३१ ॥ मी सर्वात्मा सर्वेश्वर । त्या माझ्या ठायीं अनादर । कामलंपटत्वें नर । देवतांतर उपासिती ॥ ३२ ॥ म्हणसी देवतांतर जें कांहीं । तें तूंचि पैं गा सर्वही । हा ऐक्यभावो नाहीं । भेदबुद्धी पाहीं विनियोग ॥ ३३ ॥ इंद्रादि देवद्वारा जाण । मीचि होय गा प्रसन्न । त्या माझ्या**

---

तें टाकून देतो व त्याची चित्तशुद्धि होऊन तो स्वतःच आत्मसमाधानाला प्राप्त होतो. २१ हा सरळ स्वधर्ममार्ग सोडून जो सकाम मनुष्य ऐकण्यास गोड वाटणाऱ्या स्वर्गसुखाच्या वर्णनाला भाळतो, त्याची घंटानादाला भाळलेल्या हरिणासारखी स्थिति होते. २२ ( हा दृष्टान्त पूर्वार्धांत अ. ८ श्लो. ४३ पृ. १६७ वर सविस्तर दिला आहे. ) त्या मृगाप्रमाणेंच सकाम पुरुष या पृथ्वीवर जन्म घेऊन, आपला धनधान्याचा संग्रह खर्च करून, स्वर्गसुखाला भाळतो व अनायासानें लाभलेल्या या नरदेहाला व्यर्थ मुकतो. २३ ज्याप्रमाणें एखादा वाणी व्यापारासाठीं जुनें मोडकें जहाज घेतो व 'परद्वीपाला गेल्यानें अत्यंत लाभ होतो,' हें ऐकून, विचार न करितां, जलप्रवासाला निघतो, २४ त्या मोडक्या जहाजांत आपली सगळी संपत्ति भरून नावाड्याच्या संगतीनें तो मूर्ख समुद्रांत नाव घालितो. २५ व सर्वस्वासह बुडतो. सकामांची स्थिति तशीच होते. स्वर्गाची इच्छा करून बापडा संसारसागरांत बुडतो. २६ स्वर्गसुख, याच फलाची इच्छा केल्यामुळें चित्तशुद्धीच्या मुळासह त्याची स्वधर्मरूप सगळी संपत्ति व नरदेहाचें भांडवल साफ बुडतें. २७ सकामतेचे त्रिविध गुणच इतकी हानि होण्याचें मूळ कारण आहे. त्याचेंहि लक्षण देव स्वतः सांगत आहे. ३२८.

**रजःसत्त्वतमोनिष्ठाः तथा एव रजःसत्त्वतमोजुषः इंद्रमुख्यान् देवादीन् उपासते**–रज, सत्त्व व तम या गुणांच्या कार्यामध्यें तत्पर असलेले कर्मठ आपल्याला अनुरूप अशा रज, सत्त्व व तम या त्रिगुणांच्या कार्यांचेंच सेवन करणाऱ्या इंद्रादि देवांची उपासना करितात. **मां न**–पण गुणातीत असलेल्या माझी उपासना करीत नाहींत. [ इंद्रादि देव माझेच अंश आहेत, त्यामुळें त्यांची उपासना ही माझीच उपासना आहे, हे जरी खरें असलें तरी भेददृष्टीमुळें त्यांची उपासना यथाविधि होत नाहीं, असा भावार्थ ] ३२.

रजोगुण व तमोगुण अत्यंत वाढले असतां सत्त्वगुणहि त्यांत मिसळतो. त्या वेळीं रज-तमाच्या संमतीनें काम चित्ताला व्यापून खवळून जातो. २९ चित्तांत काम अतिशय खवळला म्हणजे गुणानुसार त्याची विषयांवर प्रीति जडते. तेव्हां निश्चयानें व प्रीतीनें तो सकामाची संगत धरितो. ३३० वास्तविक सकामाच्या संगतीनेंच काम्यकर्मीविषयीं अति आदर वाटूं लागतो व स्वर्गभोगाविषयीं अत्यंत तत्पर होऊन देव, पितर, भूत-पिशाचादिकांचें यजन करितो. ३१ मी जो सर्वात्मा, सर्वेश्वर त्या माझा अनादर करून विषयासक्तीनें इतर देवतांची उपासना करितात. ३२ तूं यावर असें म्हणशील कीं, इतर सर्व देवताहि तूंच आहेस; तर त्या उपासकांचा असा ऐक्यभाव नसतो. ते भेदबुद्धीनेंच सर्व अनुष्ठान करीत असतात. ३३ इंद्रादि देवतांच्या द्वारां वस्तुतः मीच प्रसन्न होत असतों; परंतु त्यांचें मन

**ठायीं नाहीं भजन । सकाम मन स्वर्गार्थी ॥ ३४ ॥ दृढ कामना जडली चित्तीं । सांगतां स्वर्ग पुनरावृत्ती । तेही हितत्वें मानिती । ऐक निश्चितीं अभिप्रावो ॥ ३५ ॥**

इष्ट्वेह देवता यज्ञैर्गत्वा रंस्यामहे दिवि । तस्यान्त इह भूयास्म महाशाला महाकुलाः ॥ ३३ ॥

**जे कर्मभूमीसी मनुष्य झाले । ते सहजें मोक्षाधिकारा आले । तेथही कामना नागविले । स्वर्गार्थ भजले देवतांतरां ॥ ३६ ॥ स्वर्गभोगीं ठेवूनी मन । नाना यागीं करिती यजन । तेणें दिविभोग पावेन । हा निश्चय जाण याज्ञिकां ॥ ३७ ॥ काळें भोगक्षयाच्या पतनीं । तेही घेती हितत्वें मानोनी । सर्वेचि इहलोकीं जन्मोनी । ब्राह्मणपणीं सुशील ॥ ३८ ॥ वेद वेदांग अध्ययन । धनधान्यें अतिसंपन्न । आम्ही विख्यात गृहस्थ होऊन । क्षीणपुण्य स्वर्गस्थ ॥ ३९ ॥ नेणोनि वेदार्थनिजस्थिती । ऐसऐशिया उपपत्ती । सकामी भुलले निश्चितीं । ऊंस सांडूनि मागती कणीस त्याचें ॥ ३४० ॥**

एवं पुष्पितया वाचा व्याक्षिप्तमनसां नृणाम् । मानिनां चातिस्तब्धानां मद्वार्तापि न रोचते ॥ ३४ ॥

**फल सांडूनि फूल खाये । तैसा परिपाक याज्ञिकां होये । स्वर्गकामाचेनि उपायें । अपायीं स्वयें पडताती ॥ ४१ ॥ अवघा संसार काल्पनिक । तेथ सत्य कैंचें स्वर्गसुख । परी श्रवणमात्रें देख । भुलले मूर्ख स्वर्गसुखा ॥ ४२ ॥ जैसा नपुंसक वांछी स्त्रीसुख । परी संग तया कैंचा देख । मुळींच**

---

माझ्याकडे नसतें. तें स्वर्गासाठीं लोलुप असतें. ३४ त्यांच्या मनांत कामना इतक्या दृढ बिंबलेल्या असतात कीं, स्वर्गप्राप्तीनें जन्म-मरणांची पुनरावृत्ति होत असते, असें त्यांना सांगितलें तरी तेंहि हितकरच वाटतें. त्याचेंहि कारण सांगतों, ऐक. ३३५.

—वर श्लो. ३१- 'हृदि संकल्प्य' असें म्हटलें आहे. यास्तव आतां तोच त्यांचा संकल्प सांगतात—

**इह यज्ञैः देवताः इष्ट्वा दिवि ( गत्वा ) रंस्यामहे**—या लोकीं यज्ञांच्या योगानें देवतांचें यजन करून व स्वर्गलोकीं जाऊन आम्ही रममाण होऊं. **तस्य अन्ते इह महाशाला-महाकुलाः भूयास्म**—आणि त्या भोगाच्या शेवटीं या लोकीं पुनः महागृहस्थ व महाकुलोत्पन्न होऊं, असे संकल्प ते करितात. ३३.

जे प्राणी या मृत्युलोकीं मनुष्यजन्म घेतात, ते स्वभावतःच मोक्षाचे अधिकारी असतात. पण कामनेमुळें ते नाडले जातात व स्वर्गाच्या लोभानें इतर देवतांची उपासना करितात. ३६ स्वर्गभोगांमध्यें लक्ष ठेवून अनेक प्रकारचे यज्ञ-याग करून यजन करितात व त्यानें स्वर्गांतील सुख मिळेल अशी याज्ञिकांची खात्री असते. ३७ कालान्तरानें पुण्यक्षय होतांच स्वर्गांतून खालीं पतन होतें. हें देखील ते हितावहच समजतात. कारण ज्यांचें पुण्य क्षीण झालें आहे असे ते स्वर्गांतील जीव आम्ही पुनः इहलोकीं जन्म घेऊन सच्छील ब्राह्मण व्हावें, ३८ वेद-वेदांगाचें अध्ययन करावें व धनधान्यानें संपन्न होऊन प्रसिद्ध गृहस्थ होऊन रहावें; अशी इच्छा करितात. ३९ वेदार्थाचा खरा अर्थ न जाणतां ते सकाम लोक अशा भलत्याच कल्पनेला भाळतात आणि ऊंस टाकून त्याचें वाढें मागतात. ३४०.

—पण त्यामुळें पुढें काय होतें, तें सांगतात—

**एवं पुष्पितया वाचा व्याक्षिप्तमनसां मानिनां अतिस्तब्धानां च नृणां मद्वार्ता अपि न रोचते**—अशाप्रकारें पुष्पित वृक्षाप्रमाणें रमणीय वाटणाऱ्या वाणीनें ज्यांचें चित्त विक्षिप्त झालें आहे, जे अतिशय मानी व अतिशय अनम्र आहेत अशा कर्मठ पुरुषांना माझी वार्ताहि रुचत नाहीं. ( अर्थात् त्यांचें चित्त मत्प्रवण झालेलें नसल्यामुळें तें नित्य संसारी होतात, असा याचा भावार्थ. ) ३४.

फळ टाकून जसें फूल खावें तसा याज्ञिकांचा प्रकार होतो. ते स्वर्गाच्या इच्छेनें जे उपाय करितात, त्यांनीं स्वतःलाच अपाय करून घेतात. ४१ सगळा संसार जर काल्पनिक आहे तर स्वर्गसुख सत्य कसें असणार ! पण केवळ ऐकिव गोष्टींवर ते महामूर्ख स्वर्गसुखाला कसे भाळतात पहा ! ४२ एखाद्या नपुंसकानें स्त्रीसुखाची इच्छा

# यदुराजाला अवधूतदर्शन

कोणी एक अवधूतु । निजतेजें प्रकाशवंतु
ब्रह्मानंदें डुल्लतु । यदूनें येतु देखिला ।।
त्या अवधूताचें लक्षण । यदु निरीक्षी आपण ।
देखिलें ब्रह्मसूत्रधारण । होय ब्राह्मण ब्रह्मवेत्ता ।।
ऐसा तो अवधूतु । निर्भय निःशंक वर्ततु ।
यदु व्याहाळिये होता जातु । देखिला वनांतु सन्मुख ।।

अध्याय ७ वा. २५८-५९-६०

# उद्धवाची आनंदावस्था



तंव धवधवीत घनसांवळा । मुकुट कुंडलें मेखळा ।
कांसे झळके कसिला सोनसळा । आपाद वनमाळा शोभत ।।
अंतरीं भोगी चैतन्यघन । बाहेरी उघडितां नयन ।
आनंदविग्रही श्रीकृष्ण । मूर्ति संपूर्ण संमुख देखे ।।

अध्याय २१ ना. ५१९–२०

नाहीं बीजारोप । मा कैंचा कामसाटोप तयासी ।। ४३ ।। परी लटिकाचि तडतडां उडे । कष्टोनि व्यर्थचि पहुडे । परी तया नसे भगभोग रोकडे । तैसे स्वर्ग फुडे प्राणिया ।। ४४ ।। गव्हांचा जो प्रथम मोडू । तोंडीं घालितां लागे गोडू । परि जाणे पिकाचा निवाडू । तो ते मोडू उपडीना ।। ४५ ।। पालेयाची चवी घेतां । गव्हांची गोडी न लगे तत्त्वतां । मग पाला पाळूनि स्वभावतां । शेवटीं रडता गव्हांचि-कारणें ।। ४६ ।। तेवीं वेदू बोलिला स्वर्गफळ । तें स्वधर्माचें कोंवळें मूळ । तें उपडूनि खातां तत्काळ । मोक्षफळ अंतरे ।। ४७।। हें जाणती जे सज्ञान । ते स्वर्गासी नातळती आपण । परी मूर्खाचें सकामपण । अनिवार जाण अतिशयें ।। ४८ ।। कामाचिया लोलंगती । सदा सकाम कर्मे करिती । तेणें जन्ममरणांचे आवर्तीं । पडले नुगंडती आकल्प ।। ४९ ।। त्यांसी हित सांगती साधुजन । ते न मानिती संतवचन । आम्हीं वेदार्थें सज्ञान । हा ज्ञानाभिमान अतिगर्वें ।। ३५० ।। मी भगवंत नियंता सृष्टी । हे वेदें दाविल्या नावडे गोष्टी । निष्कामता कपाळउठी । सकाम पोटीं सुबद्ध ।। ५१ ।। एवं वेद मानूनि प्रवृत्तिपर । ठकले सकळ सकाम नर । तोचि वेदार्थ ब्रह्मपर । स्वयें श्रीधर सांगत ।। ५२ ।।

वेदा ब्रह्मात्मविषयास्त्रिकाण्डविषया इमे । परोक्षवादा ऋषयः परोक्षं मम च प्रियम् ।। ३५ ।।

---

केल्यास ती व्यर्थ होते; कारण जेथें मूळ बीजाचीच उत्पत्ति नाहीं तेथें कामाचा खटाटोप कोठचा ! ४३ पण तो मोठ्या आवेशानें विषयभोग घेण्यास उठतो आणि फुकट कष्ट करून निवृत्त होतो. तसा प्राण्याचा स्वर्ग फुकट आहे. ४४ गव्हांचा पहिलाच कोंब तोंडांत घातला तर फार गोड लागतो, पण ज्याला पिकांचें महत्त्व कळतें, तो कोंब उपटून खात नाहीं. ४५ पाल्याची चव घेतली असतां त्यांत गव्हाची गोडी येत नाहीं. हें जाणूनहि जो पाल्याचाच संग्रह करीत बसतो, त्याला अखेर गव्हासाठीं जसें रडत बसावें लागतें, ४६ त्याप्रमाणें वेदानें जें स्वर्गफल सांगितलें आहे, तो स्वधर्माचा कोंवळा अंकुर आहे. तेंच उपटून जर खाल्लें तर अर्थात् मोक्षफल तत्काल अंतरतें. ४७ जे विवेकी लोक हें जाणतात, ते स्वर्गसुखाला स्पर्शहि करीत नाहींत, पण मूर्खांची विषयतृष्णा अनिवार असते. ४८ ते कामाच्या आसक्तीनें निरंतर सकाम कर्मे करीत असतात. त्यामुळें जन्म-मरणांच्या भोंवऱ्यांत जे सांपडतात ते कल्पान्तापर्यंत त्यांतून बाहेर पडत नाहींत. ४९ साधु-संतांनीं त्यांना हिताची गोष्ट सांगितली तरी ते संतवचन मानीत नाहींत. कारण आम्ही वेदाचा अर्थ जाणणारे पंडित आहोंत या ज्ञानाभिमानानें ते अत्यंत गर्विष्ठ झालेले असतात. ३५० 'मी भगवान् सृष्टीचा नियंता आहें,' असें वेदानें दाखविलें असतांहि त्यांना तें रुचत नाहीं. निष्काम कर्म म्हटलें कीं, त्यांचें कपाळच उठतें. इतकी त्यांच्या मनांत कामना दृढ झालेली असते. ५१ याप्रमाणें वेदाला प्रवृत्तिपर समजून सगळे सकाम लोक फसले आहेत. त्याच वेदाचा ब्रह्मपर अर्थ स्वतः श्रीकृष्ण सांगत आहे. ३५२.

—याप्रमाणें वेदांच्या प्रवृत्तिपरत्वाचें निराकरण करून प्रकृत निवृत्तिपरत्वाचा उपसंहार करितात—

**इमे त्रिकाण्डविषयाः वेदाः ब्रह्मात्मविषयाः**—कर्मकांड, ब्रह्मकांड व देवताकांड हीं तीन कांडें हा ज्यांचा विषय आहे असे हे वेद ब्रह्मात्मविषय आहेत म्ह० ब्रह्मच आत्मा आहे, तो संसारी नव्हे, हें सांगण्यांत ते तत्पर आहेत. [ 'ते कर्मादिपर नाहींत' ही गोष्ट प्रतीत होण्यासाठीं वर तेविसाव्या श्लोकांत सांगितलेल्या कारणाचें स्मरण देतात—] **ऋषयः परोक्षवादः**—कारण ऋषि म्ह० मंत्र व मंत्रद्रष्टे हे परोक्षवाद करणारे आहेत. **कारण, परोक्षं च मम प्रियं**—आणि परोक्षच मला प्रिय आहे. [ परोक्ष म्ह० अस्पष्टकथन. ज्याचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, त्यांनाच खरा वेदार्थ कळावा, इतर अनधिकाऱ्यांना कळूं नये. कारण तो अनधिकाऱ्यांना कळल्यास ते कर्मत्याग करून स्वार्थापासून भ्रंश पावतील. वास्तव मला परोक्षप्रिय आहे व ऋषीहि मला प्रिय असलेलें परोक्षच सांगतात. अपरोक्ष सांगत नाहींत. ] ३५.

**कर्मकांड उपासना ज्ञान । इंहीं त्रिकांडीं वेदू आपण । चित्तशुद्धिद्वारा जाण । ब्रह्मसंपन्न जीव करी ॥ ५३ ॥ पारधी लावून बडिशपिंडी । मीनांसी जळाबाहेर काढी । तेवीं दावूनि स्वर्गसुखगोडी । वेद जीवास ओढी परमार्थीं ॥ ५४ ॥ परोक्षवाद वेदव्युत्पत्ती । त्यागमुखें गा अन्योक्ती । सांडविली विषयासक्ती । ब्रह्मप्राप्तीलागूनी ॥ ५५ ॥ हें जाणोनि वेदार्थगुह्यज्ञान । जो जीव झाला ब्रह्मसंपन्न । तेथ कर्मकर्ता मिथ्या जाण । आश्रमवर्ण मग कैंचे ॥ ५६ ॥ तेथ कैंचें ध्येय ध्याता ध्यान । कैंचें ज्ञेय ज्ञाता ज्ञान । नाहीं भज्य भजक भजन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥५७॥ तेथ कैंचें कर्म कर्माचरण । कैंचा वेद वेदाध्ययन । कैंचें साध्य आणि साधन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५८ ॥ तेथ कैंचे दोष कैंचें गुण । कैंचें पाप कैंचें पुण्य । कैंचें जन्म कैंचें मरण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५९ ॥ तेथ कैंचा भेदू कैंचा बोधू । कैंचा मोक्ष कैंचा बंधू । सदोदित परमानंदू । हा वेदार्थ शुद्ध उद्धवा ॥ ३६० ॥ या वेदार्थाचें निरूपण । प्रकट करितां आपण । निजस्वार्था नायकती जन । यालागीं जाण म्यां गुप्त केलें ॥ ६१ ॥ हें वेदार्थाचें गुह्य सार । मज गुप्ताचें गुप्त भांडार । तुझा देखोनि अधिकार । म्यां साचार सांगीतलें ॥ ६२ ॥ हा गुह्यार्थ करितां प्रकट । सांडोनि कर्ममार्गाची वाट । कर्म ब्रह्म उभय भ्रष्ट । होतील नष्ट अनधिकारीं ॥ ६३ ॥ हें जाणोनि ज्ञाते ऋषीश्वरीं । वेदार्थनिरूपणकुसरी । हा मुख्यार्थ झांकोनि निर्धारी परोक्षावरी व्याख्यान ॥ ६४ ॥ सकळलोकहितार्थ । माझेंही हेंचि मनोगत । परोक्षवाद गोड लागत । लोकसंग्रहार्थ उद्धवा ॥ ६५ ॥ मीही लोकसंग्रहार्थ । अकर्ता कर्में आचरत । वेदार्चें जें परोक्ष मत । मी स्वयें राखित लोकहिता ॥ ६६ ॥ त्या वेदाचें स्वरूप गहन । अतर्क्य अलक्ष्य अगम्य जाण । तेंचि अर्थीचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६७ ॥**

---

कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड या तीन कांडांनीं चित्तशुद्धीच्या द्वारां वेद स्वभावतःच जीवाला ब्रह्मसंपन्न करितो. ५३ कोळी गळाला मांसाचें आमिष लावून माशांना जसा पाण्याबाहेर काढितो, तसा वेद स्वर्गसुखाची गोडी दाखवून जीवांना प्रपंचांतून बाहेर काढून परमार्थांत ओढितो. ५४ वेदविभाग हा परोक्षवाद आहे. त्यानें त्यागाच्या द्वारां अन्योक्तीनें ब्रह्मप्राप्ति होण्यासाठीं विषयासक्ति सोडविली आहे. ५५ हा वेदाचा गुह्य अर्थ जाणून जो जीव ब्रह्मरूप होतो, तेथें कर्म करणाराच मिथ्या होतो. मग तेथें वर्णाश्रम कोठून रहाणार ! ५६ तेथें ध्येय-ध्याता-ध्यान; ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान; भज्य भक्त-भजन; हीं सर्व कोठलीं ! परिपूर्ण ब्रह्मच पूर्णपणें भरलेलें असतें ! ५७ तेथें कर्म-कर्माचरण; वेद-वेदाध्ययन; साध्य-साधन; ५८ गुण-दोष; पाप-पुण्य; जन्म-मरण; ५९ भेद-ऐक्य; मोक्ष-बंध इत्यादि सर्व नाहींसें होऊन सदोदित परमानंद भरून रहातो. ३६० उद्धवा ! हाच वेदाचा शुद्ध अर्थ आहे. पण हा वेदार्थ स्पष्ट केला तर लोक स्वतःच्या स्वार्थासाठीं तो ऐकणार नाहींत. म्हणून मी हा अर्थ गुप्त ठेविला आहे. ६१ तें हें वेदार्थाचें सार माझ्या गुह्याचें गुप्त भांडार तुझा अधिकार पाहून मीं तुला सांगितलें. ६२ हा गूढ अर्थ उघड करून सांगितला असतां लोक कर्ममार्ग सोडतील व कर्म आणि ज्ञान या दोहोंला मुकून ते अनधिकारी नाश पावतील. ६३ हें जाणून ज्ञात्या श्रेष्ठ मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं वेदार्थाचें निरूपण मोठ्या खुबीनें करून ठेविलें आहे. त्यांनीं मुख्य अर्थ झांकून ठेवून प्रपंचपर अर्थ सांगितला. सर्व लोकांच्या हितासाठीं माझेंहि मत तसेंच आहे. ६४ उद्धवा ! लोकसंग्रहासाठीं परोक्षवादच हितावह आहे. ६५ मी देखील लोकसंग्रहासाठींच अकर्ता असूनहि कर्में करितों आणि वेदाचा जो खरा अर्थ तो मी स्वतः लोकहितासाठीं गुप्त ठेवितों. ६६ त्या वेदाचें स्वरूप मोठें गहन, अतर्क्य, अलक्ष्य आणि अगम्य आहे. याच अर्थाचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ३६७.

शब्दब्रह्म सुदुर्बोधं प्राणेन्द्रियमनोमयम् । अनन्तपारं गम्भीरं दुर्विगाह्यं समुद्रवत् ॥ ३६ ॥

माझी वेदरूप जे बोली । शब्दतः अर्थतः अगाध खोली । ब्रह्मादिकां भुली पडली । मर्यादा केली न वचेचि ॥ ६८ ॥ बाहीं न तरवे समुद्र । तेवीं स्वमतीं न कळे वेदपार । येचि अर्थीं नाना ऋषीश्वर । युक्तीचे संभार वेंचिलें ॥ ६९ ॥ परी एवंविध तत्त्वतां । हे वेदवादाची कथा । न येचि कोणाचेही हाता । अर्थतः शब्दतः दुर्ज्ञेय ॥ ३७० ॥ ज्याची शब्दवाचकता । स्वरवर्णें शुद्ध न ये हाता । त्याची अर्थावबोधकता । अगम्य सर्वथा सुरनरां ॥ ७१ ॥ पूर्वीं हाचि वेद अनुच्छिष्ट । म्यां ब्रह्मयाहातें करविला पाठ । तेणेंही नेणोनियां स्पष्ट । कर्मीं कर्मठ होऊनि ठेला ॥ ७२ ॥ ते कर्मक्रिया अतिगोमटी । शंखें हरिली उठाउठी । ब्रह्मा विसरला वेद-गोठी । पडलें सृष्टिकर्मा ध्य ॥ ७३ ॥ तो करावया वेदोद्धार । म्यां मर्दिला शंखासुर । सकळ श्रुतींचा संभार । ब्रह्मयासी साचार दीधला ॥ ७४ ॥ म्यां वेद ठेविले ब्रह्मयापुढें । तो पूर्व स्मरेना धडफुडें । तेव्हां चाकाटलें बापुडें । केवळ वेडें होऊनि ठेलें ॥ ७५ ॥ त्या वेदभागालागीं जाण । ऋषीं वेंचिलें निजज्ञान । शाखोपशाखीं रावण । वेदविभाग करूं आला ॥ ७६ ॥ परी इत्थंभूत तत्त्वतां । माझ्या वेदविभागाची वार्ता । न येचि कोणाचिये हाता । जाण सर्वथा उद्धवा ॥ ७७ ॥ तो मी वेदस्थापक श्रीहरी । लोक

---

—' अहोपण , वेदज्ञ असलेलेहि जैमिन्यादिक वेदाचें ब्रह्मपरत्व कां सांगत नाहींत ! ' अशी आशंका घेऊन भगवान् ' मजवांचून दुसरा कोणीहि वेद व वेदार्थ तत्त्वतः जाणत नाहीं ' अशा आशयानें अध्यायसमाप्तीपर्यंत तिचें समाधान सांगतात—

शब्दब्रह्म सुदुर्बोधं–शब्दब्रह्म म्ह० वेद स्वरूपतः व अर्थतः अत्यंत दुर्बोध आहे. ( तें शब्दब्रह्म सूक्ष्म व स्थूल असें दोन प्रकारचें आहे. त्यांतील सूक्ष्म तर स्वरूपतःहि दुर्ज्ञेय आहे असें सांगतात– ) प्राणेंद्रिय मनोमयं–प्रथम परासंज्ञक प्राणमय, त्या-नंतर पश्यन्तिसंज्ञक मनोमय, नंतर मध्यमाख्य इंद्रियमय; कारण तें वागिंद्रियानें व्यक्त होत असल्यामुळें त्याला वागिंद्रियप्रधानत्व आहे. तसेंच, अनंतपारं–समष्टिप्राणादिमय व निर्विशेष अशा त्या शब्दब्रह्माचा कालतः व देशतः परिच्छेद होत नाहीं, म्हणून तें अनंतपार आहे. ( अर्थतःहि त्याचें दुर्विज्ञेयत्व सांगतात– ) गंभीरं–त्याचा अर्थ अत्यंत गूढ आहे. अतः समुद्रवत् दुर्वि-गाह्यं–त्यामुळेंच समुद्राप्रमाणें तें सर्वथा प्रवेश न करितां येण्यासारखें आहे. [ याविषयीं ' चत्वारी वाक्-परिमिता पदानि ' इत्यादि श्रुति प्रमाण आहे. तिचा अर्थ–ज्यांच्या योगानें परम तत्त्वाचें ज्ञान होतें अशीं शब्दब्रह्माचीं चार रूपें आहेत. त्यांना अंतर्दृष्टि पुरुषच जाणतात. बाह्यदृष्टि पुरुष जाणत नाहींत. कारण त्याचीं तीन पदें म्ह० रूपें देहांत गुप्त आहेत. तीं स्वरूपाला प्रकाशित करीत नाहींत. म्हणून मनुष्य केवळ वाणीचा वैखरीरूप चवथा भाग बोलतात. पण तोहि नुसता बोलतात. तत्त्वतः जाणत नाहींत. ] ३६.

माझें वेदवचन शब्दतः व अर्थतः फार खोल आहे. त्याविषयीं ब्रह्मदेवादिकांनाहि भ्रम पडतो. कारण त्यांच्या-नेंहि वेदमर्यादेबाहेर जाववत नाहीं. ६८ समुद्र हातानें पोहून जसा तरतां येत नाहीं, तसा आपल्या बुद्धीनें वेदाचा अर्थ कळत नाहीं. म्हणून अनेक श्रेष्ठ ऋषींनीं अनेक युक्त्या रचिल्या आहेत. ६९ तरीहि वेदाचा अशा प्रकारचा खरा अर्थ कोणालाच कळत नाहीं; कारण तो वेद शब्दतः व अर्थतः दुर्बोधच आहे. ३७० त्याच्या स्वर-वर्णांची मोडणीच कोणाच्या लक्षांत येत नाहीं आणि त्याचा अर्थ तर इतका अगम्य आहे कीं, तो देव-मनुष्यांनाहि कळत नाहीं. ७१ पूर्वीं हाच वेद दुसऱ्या कोणी पाहिलाहि नव्हता, तेव्हां मीं ब्रह्मदेवाकडून पाठ करविला; पण त्यालाहि तो स्पष्ट कळला नाहीं, त्यामुळें तो कर्मानें कर्मठ होऊन बसला. ७२ ती रमणीय कर्मक्रिया शंखासुरानें तत्काळ चोरून नेली. त्यामुळें ब्रह्मदेव वेद विसरला व सृष्टि उत्पन्न करण्याचें काम बंद पडलें. ७३ वेदाचा उद्धार करण्यासाठीं मीं शंखासुराचा वध केला व वेदाचा सगळा संग्रह ब्रह्मदेवापाशीं आणून दिला. ७४ अशाप्रकारें मीं सगळा वेद ब्रह्मदेवाच्या पुढें ठेविला तरी त्याला त्यांतील कांहींच स्मरेना. तेव्हां तो बिचारा घाबरला व वेड्यासारखा होऊन बसला. ७५ म्हणून ऋषींनीं त्या वेदाचा विभाग करण्यासाठीं आपलें ज्ञान खर्चीं घातलें व त्याच्या शाखा-उपशाखांचा विभाग करण्यासठीं रावण उत्पन्न झाला. ७६ तरीहि उद्धवा ! माझ्या वेदांचा खरा अर्थ कोणाला कळेना. ७७ म्हणून वेदांची स्थापना

राखावया मर्यादेवरी । स्वयें सत्यवतीच्या उदरीं । झालों अवतारधारी श्रीव्यास ॥ ७८ ॥ वेदविभागीं राजहंसू । यालागीं नामें वेदव्यासू । तेणें म्यां केला श्रुतिविलासू । वेदविशेषू चतुर्धा ॥ ७९ ॥ वेद अर्थत्वें अतिदुर्घट । परी वाचकत्वें झाला प्रकट । त्या चारी वाचा अतिश्रेष्ठ । ऐक स्पष्ट सांगेन ॥ ३८० ॥ नादाचें प्रथम स्फुरण । घोषवंत सूक्ष्म प्राण । ती नाव परा वाचा जाण । प्रथम लक्षण ॐकारीं ॥ ८१ ॥ तोचि नादयुक्त प्राण । अंतःकरणीं होय स्फुरण । ते पश्यंती वाचा जाण । विवेक लक्षण तीमाजीं ॥ ८२ ॥ नाभीपासोनि नाभिस्वरीं । जे घुमघुमी कंठवरी । ते मध्यमा वाचा खरी । स्वयें श्रीहरी सांगत ॥ ८३ ॥ अकार उकार मकार । स्वरवर्णयुक्त उच्चार । जेथ प्रकट होय ओंकार । ते वाचा साचार वैखरी ॥ ८४ ॥ ते वैखरीच्या ठायीं । शाखोपशाखीं जो कांहीं । वेद अनंतरूप पाहीं । त्यासही नाहीं मर्यादा ॥ ८५ ॥ यापरी वेद अमर्याद । जरी चतुर्धा केला विशद । तरी जनासी अतिदुर्बोध । यालागीं उपवेद विभागिले ॥ ८६ ॥ ऐसेनिहीं जनासीं न कळे वेद । यालागीं वेदावरी पद । श्रीव्यासें केलें विशद । तरी वेदार्थ शुद्ध कळेना ॥ ८७ ॥ येचि अर्थीं ऋषीश्वरीं बहुत । सुमंतु जैमिनी भाष्य भारत । पैल सूत्रादि समस्त । शिणतां वेदार्थ न कळेचि ॥ ८८ ॥ एवं वाच्यता आणि लक्ष्यता । स्थूलसूक्ष्मत्वें वेदार्थज्ञाता । मजवांचूनि तत्त्वतां । आणिक सर्वथा असेना ॥ ८९ ॥

मयोपबृंहितं भूम्ना ब्रह्मणाऽनन्तशक्तिना । भूतेषु घोषरूपेण बिसेषूर्णेव लक्ष्यते ॥ ३७ ॥

जो मी अंतर्यामी आपण । 'भूमा' म्हणिजे अपरिछिन्न । सबाह्य व्यापकत्वें संपूर्ण । ब्रह्म परिपूर्ण जो कां मी ॥ ३९० ॥ तेणें म्यां वेद अधिष्ठित । या नांव बोलिजे 'उपबृंहित' । अधिष्ठाता

---

करणारा मी हरि लोकांना मर्यादेंत ठेविण्यासाठीं सत्यवतीच्या पोटीं जन्म घेऊन अवतारी श्रीव्यास झालों. ७८ वेदाचा विभाग करणारा जणूंकाय राजहंसच म्हणून त्यांस वेदव्यास हें नांव प्राप्त झालें. व्यासरूपानें मींच वेदाचा अर्थ स्पष्ट करून त्याचे चार भाग केले. ७९ वेदाचा अर्थ फार गूढ आहे. तो शब्दरूपानें प्रकट झाला आहे त्यामुळें ज्या अत्यंत श्रेष्ठ चार वाणींनीं तो प्रगट झाला त्या वाणीच तुला सांगतों, ऐक. ३८० नादाचें जें पहिलें स्फुरण तोच घोषवान् सूक्ष्म प्राण होय. ती परा वाणीच ओंकाराचें प्रथम लक्षण आहे. ८१ तोच नादयुक्त प्राण अंतःकरणांत स्फुरण पावला म्हणजे त्याला पश्यंती वाणी म्हणतात. तिच्यामध्यें विवेकस्वरूप स्फुरतें. ८२ नाभीपासून मूळ स्वरानें कंठापर्यंत जें शब्दस्वरूप स्फुरतें ती मध्यमा वाणी होय, असें श्रीहरीनें स्वतः सांगितलें. ८३ जेथें अकार, उकार, मकार, यांच्या स्वरवर्णयुक्त उच्चारानें ओंकार प्रकट होतो, तीच वैखरी वाणी होय. ८४ त्या वैखरी वाणींत शाखोपशाखांमध्यें अनंतरूपानें जो वेद भरला आहे त्याला सीमा नाहीं. ८५ अशा प्रकारच्या या अमर्याद वेदाचें जरी चार विभाग केले, तरी तो लोकांना अत्यंत दुर्बोध झाला. तेव्हां त्याचे आणखी विभाग करून उपवेद केले. ८६ तरीहि वेदाचा अर्थ लोकांना कळेना. तेव्हां श्रीव्यासानें वेदाचीं पदें पाडून त्याचा अर्थ स्पष्ट केला. इतकें करूनहि शेवटीं वेदाचा खरा अर्थ कळत नाहींच. ८७ त्याचा अर्थ लावण्यांत सुमंत, जैमिनि, भाष्यभारत, पैल, सूत्र इत्यादि श्रेष्ठ ऋषीश्वर थकले पण त्यांस वेदार्थ कळला नाहीं. ८८ सारांश वेदाचा स्थूल व सूक्ष्म वाच्यार्थ व लक्ष्यार्थ जाणणारा मजवांचून दुसरा कोणीहि नाहीं. ३८९.

—अंतर्दृष्टि पुरुषांनाच ज्ञेय असलेलें सूक्ष्म तत्त्वरूप दाखवितात—

**भूम्ना ब्रह्मणा अनन्तशक्तिना मया उपबृंहितं बिसेषु ऊर्णा इव भूतेषु घोषरूपेण लक्ष्यते**—अपरिच्छिन्न, निर्विकार व अनंतशक्ति अशा मज अंतर्यामीकडून अधिष्ठित जें सूक्ष्मरूप तें [ मला जरी अंतस्थत्व असलें तरी माझा परिच्छेद होत नाहीं, असें 'भूम्ना' या विशेषणानें सुचवितात. 'ब्रह्मणा' या विशेषणानें मला अधिष्ठातृत्व असलें तरी अविकारित्व आहे असें सांगतात. 'अनंतशक्तिना' या विशेषणानें अविकृत असलेल्याहि माझें नियंतृत्व संभवतें असें सुचविलें आहे. ] विद्वानांकडून कमलनालांतील तंतूप्रमाणें, सर्व प्राण्यांतील नादरूपानें जाणलें जातें. ३७.

जो मी अंतर्यामी 'भूमा' म्हणजे अपरिच्छिन्न अंतर्बाह्य व्यापून असलेला ईश्वर, जें मी परिपूर्ण ब्रह्म ३९० त्या मजकडून वेद अधिष्ठित आहे. यालाच 'उपबृंहित' असें म्हणतात. अभ्रामध्यें जसा चंद्र त्याप्रमाणें अधिष्ठाता

विकारी होत । जेवीं अभ्रांत चंद्रमा ॥ ९१ ॥ कां अग्नि काष्ठीं अधिष्ठितां । त्यासी तत्काळ ये साकारता । मग प्रबळत्व आणि शांतता । या विकारावस्था अग्नीसी ॥ ९२ ॥ यापरी विकारी नव्हे जाण । मी अंतर्यामी नारायण । ब्रह्मस्वरूपें परिपूर्ण । विकारनिर्दळण स्वयें कर्ता ॥ ९३ ॥ मीचि विकारांचा कर्ता । करूनि मीचि अकर्ता । त्या मज न ये विकारिता । ब्रह्मस्वरूपता स्वभावें ॥ ९४ ॥ ब्रह्म केवळ निधर्म । तें केवीं करी विकारी कर्म । ऐसा कांहीं कल्पिसी भ्रम । तेंही सुगम सांगेन ॥ ९५ ॥ माझी योगमाया अनंतशक्ती । जे शंभुस्वयंभूंसी न ये व्यक्ती । तिचेनि योगें मी चिन्मूर्ती । उत्पत्तिस्थितिसंहर्ता ॥ ९६ ॥ एवं योगामायास्वभावतां । मी सकळ करूनि अकर्ता । त्या मज देशतां काळतां । विकारितां स्पर्शेना ॥ ९७ ॥ जरी सत्य असती भेदतां । तरी मजही येती विकारिता । माझे निजस्वरूपीं पाहतां । भेदाची वार्ता असेना ॥ ९८ ॥ जेवीं भ्रमें सर्पत्व दोरावरी । परी दोर सर्पत्व कदा न धरी । तेवीं मी परमात्मा श्रीहरी । करूनि अविकारी निजरूपें ॥ ९९ ॥ घोषरूपें अतिसूक्ष्म नादु । तो मी प्रणवरूपें निजवेदू । प्राणिमात्रीं असें स्वतःसिद्धू । परी नेणती बोधू सकामत्वें ॥ ४०० ॥ जेवीं कां विष्ठा भक्षी सूकर । उपेक्षी कस्तूरी कापुर । तेवीं सूक्ष्मवेदाचें निजसार । सकाम नर उपेक्षिती ॥ १ ॥ मी निजानंद हृदया-आंत । त्या मज उपेक्षूनि भ्रांत । कामासक्ती लोलंगत । द्वारें वोळंगत नीचांचीं ॥ २ ॥ त्या हृदयस्थ देवाचें ध्यान । नित्य योग्यासी निदिध्यासन । सम करोनि प्राणापान । सदा अनुसंधान नादांचें ॥ ३ ॥ माझें वेदतत्त्व जें कां गुप्त । प्रणवरूपें हृदयाआंत । योगी सदा अनुभवित । त्याचें स्वरूप निश्चित अवधारीं ॥ ४ ॥ जैसा कमळमृणाळबिसतंत । तैसा सूक्ष्म नाद अत्यंत । नाभीपासूनि ब्रह्म-रंध्रांत । ओंकार स्वरांत लक्षिती ॥ ५ ॥ ऐसा ओंकाराच्या स्वरांआंत । नाभीपासोनि ब्रह्मरंध्रांत । सूक्ष्म नादाचा निजतंत । योगधारणा राखत महायोगी ॥ ६ ॥ हाचि नाद पैं प्रस्तुत । लौकिकीं असे

---

विकारी होतो. ९१ किंवा काष्ठांमध्यें अग्नि अधिष्ठित झाला म्हणजे त्याला आकार येतो व त्यामुळें अग्नीला प्रबलता व शांतता या विकारावस्था प्राप्त होतात. ९२ पण मी अंतर्यामी नारायण तसा विकारी नाहीं. मी ब्रह्मस्वरूपानें परिपूर्ण व स्वतः विकारांचें निर्दोलन करणारा आहें. ९३ विकारांचा कर्ता मीच आहें आणि करून अकर्ता आहें, त्या मला विकारत्व नाहीं. कारण माझें ब्रह्मस्वरूपत्व स्वाभाविक आहे. ९४ ‘ ब्रह्म केवल, धर्मरहित असतां तें विकारी कर्म कसें करील ’ असा जर तुझ्या मनांत संशय येईल तर तेंहि तुला स्पष्ट करून सांगतों, ऐक. ९५ माझी जी अनंतशक्ति योगमाया, जी शंकर-ब्रह्मदेवालाहि कळत नाहीं, तिच्या योगानें मी चैतन्यरूपी परमात्मा उत्पत्ति-स्थिति-लय करणारा होतों. ९६ असा योगमायेचा स्वभाव असल्यामुळें मी सर्व करून अकर्ता आहें. त्या मला देशतः व कालतः विकारित्व स्पर्श करीत नाहीं. ९७ कारण हा भेद जर खरोखरच सत्य असता तर माझ्यांतहि विकार झाला असता. पण माझें आत्मस्वरूप पाहिलें असतां भेदाचें नांवहि दिसत नाहीं. ९८ दोरीवर जसा भ्रमानें सर्पाचा आरोप करितो, पण दोरी केव्हांहि सर्प होत नाहीं, त्याप्रमाणें मी श्रीहरि कर्म करूनहि आत्मस्वरूपानें अविकारीच आहें. घोषरूपानें जो अति सूक्ष्म नाद तो मी प्रणवरूपानें वेदच आहें. सर्व प्राणिमात्रांत मी स्वभावतःच आहें; परंतु लोक सकामबुद्धीमुळें तें जाणत नाहींत. ४०० डुक्कर जसा कापूर, कस्तुरीची उपेक्षा करून मोठ्या आवडीनें विष्ठा खात असतो, त्याप्रमाणें नादरूपानें रहाणाऱ्या परमात्म्याची सकाम लोक उपेक्षा करितात. १ ते भ्रांत लोक हृदयांत असलेल्या मज आत्मानंदाची उपेक्षा करून कामासक्तीनें लुब्ध होतात व नीच लोकांच्या दारांत लोळत असतात. २ योगी मात्र हृदयस्थ देवाचें ध्यान करितात. त्यांना त्याचाच निदिध्यास लागलेला असतो. ते प्राणापान समान करून नादाचें निरंतर अनुसंधान करितात. ३ प्रणवरूपानें हृदयांत असलेलें जें माझें गुप्त वेदतत्त्व, योगी ज्याचा सतत अनुभव घेतात त्याचें निश्चित स्वरूप मी तुला सांगतों, ऐक. ४ कमलाच्या देठांतील कोमल तंतूप्रमाणें हा अति सूक्ष्म नाद नाभीपासून ब्रह्मरंध्रापर्यंत ओंकाररूपानें असतो, हें योगी जाणतात. ५ महायोगी योगधारणेनें ओंकाराच्या स्वरांत नाभीपासून ब्रह्मरंध्रापर्यंत सूक्ष्म नादाला अविच्छिन्न राखतात. ६ लौकिकांतहि कांहीं लोकांना या नादाचा

भासत । दोहीं कर्णीं देतां हात । तोचि घुमघुमित । निजनादू ॥ ७ ॥ योगी म्हणती अनाहत शब्दू । वेदांती म्हणती सूक्ष्म नादू । आम्ही म्हणों हा शुद्ध वेदू । असो अनुवादू हा नांवांचा ॥ ८ ॥ ऐशिया स्वतःसिद्ध वेदासी । श्रद्धा नुपजेचि प्राणियांसी । यालागीं सूक्ष्म वेद स्थूलतेसी । म्यां जनहितासी आणिला ॥ ९ ॥ तोचि स्थूलत्वें झाला प्रकट । ते प्रकट होती वेदवाट । दृष्टांतेंकरूनि स्पष्ट । तुज मी चोखट सांगेन ॥४१० ॥ ऐसें बोलला श्रीनिवास । तेणें उल्हासला हृदयहंस । म्हणे मजकारणें हृषीकेश । अत्यंत सौरस निरूपणीं ॥ ११ ॥ मजवरी बहुत स्नेहाळ । मज उद्धरावया गोपाळ । निरूपणीं सुकाळ । अतिरसाळ अमृतरसू ॥ १२ ॥ ऐसें उद्धवाचें बोलणें ऐकोनी । काय बोलिला सारंगपाणी । म्हणे मी तोचि निरूपणीं । सांगेन तुजलागोनी उद्धवा ॥ १३ ॥

यथोर्णनाभिर्हृदयादूर्णामुद्वमते मुखात् । आकाशाद्घोषवान्प्राणो मनसा स्पर्शरूपिणा ।
छन्दोमयोऽमृतमयः सहस्रपदवीं प्रभुः ॥ ३८ ॥
ओंकाराद्व्यञ्जितस्पर्शस्वरोष्मान्तस्थभूषिताम् ॥ ३९ ॥
विचित्रभाषाविततां छन्दोभिश्चतुरुत्तरैः । अनन्तपारां बृहतीं सृजत्याक्षिपते स्वयम् ॥ ४० ॥

ऊर्णनाभि म्हणिजे कांतणी । जेवीं निजमुखापासुनी । तंतु काढी अतिसूक्ष्मपणीं । तेवीं निर्गुणीं ओंकार ॥ १४ ॥ तो ओंकार होतां सप्राण । सहजस्वभावें गा जाण । झालें हिरण्यगर्भ अभिधान । आपणिया आपण वेदाज्ञा ॥ १५ ॥ 'प्रभु' म्हणजे ऐश्वर्यख्याती । अचिंत्यानंत त्याची शक्ती । तो छंदोमय वेदमूर्ती ।

---

भास होतो. दोन्ही कानांवर हात ठेविले म्हणजे हा नाद घुमत असल्याचा भास होतो. ७ त्यालाच योगी 'अनाहत' शब्द म्हणतात. वेदान्ती त्याला 'सूक्ष्मनाद' म्हणतात व आम्ही त्याला 'शुद्धवेद' म्हणतों. हा नांवाचा प्रकार असो; ८ पण अशा स्वतःसिद्ध वेदावरहि मनुष्याची श्रद्धा बसत नाहीं. म्हणून तो सूक्ष्म वेदच मी लोककल्याणाकरितां स्थूलरूपाला आणला. ९ तोच हा स्थूलरूपानें प्रकट होऊन वेदाचा प्रसिद्ध मार्ग झाला. हेंच दृष्टान्तानें स्पष्ट करून सांगतों, ऐक. ४१० श्रीकृष्णानें असें सांगतांच उद्धवाचें अंतःकरण अत्यंत संतुष्ट झालें व तो म्हणाला, ११ "श्रीकृष्णाचें मजवर अत्यंत प्रेम असल्यामुळें केवल माझा उद्धार करण्यासाठीं तो मोठ्या उल्हासानें अमृतासारखें अतिशय रसाळ निरूपण करीत आहे." १२ उद्धवाचें हें बोलणें ऐकून श्रीकृष्ण म्हणाला कीं, हे उद्धवा ! त्याचेंच निरूपण मी तुझ्यासाठीं करितों. ४१३.

—त्यानंतर वैखरी या नांवाच्या स्थूल वाणीच्या उत्पत्तीचा प्रकार सदृष्टान्त सांगतात—

यथा ऊर्णनाभिः हृदयात् मुखात् ऊर्णां उद्वमते—ज्याप्रमाणें कोळी आपल्या हृदयापासून, मुखांतून तंतु बाहेर काढितो, तथा प्राणः प्रभुः—त्याप्रमाणें प्राणोपाधि हिरण्यगर्भरूप भगवान, छन्दोमयः अमृतमयः घोषवान्—वेदमूर्ति, पण स्वतः अमृतमय व नादोपादानवान् होत्साता, स्पर्शरूपिणा मनसा—स्पर्शादि वर्णांचा संकल्प करणारें व त्यामुळेंच स्पर्शरूपी मन या निमित्तानें, आकाशात्—हृदयाकाशापासून, सहस्रपदवीं ओंकाराद्व्यञ्जितस्पर्शस्वरोष्मान्तस्थभूषितां विचित्रभाषाविततां चतुरुत्तरैः छन्दोभिः (उपलक्षितां) अनंतपारां बृहतीं सृजति स्वयं आक्षिपते च—अनेक पुरुषार्थसाधनांनीं युक्त असलेल्या हृदयांतील सूक्ष्म ओंकारापासून ऊर, कंठ इत्यादि स्थानांशीं संयुक्त होऊन व्यक्त होणाऱ्या, स्पर्शाख्य वर्णांनीं भूषित झालेल्या, वैदिक लौकिक विचित्र भाषांनीं विस्तार पावलेल्या उत्तरोत्तर चार चार अक्षरें ज्यांत अधिक आहेत अशा छंदांनीं उपलक्षित झालेल्या देश-कालांनीं परिच्छिन्न न झालेल्या, वेदलक्षण वाणीला उत्पन्न करितो व स्वतः तिचा उपसंहार करितो [ येथें हृदयांतील सूक्ष्म ओंकार अभिप्रेत आहे. अकारादि, वर्णरूप ओंकार अभिप्रेत नाहीं. कारण तो व्यंग्यकोटींत येतो. 'क' वर्गादि पांच वर्गांतील अक्षरांना स्पर्श म्हणतात. 'अ-' कारादि सोळा वर्णांना स्वर म्हणतात. श, ष, स, ह यांना ऊष्म वर्ण, म्हणतात व य, र, ल, व हे अंतस्थ होत. ]३८–४०.

ऊर्णनाभि म्ह० कोळी. ( हा माशा व डांस यांस धरण्यासाठीं भिंतीच्या कोपऱ्यांत जाळीं बांधीत असतो. ) तो जसा आपल्या तोंडांतून बारीक तंतु काढितो त्याप्रमाणें निर्गुणांत ओंकाराचा सूक्ष्म धागा असतो. १४ तो ओंकार आपल्या स्वभावानुसार चैतन्ययुक्त होतांच आपणच वेदाज्ञेनें 'हिरण्यगर्भ' या नांवानेंच प्रसिद्ध झाला. १५ उद्धवा !

जाण निश्चितीं उद्धवा ॥ १६ ॥ तो अविनाशी वास्तवस्थिती । नित्य सुखमय सुखमूर्ती । तेणें सप्राण नादाभिव्यक्ती । मनःशक्ती चेतवी ॥ १७ ॥ चेतविली जे मनःशक्ती । होय स्पर्शस्वरवर्णकल्पिती । वेदज्ञ बृहती म्हणती । जिचा अपरिमिती विस्तार ॥ १८ ॥ ते स्वरवर्णसंवलित मंत्र । हृदयाकाशीं विचित्र । सहस्रशाखीं विस्तार । वाढली अपार वैखरी ॥ १९ ॥ स्वरवर्णादि उच्चारीं । वेदाधिष्ठान वैखरी । ते उपजली जेणेंकरीं । तेही परी सांगेन ॥ ४२० ॥

मात्रात्रयमिळणीं लोक । ओंकार बोलती आवश्यक । हा ओंकार अलोलिक । अतिसूक्ष्म देख देहस्थ ॥ २१ ॥ त्याचि ओंकारासी प्राणसंगती । आधारादि चक्रीं ऊर्ध्वगती । तेथ वाचांची होय अभिव्यक्ती । परा पश्यंती मध्यमा ॥ २२ ॥ परावाचेच्या अभ्यंतरीं । जन्मे पश्यंती ज्येष्ठ कुमारी । मध्यमा जन्मे तिच्या उदरीं । एवं परस्परीं जन्मती ॥ २३ ॥ तैशाचि येरीतें येरी । नोसंडोनि क्षणभरी । चालती उपरांउपरी । चक्रींच्या चक्रांतरीं समवेत ॥ २४ ॥ आधारचक्रीं परा वाचा । स्वाधिष्ठानीं जन्म पश्यंतीचा । मणिपूरींहूनि विशुद्धीच्या । ठायीं मध्यमेचा रिगुनिगू ॥ २५ ॥ तेथोनियां मुखद्वारीं । वाचा प्रकाशे वैखरी । स्वरवर्णउच्चारीं । नानामंत्रीं गर्जत ॥ २६ ॥ तेचि स्वर आणि वर्ण । सांगेन स्पर्शव्यक्तिलक्षण । अंतस्थ ऊष्मे कोण कोण । विभागलक्षण अवधारीं ॥ २७ ॥ केवळ अ-कचटतप देख । हे ककारादि पंच पंचक । स्पर्शवर्णाचें रूपक । अक्षरें निष्टंक पंचवीस ॥ २८ ॥ सवर्णें गर्जतां उच्चार । ते अकारादि सोळाही स्वर । यरलव यांचा विचार । जाण साचार अंतस्थ ॥ २९ ॥ शषसह हे वर्ण चारी । ऊष्मे बोलिजे शास्त्रकारीं । विसर्गादि अनुस्वारीं । अंअःवरी विभागू ॥४३० ॥ येथ बावन्नावी मातृका । केवळ क्षकारू गा देखा । यांत सानुनासिक निरनुनासिक । जाणती लोक शास्त्रज्ञ ॥३१॥ एवं स्वर-

---

प्रभु म्ह० सर्वांचा ऐश्वर्ययुक्त स्वामी. तो अनंत व अचिंत्य शक्तीनें युक्त असतो आणि वास्तविक छंदोमय वेदमूर्तीच असतो. १६ तो वस्तुतः अविनाशी, नित्य सुखमय, सुखमूर्ति असल्यामुळें स्वभावतःच 'नादब्रह्म' हें उपादान कारण घेऊन मनःशक्तीला जागृत करितो. १७ ती सचेतन झालेली मनःशक्ति स्पर्श, स्वर आणि वर्ण यांना निर्माण करिते. तिलाच वेदवेत्ते जिचा अमर्याद विस्तार आहे अशी 'बृहती' म्हणतात. १८ स्वर व वर्ण यांनीं युक्त असलेले मंत्र हृदयाकाशांत हजारों शाखांनीं विचित्र प्रकारें विस्तार पावतात. अशी ती वैखरी अपार वाढते. १९ स्वर आणि वर्ण यांच्या उच्चारानें वेदाचें अधिष्ठान असलेली वाणी कशी उपजली, तोहि प्रकार सांगतों, ऐक. ४२०.

अ, उ, म् या तीन मात्रा मिळून ओंकार होतो. हा ओंकार अलौकिक आहे. तो देहामध्यें अत्यंत सूक्ष्म रूपानें रहातो. २१ त्या ओंकाराशीं प्राणाचा संयोग झाल्यामुळें आधारादि चक्रांमध्यें वायूची ऊर्ध्व गति सुरू होते. त्यांतच परा, पश्यंती व मध्यमा या वाणी अभिव्यक्त होतात. २२ परा वाचेच्या उदरांत पश्यंती ही वडील कन्या जन्मते. तिच्या उदरीं मध्यमेचा जन्म होतो. त्याप्रमाणें त्यांचा परस्परांपासून जन्म होतो. २३ त्या एकमेकीला सोडून एक क्षणभरहि रहात नाहींत. एका चक्रांतून दुसऱ्या चक्रांत अशा या तिन्ही वाणी बरोबरच वर-वर जातात. २४ आधार चक्रांमध्यें परा वाचा असते. स्वाधिष्ठानामध्येंच पश्यंतीचा जन्म होतो. मणिपुरापासून विशुद्धीपर्यंत मध्यमेची जा-ये चाललेली असते. २५ तेथून मुखद्वारामध्यें वैखरी वाक् प्रकट होते. ती स्वर व वर्ण यांच्या उच्चारांनीं अनेक मंत्ररूपानें गर्जना करिते. २६ मी आतां तुला तेच स्वर व वर्ण सांगतों. स्पर्श, अंतस्थ व ऊष्म वर्ण कोणते त्यांचा विभाग तूं आतां ऐक. २७ कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग व पवर्ग अशीं पांच पांच वर्णांची पांच पंचकें हें स्पर्शवर्णांचें स्वरूप आहे. अकारापासून मकारापर्यंत जीं पंचवीस अक्षरें तेच स्पर्शवर्ण होत. २८ त्यांचा उच्चार करूं लागल्यास त्यांत अकारादि सोळा स्वर व्यक्त होतात. य, र, ल, व यांना अंतस्थ म्हणतात. २९ श, ष, स, ह यांना ऊष्म म्हणतात. अं अः हे स्वरयुक्त अनुस्वार आणि विसर्ग आहेत. ४३० यांतच 'ष' ही बावन्नावी मात्रा आहे. त्यांतच अनुनासिक व निरनुनासिक असे दोन वर्णभेद शास्त्रज्ञ जाणतात. ३१ याप्रमाणें स्वर व वर्ण यांच्या यथाशास्त्र उच्चारानें आणि वेद व

**वर्णविधिउच्चारीं । लौकिकी वैदिकी भाषावरी । वेदशास्त्रार्थप्रकारीं । वाढली वैखरी शब्दचातुर्यें ॥ ३२ ॥ बोलेंचि गा बोलाप्रती । चाळूनि नाना उपपत्ती । बोलें बोलोनि गृहस्थीं । युक्तिप्रयुक्तीं साधूनी ॥ ३३ ॥ ऐशिया नानाशब्दकुसरीं । अत्यंत विस्तारिली वैखरी । तीचि चौंचौं अक्षरीं । वाढवूनि धरी नाना छंदें ॥ ३४ ॥ वाढतां चतुरक्षरभेदें । उत्तरोत्तर नाना छंदें । वाढविली स्वयें वेदें । निजाज्ञाबोधें नेमूनी ॥ ३५ ॥ अतएव अनंत अपार । अर्थतां शब्दतां अतिदुस्तर । माझ्या शब्दज्ञानाचा पार । सुरनर नेणती ॥ ३६ ॥ ऐशी वैखरीची अनंतशक्ती । यालागीं म्हणिजे ते बृहती । इच्या विस्ताराची गती । स्वयें नेणती शिव स्रष्टा ॥ ३७ ॥ हिरण्यगर्भत्वें स्वयें जाण । जीव शिव अंतर्यामिलक्षण । वेदाज्ञा माझी प्रकाशी आपण । जिचें नामाभिधान वैखरी ॥ ३८ ॥ जो मी वेदात्मा श्रीहरी । तो वेदू या रीतीं विस्तारीं । स्वयें विस्तारोनि संहारीं । मर्यादेवरी स्वकाळें ॥ ३९ ॥ मागां बोलिलीं छंदें जाण । त्या छंदांचें निजलक्षण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । जो वेदाचें कारण निजस्वरूप ॥ ४४० ॥**

गायत्र्युष्णिगनुष्टुप् च बृहती पंक्तिरेव च । त्रिष्टुब्जगत्यतिच्छन्दो ह्यत्यष्ट्यतिजगद्विराट् ॥ ४१ ॥

**सकळ छंदांचें अधिष्ठान । मुख्य गायत्री छंद जाण । त्या गायत्री छंदाचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४१ ॥ आठआठां अक्षरीं त्रिपद । गणितां जेथ यती शुद्ध । त्या नांव गायत्री छंद । हें वेदानुवाद निजबीज ॥ ४२ ॥ हें वेदाचें निजजिव्हार । ब्रह्मज्ञानाचें परपार । परमानंदाचें सोलींव सार । जाण साचार गायत्री ॥ ४३ ॥ हें चैतन्याचें जीवन । मज गोप्याचें गुप्तधन । जेथ जीवशिवां समाधान । तें हें छंद जाण गायत्री ॥ ४४ ॥ ये छंदींचें एक अक्षर ।**

---

शास्त्र यांच्या अर्थप्रकारांनीं लौकिक व वैदिक भाषा वाढल्या आहेत. या शब्दचातुर्यामुळेंच ही वैखरी वाणी आहे. ३२ नानाप्रकारच्या उपपत्ति व अनेक शब्द यांचा उच्चार करून गृहस्थ या वाणीचा व्यवहारांत उपयोग करितात. ३३ या प्रकारें ही वैखरी वाणी अतिशय विस्तारली आहे. तीच चार-चार अक्षरांच्या वाढीनें नाना छंद धारण करिते. ३४ वेदानें आपल्या आज्ञेनें उत्तरोत्तर चार-चार अक्षरांनीं अधिक असे अनेक छंद नेमून दिले आहेत. ३५ म्हणूनच शब्दतः व अर्थतः अनंत, अपार व अति दुस्तर असलेल्या माझ्या शब्दज्ञानाचा पार देव-मनुष्य जाणत नाहींत. ३६ वैखरीची अशी अनंत शक्ति आहे म्हणून तिला बृहती म्हणतात. तिच्या विस्ताराची मर्यादा साक्षात् शिव व ब्रह्मदेवहि जाणत नाहींत. ३७ स्वतः हिरण्यगर्भरूपानें जीव-शिव व अंतर्यामी यांना माझी वेदाज्ञा प्रकट करिते व तिलाच वैखरी म्हणतात. ३८ जो वेदात्मा श्रीहरि तोच मी याप्रमाणें वेदाचा विस्तार करितों व योग्यकाल आला असतां त्याचा संहार करितो. ३९ वर जे छंद सांगितले आहेत, त्या छंदांचें लक्षण वेदांचें कारण असा जो आत्मस्वरूप श्रीकृष्ण तो स्वतः सांगत आहे. ४४०.

—पूर्वोक्त छंदांतील कांहीं छंद दाखवितात—

**गायत्री**–चोवीस अक्षरांची गायत्री ( त्यानंतर चार–चार अक्षरांनीं अधिक असा पुढील प्रत्येक छंद आहे. ) **उष्णिग्**–अठ्ठावीस अक्षरांची उष्णिक्, बत्तीस अक्षरांचा **अनुष्टुब्**–छंद, छत्तीस अक्षरांचा **बृहती**–छंद, चाळीस अक्षरांचा **पंक्ति**–छंद, चव्वेचाळीस अक्षरांचा **त्रिष्टुप्**–छंद, अठ्ठेचाळीस अक्षरांचा **जगती**–छंद, **अत्यष्टि**–**अतिजगत्** व **अतिविराट्**–हे पुढील छंदहि उत्तरोत्तर चार अक्षरांनीं अधिक आहेत. ( या छंदांनीं उपलक्षित होणारी बृहती–वेदवाणीहि पूर्णपणें स्वरूपतः दुर्ज्ञेय आहे, असा मागील श्लोकांशीं संबंध. ) ४१.

सगळ्या छंदांचें मुख्य अधिष्ठान गायत्री-छंद आहे. त्या गायत्रीचें लक्षण तुला सविस्तर सांगतों, ऐक. ४१ आठ अक्षरांचा एक असे तीन चरण मोजिले असतां जेथें 'यति' म्हणजे शब्दाचा सारखा विच्छेद होतो, त्याला गायत्री छंद असें म्हणतात. या छंदांत चोवीस अक्षरें असतात. वेदवाणीचें हेंच मुख्य बीज आहे. ४२ ही गायत्री वेदाचें सार, ब्रह्मज्ञानाचें परतीर व परमानंदाचा सोलींव गाभाच आहे, असें खात्रीनें समज. ४३ हा गायत्री छंद चैतन्याचें जीवन, माझ्या गूढ रहस्याचें गुप्त धन व जीवा-शिवांचें समाधान करणारा आहे. ४४ या छंदांतील प्रत्येक

अक्षराचें निजसार । सच्चिदानन्दाचें निजभांडार । जाण साचार गायत्री ॥ ४५ ॥ करितां गायत्रीचें अनुष्ठान । विश्वामित्र झाला ब्राह्मण । मी कृष्ण वंदी त्याचे चरण । माझाही तो गुरु जाण रामावतारीं ॥ ४६ ॥ यालागीं सकळ छंदीं प्राधान्य । मुख्यत्वें गायत्री छंद जाण । इतर छंद होतीं पावन । कासे लागोन पैं इच्या ॥ ४७ ॥ गायत्री छंदाचे अंगीकारीं । त्यासी मिळाल्या अक्षरें चारी । उष्णिक् छंदाची थोरी । त्याचिवरी ठसावे ॥ ४८ ॥ उष्णिक् छंदाचे अंगीकारीं । त्यासी मिळाल्या अक्षरें चारी । अनुष्टुप् छंदाची थोरी । त्याचिवरी ठसावे ॥ ४९ ॥ अनुष्टुप् छंदाचे अंगीकारीं । आणिक मिळाल्या अक्षरें चारी । बृहती छंदाची थोरी । त्याचिवरी ठसावे ॥ ५० ॥ एवं पंक्ति त्रिष्टुप् जगती । अत्यष्टि अतिजगती । चौं चौं अक्षरांचे अधिकप्राप्तीं । छंदें वेदोक्तीं विभाग ॥ ५१ ॥ ऐशिया चतुरक्षरमिळणीं । नाना छंदांचिया श्रेणी । वेदरायाची राजधानी । मंत्रध्वनीं गर्जती ॥ ५२ ॥ तेथ अक्षरमर्यादा न करवे । शाखांची मर्यादा न धरवे । अर्थतां वाच्यतां नेणवे । वेद वैभवें दुर्ज्ञेय ॥ ५३ ॥

किं विधत्ते किमाचष्टे किमनूद्य विकल्पयेत् । इत्यस्या हृदयं लोके नान्यो मद्वेद कश्चन ॥ ४२ ॥

कर्मकांडविधिनिषेधीं । कोण अर्थ त्यागार्थ निंदी । कोण तो अर्थ प्रतिपादी । स्वहितबुद्धि साधकां ॥ ५४ ॥ मंत्रकांडें मंत्रमूर्तीं । सांगोपांग सायुधस्थिती । उपासना उपास्य युक्ती । किमर्थे भक्ती करविली ॥ ५५ ॥ ज्ञानकांड त्रिशुद्धी । कोण पदार्थ निषेधी । कोण्या अर्थातें प्रतिपादी । निजबुद्धी बोधूनी ॥ ५६ ॥ एवं वेदाचें अचळ मूळ । विधिविधानेंसीं मुख्य फळ । जाणावया केवळ । नाहीं ज्ञानबळ सुरनरां ॥ ५७ ॥ या वेदार्थातें तत्त्वतां । मीचि एक सर्वज्ञ ज्ञाता । माझे कृपेवीण सर्वथा ।

---

अक्षर परब्रह्माचें सार आहे. गायत्री तर सच्चिदानंदाचें भांडारच आहे. ४५ या गायत्रीचें अनुष्ठान करूनच क्षत्रिय विश्वामित्र ब्राह्मण झाला. मी श्रीकृष्णहि त्याच्या चरणांना वंदन करितों. कारण रामावतारीं तो माझाहि गुरूच होता. ४६ म्हणून सगळ्या छंदांत गायत्री छंद श्रेष्ठच होय. ४७ या गायत्रीच्याच आश्रयानें इतर छंद पावन होतात. त्यांत चार अक्षरें अधिक मिसळिलीं कीं, अठ्ठावीस अक्षरांचा उष्णिक् छंद होतो. ४८ त्यांत आणखी चार अक्षरें घातलीं कीं, बत्तीस अक्षरांचा अनुष्टुप् छंद होतो. ४९ त्यांत चार अक्षरें घातलीं कीं, छत्तीस अक्षरांचा बृहती छंद होतो. ४५० अशा प्रकारें प्रत्येकीं चार अक्षरें वाढविलीं असतां पंक्ति, त्रिष्टुप्, जगती, अत्यष्टि, अतिजगती इत्यादि वेदवाणीच्या विभागाचे छंद होतात. ५१ अशीं चार अक्षरें मिळविल्यानें अनेक प्रकारच्या छंदांच्या पंक्ति होतात आणि वेदराजाच्या राजधानींत हा मंत्रध्वनि गर्जत असतो. ५२ त्यांतील अक्षरें मोजतां येत नाहींत. शाखांचा पत्ता लागत नाहीं. अर्थज्ञान व शब्दज्ञान होत नाहीं. इतका हा वेद अगम्य आहे. ४५३.

—अर्थतःहि दुर्ज्ञेयत्व सांगतात—

किं विधत्ते—वेद कर्मकांडांतील वाक्यांनीं कशाचें विधान करितो, किं आचष्टे—देवताकांडातील मंत्रावाक्यांनीं कशाचें प्रकाशन करितो, किं अनूद्य विकल्पयेत्—ज्ञानकांडांत कशाचा अनुवाद करून कोणत्या निषेधार्थाचा विकल्प करितो, इति अस्य हृदयं लोके मदन्यः कश्चन न वेद—इत्यादि याचें तात्पर्य या लोकीं मजवांचून दुसरा कोणीहि जाणत नाहीं. ४२.

कर्मकांडांतील विधि-निषेधांनीं वेद कांहीं अर्थाची त्यागासाठीं निंदा करितो व साधकाच्या स्वहितासाठीं कांहीं अर्थाचें प्रतिपादन करितो. ५४ मंत्रकांडानें सर्व मंत्रमूर्ति सांगून त्यांचीं सांगोपांग आयुधें, उपास्य, उपासना इत्यादि सांगून भक्ति कशासाठीं करविली आहे; ५५ ज्ञानकांड आत्मज्ञानाचा बोध करून कोणत्या पदार्थांचा निषेध करितें आणि कोणत्या अर्थाचें प्रतिपादन करितें ! ५६ याप्रमाणें वेदाचें निश्चित मूळ व विधि-विधानांचें मुख्य फल जाणण्याचें ज्ञान देव-मानवांनाहि नाहीं. ५७ या वेदार्थाला मीच एक सर्वज्ञ तत्त्वतः जाणतों. माझ्या कृपेवांचून ब्रह्मदेवादिकांनाहि

**न येचि हाता ब्रह्मादिकां ॥ ५८ ॥ तेथ उद्धवाचें मनोगत । देवो जाणे वेदींचा इत्यर्थ । तरी भक्तकृपाळु श्रीकृष्णनाथ । मजही तो अर्थ दयेनें सांगे ॥ ५९ ॥ हा उद्धवाचा निजभावो । जाणों सरला देवाधिदेवो । तो वेदार्थाचा अभिप्रावो । श्लोकान्वयो पहा वो सांगत ॥ ४६० ॥**

मां विधत्तेऽभिधत्ते मां विकल्प्यापोह्यते त्वहम् । एतावान् सर्ववेदार्थः शब्द आस्थाय मां भिदाम्
मायामात्रमनूद्यान्ते प्रतिषिद्ध्य प्रशाम्यति ॥ ४३ ॥

**माझी पावावया स्वरूपस्थिती । मलिनाचिया चित्तशुद्धी । वेद स्वधर्म प्रतिपादी । त्यागवी निषेधीं विषयांतें ॥ ६१ ॥ तेथ अग्निहोत्रादि विधान । यज्ञांत कर्माचरण । तें चित्तशुद्धीचें कारण । वैराग्य दारुण उपजवी ॥ ६२ ॥ दारुण वैराग्यउत्पत्ती । इहामुत्रविषयानिवृत्ती । तेव्हां साधकास माझी प्राप्ती । सहजस्थिति स्वभावें ॥ ६३ ॥ एवं कर्मकांडाचिये स्थिती । विधिनिषेध वेदोक्ती । साधकांसी माझी प्राप्ती जाण निश्चितीं या हेतू ॥ ६४ ॥ विषयीं परम बाधा देखती । परी त्यागीं नाहीं सामर्थ्यशक्ती । ऐशिया साधकांप्रती । वेदें मद्भक्ती द्योतिली ॥ ६५ ॥ तेथ मंत्रमूर्ति उपासन । माझें सगुण अनुष्ठान । तेथ करितां अनन्यभजन । रजतमें जाण नासती ॥ ६६ ॥ मग केवळ सत्ववृत्तीं । श्रवणकीर्तनीं अतिप्रीती । तेणें**

---

तो अर्थ कळत नाहीं. ५८ तेव्हां उद्धव मनांत म्हणाला कीं, वेदार्थाचें खरें मर्म म्ह० वेद कर्मकांडांत कसलें विधि-विधान सांगतो, उपासनाकांडांत मंत्रांनीं काय व्यक्त करितो व ज्ञानकांडांत कशाचा अनुवाद करून निषेध करितो, हें गुह्य कृष्णावांचून कोणाला ठाऊक नाहीं. म्हणून भक्तांवर दया करणारा श्रीकृष्णनाथ तो अर्थ मोठ्या कृपेनें सांगत आहे. ५९ हा उद्धवाच्या मनांतील आशय जाणून देवाधिदेव श्रीकृष्ण त्या वेदार्थाचा सारांश श्लोकरूपानें सांगत आहे, पहा. ४६०.

—'तरी मग तूंच मजवर कृपा करून तें सांग' अशी उद्धवानें प्रार्थना केली असतां भगवान् 'ओं—ठीक आहे असें म्हणून सांगतात—

**मां विधत्ते**—वेद मज यज्ञरूपाचेंच विधान करितो, **मां अभिधत्ते**—माझेंच त्या त्या देवता रूपानें कथन करितो. **यत् तु विकल्प्य अपोह्यते तत् अपि अहं**—ज्या आकाशादि प्रपंचजाताचा 'त्या परमात्म्यापासून आकाश उत्पन्न झालें,' इत्यादि वचनांनीं आध्यारोप करून त्याचा अपवाद करितो तेंहि मीच. मजहून पृथक् कांहीं नाहीं. ( तें कां अशी आकांक्षा झाली असतां सर्व वेदार्थ संक्षेपतः सांगतात— ) **एतावान् सर्ववेदार्थः**—सर्व वेदांचा अर्थ हा एवढाच आहे. **शब्दः मां आस्थाय**—वेद मज परमार्थरूपाचा आश्रय करून, **भिदां मायामात्रं अनूद्य**—हा प्रवीत होणारा भेद मायामात्र आहे, असा अनुवाद करून, **अन्ते प्रतिषिद्ध्य**—'ब्रह्ममध्यें भेद नाहीं' असा शेवटीं त्याचा निषेध करून, **प्रशाम्यति**—निवृत्तव्यापार होतो, कृतकार्य होतो, असा भावार्थ. [ याचा आशय असा—अंकुरामध्यें जो रस असतो तोच जसा त्याच्या विस्तारभूत कांड, उपशाखा, पानें इत्यादि सर्व वृक्षावयवांत असतो त्याचप्रमाणें प्रणवाचा जो अर्थ परमेश्वर तोच त्याच्या विस्तारभूत सर्व वेद-कांड-शाखा यांमध्यें अनुवृत्त होतो, अन्य अर्थ त्यांत अनुवृत्त होत नाहीं. ) ४३.

माझ्या स्वरूपाची प्राप्ति व पातकी लोकांची चित्तशुद्धि होण्यासाठीं वेदानें स्वधर्माचें प्रतिपादन केलें आहे आणि निषेध करून विषयांचा त्याग करविला आहे. ६१ त्यांतील अग्निहोत्राचें विधान व यज्ञांतील कर्माचरण हा चित्तशुद्धीचा उपाय आहे. त्यानें तीव्र वैराग्य उत्पन्न होतें. ६२ दृढ वैराग्यानें इह-परलोकांची विषयासक्ति निवृत्त होतें. तेव्हां साधकाला माझी स्वभावतःच सहज प्राप्ति होते. ६३ याप्रमाणें कर्मकांडांतील वेदवचनानुसार विधि-निषेधांचें अनुष्ठान केलें असतां साधकाला माझी प्राप्ति होते. ६४ ज्यांना विषय अतिशय बाधक आहेत, हें कळतें, पण त्यांचा त्याग करण्याचें मात्र सामर्थ्य नसतें. अशा साधकांसाठीं वेदानें माझी भक्ति प्रकट केली आहे. ६५ त्यांत मंत्रयुक्त मूर्तीची उपासना सांगितली आहे. माझ्या सगुण मूर्तीचें अनुष्ठान व अनन्य भक्तीनें भजन केलें असतां रजोगुण व तमोगुण यांचा नाश होतो ६६ व केवळ सत्त्वगुण बाकी उरतो. त्यामुळें कीर्तन-श्रवणाची अत्यंत आवड जडते. त्यायोगें

मद्भावो सर्वांभूतीं । माझी चौथी भक्ती तेणें होय ॥ ६७ ॥ आतुडल्या माझी चौथी भक्ती । मद्भक्तां नावडे मुक्ती । अद्वैत भजनाचिया प्राप्ती । धिक्कारिती कैवल्य ॥ ६८ ॥ अद्वैतबोधें करितां भजन । मी अनंत अपार चिद्घन । भक्तीमाजीं आकळें जाण । ये मद्रूपपण मद्भक्तां ॥ ६९ ॥ तेव्हां भज्य भजक भजन । पूज्य पूजक पूजन । साध्य साधक साधन । अवघें आपण स्वयें होय ॥ ४७० ॥ माझी ऐश्वर्यसामर्थ्यशक्ती । तेही ये निजभक्तांच्या हातीं । अद्वैतभजनाचिया प्रीती । मत्पदप्राप्ती मद्भक्तां ॥ ७१ ॥ मी देव तो भक्त शुद्ध । हा बाहेरी नांवाचाचि भेद । आंतवटा पाहतां बोध । सच्चिदानन्द निजऐक्यें ॥ ७२ ॥ हे उपासनाकांडस्थिती । साधकीं करूनि माझी भक्ती । यापरी पावले माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७३ ॥ मायाप्रतिबिंबित चैतन्य । त्वंपदार्थें वाच्य जाण । ज्याच्या अंगीं जीवाभिधान । अविद्या जाण उपजवी ॥ ७४ ॥ जेवीं स्वप्नामाजीं आपण । आन असोनि देखे आन । तेवीं अविद्यकत्व जाण । जीवपण एकदेशी ॥ ७५ ॥ जें मायासंवलित चैतन्य । जो योगजन्य जगत्कारण । जो सर्वद्रष्टा सर्वज्ञ । सदा संपन्न ऐश्वर्यें ॥ ७६ ॥ जो सकळ कर्मांचा कर्ता । जो कर्ताचि परी अकर्ता । ज्याचे अंगीं स्वभावतां । नित्यमुक्तता स्वयंभ ॥ ७७ ॥ ज्याची अकुंठित सहजसत्ता । जो परमानंदें सदा पुरता । ज्यासी ईश्वरत्वें समर्थता । हे जाण वाचकता तत्पदार्थाची ॥ ७८ ॥ जीवाचें सांडोनियां अज्ञानत्व । शिवाचें सांडूनि सर्वज्ञत्व । दोहींचें शोधित जें लक्षत्व । ऐक्यें निजतत्त्व साधिती ॥ ७९ ॥ लग्नीं नोवरा निमासुरा । तोचि गेलिया देशावरा । विदेशीं देखिला एकसरा । तारुण्यमदभरा संपन्न ॥ ४८० ॥ ते काळींची त्यजूनि बाल्यावस्था । आजिची नेघूनि तारुण्यता । पत्नी अनुसरे निजकांता । निजस्वरूपतास्वभावें ॥ ८१ ॥ तेवीं त्वंपदतत्पदच्यार्थ । दोहींचा सांडावा निश्चितार्थ । ऐक्यें अंगिकारावा लक्ष्यार्थ । हा ज्ञानकांडार्थ उद्धवा ॥ ८२ ॥ जीवशिवांचेनि ऐक्यें जाण । माझे चित्स्वरूपीं समाधान । स्वयें पाविजे आपण । हें ज्ञानकांड संपूर्ण

---

सर्व भूतांमध्यें मद्भावना उत्पन्न होते व माझ्या चौथ्या भक्तीची प्राप्ति होते. ६७ ही माझी चौथी भक्ति प्राप्त होतांच माझ्या भक्तांना मुक्तीहि आवडेनाशी होते. अद्वैत भजनाच्या लोभानें ते मोक्षालाहि तुच्छ मानितात. ६८ अद्वैतभावानें माझें भजन केलें. असतां अनंत, अपार, ज्ञानस्वरूप असलेला मी वश होतों आणि माझे भक्त मद्रूपच होतात. ६९ त्यावेळीं भज्य, भक्त, भजन; पूज्य, पूजक, पूजन; साध्य, साधक, साधन; ही सारीं तो स्वतःच होतो. ४७० माझें ऐश्वर्य, सामर्थ्य–शक्ति इत्यादि सर्व माझ्याच भक्तांच्या हातीं येतें. अद्वैत भजनाच्या प्रीतीनेंच माझ्या भक्तांना माझ्या पदाची प्राप्ति होते. ७१ मी देव आणि तो परम भक्त हा भेद केवळ नांवाचाच आहे. आंतून मी व भक्त दोघेहि सच्चिदानंदरूपानें एकच आहोंत. ७२ उद्धवा ! या उपासनाकांडांत वर्णन केल्याप्रमाणें माझी भक्ति करून साधक माझ्या पदाला प्राप्त झाले, हें तूं निश्चित जाण. ७३ मायेमध्यें प्रतिबिंबित झालेलें चैतन्यच 'त्वं-' पदार्थानें ओळखिलें जातें. अविद्येमुळें त्याला जीवत्व प्राप्त होतें. ७४ स्वप्नांत आपण एक असून जसे अनेक होतो, तसें अविद्येमुळें आलेलें हें जीवत्व एकदेशी आहे. ७५ मायायुक्त जें चैतन्य तें योगापासून उत्पन्न होऊन जगाच्या उत्पत्तीला कारण होतें. जो सर्वद्रष्टा, सर्वज्ञ, निरंतर, ऐश्वर्यसंपन्न, ७६ सर्व कर्मांचा कर्ता, कर्ता असून अकर्ता, स्वाभाविक मुक्ततेनें संपन्न, ७७ अकुंठित सत्तायुक्त, परिपूर्ण परमानंदानें भरलेला, ईश्वरत्वानें समर्थ, तोच तत्पदाचा वाच्यार्थ आहे. ७८ योगी जीवाचें तें अज्ञानत्व टाकून व शिवाचें सर्वज्ञत्व टाकून त्या दोहोंतून शोधून काढलेलें जें तत्त्व त्याच्याशीं एकरूप होऊन स्वस्वरूप साधितात. ७९ लग्नांत देखणा व अल्पवयी असलेला वर देशांतराला गेला व कांहीं काळानंतर तो तरुण होऊन अकस्मात् दृष्टीस पडला, ४८० तर त्याच्या स्वरूपांत झालेला बदल न पहातां त्याची पत्नी त्याला मूळ स्वरूपाच्या भावनेनेंच जशी स्वीकारिते ८१ त्याप्रमाणें हे उद्धवा ! 'त्वंपद' आणि 'तत्पद' या दोहोंतील लौकिक अर्थ टाकून ऐक्यभावानें त्यांतील तत्त्वाचा स्वीकार करावा. हा ज्ञानकांडाचा अर्थ होय. ८२ उद्धवा ! जीवा-शिवांचें ऐक्य करून माझ्या ज्ञानस्वरूपांत आपण समाधान अनुभवावें, हेंच वेदानें सगळ्या ज्ञानकांडांत

बोलिलें वेदें ॥ ८३ ॥ वेदा आदिमध्यअवसानीं । मातें लक्षिती कांडें तिनी । तोचि अर्थ उपसंहारूनी । ग्रंथावसानीं हरि बोले ॥ ८४ ॥ उद्धवा वेदाचें वचन । अर्थगंभीर अतिगहन । तेथ शिणता ऋषिजन । अर्थावसान अलक्ष्य ॥ ८५ ॥ तें वेदार्थाचें निजसार । माझें गुह्य ज्ञानभांडार । तुज म्यां सांगीतलें साचार । पूर्वापरअविरोधें ॥ ८६ ॥ तें ऐकोनि देवाचें उत्तर । उद्धव चमत्कारला थोर । तेंचि वेदाचें निजसार । पुढती श्रीधर सांगो कां ॥ ८७ ॥ पान्हा लागताचि तोंडीं । दोहक वांसरूं आतुडी । त्यापरी अति-आवडीं । स्वयें चडफडी उद्धव ॥ ८८ ॥ जेवीं कां पक्षिणीपुढें । चारा घ्यावयाचे चाडे । पिलें पसरी चांचुवडें । तेवीं कृष्णाकडे उद्धवू ॥ ८९ ॥ तें उद्धवाचें मनोगत । जाणोनियां श्रीअनंत । सकळ वेदार्थ संकळित । ग्रंथांतीं सांगत निजसारांश ॥ ४९० ॥ नानाशाखीं अतिप्रसिद्ध । त्रिकांडीं वाढला जो वेद । तेथील नाना शब्दीं हाचि बोध । जो मी अभेद परमात्मा ॥ ९१ ॥ त्या मातें धरोनि हातीं । त्रिकांडीं चालल्या श्रुती । त्या श्रुत्यर्थाची उपपत्ती । यथास्थिती सांगेन ॥ ९२ ॥ मी कर्मादिमध्यअंतीं । मी कर्मकर्ता क्रियाशक्ती । कर्मफळदाता मी श्रीपती । हा इत्यर्थ निश्चितीं कर्मकांडींचा ॥ ९३ ॥ मंत्रमूर्ति आणि मंत्रार्थ । तेही मीचि गा निश्चित । पूज्य पूजक पूजा समस्त । मजव्यतिरिक्त अणु नाहीं ॥ ९४ ॥ देवें देवोचि पूजिजे । देव होऊनि देवा भजिजे । हें वेदींचें निजबीज माझें । हेंचि आगमीं बोलिजे मुख्यत्वें ॥ ९५ ॥ मीच देवो मीचि भक्तू । पूजोपचार मी समस्तू । मीचि मातें पूजितू । हे इत्थंभूतू उपासना ॥ ९६ ॥ हें उपासनाकांडींचें निजसार । आगमशास्त्रींचें गुह्य भांडार । माझ्या निजभक्तांचें वस्तीचें घर । ते हे साचार उपासना ॥ ९७ ॥ ज्ञानकांड तें अलोलिक । वेद आपला आपण द्योतक । अवघा संसारचि काल्पनिक । तेथ वेद नियामक कोणे अर्थे ॥ ९८ ॥ वोस घरास वस्तीस पहा हो । निर्जीव पाहुणा आला राहो । त्याचा कोण करील बोठवो । तैसा भावो वेदाज्ञे

सांगितलें आहे. ८३ वेदांतील तीन्हीं कांडें आदि-मध्य-अंतीं मलाच अनुलक्षून आहेत. तोच अर्थ श्रीहरि या विषयाचा उपसंहार करितेवेळीं सांगत आहे. ८४ हे उद्धवा ! वेदाचें वचन अत्यंत गंभीर, अतिशय गहन आहे. त्याचा अर्थ लावण्यांत ज्ञाते ऋषि शिणले, तरी त्यांना खरा अर्थ कळला नाहीं. ८५ तेंच माझें गुप्त ज्ञानभांडार मीं तुला पूर्वोत्तरविरोध येऊं न देतां सविस्तर सांगितलें. ८६ श्रीकृष्णाचें हें भाषण ऐकून उद्धवाला मोठा चमत्कार वाटला व तो मनांत म्हणाला कीं, वेदाचें तेंच मुख्य सार श्रीकृष्ण पुढें कां सांगत नाहीं ! ८७ वासराचें तोंड लागून गायीला पान्हा फुटला कीं, धार काढणारा जसा वासराला बाजूला ओढून आंवरून ठेवितो, त्याप्रमाणें उद्धवाचा आवडीचा विषय देवानें मध्येंच थांबविल्यामुळें तो मनांत चडफडूं लागला. ८८ पिलें जशीं पक्षिणीच्या पुढें चारा घेण्याच्या इच्छेनें आपली चिमुकली चोंच पसरितात, त्याप्रमाणें उद्धव श्रीकृष्णापुढें कथानक ऐकण्यासाठीं ' आ ' पसरून बसला. ८९ हें उद्धवाचें मनोगत ओळखून श्रीकृष्ण सगळ्या वेदाचा संक्षेपार्थ सारांशरूपानें अध्यायाच्या शेवटीं सांगत आहे. ४९० अनेक शाखांतून प्रसिद्ध असलेल्या त्रिकांडात्मक वेदांतील सगळ्या शब्दांचें सार हेंच आहे कीं, जो अभिन्न परमात्मा तो मीच आहें. ९१ अशा माझा हात धरून (माझ्या आधारानें) श्रुति या तीन्ही कांडांत चालत आहेत. त्या श्रुतींच्या अर्थाचा सारांश मी तुला स्पष्टपणें सांगतों, ऐक. ९२ कर्मांतील आदि-मध्य-अंत मीच आहें. कर्मकर्ता, क्रियाशक्ति, कर्मफल देणारा, हें सर्व मीच आहें. हा कर्मकांडाचा निश्चित अर्थ आहे. ९३ मंत्र, मूर्ति, मंत्रार्थ; पूज्य पूजक, सगळें पूजन, हें सर्व मजवांचून दुसरें कांहींहि नाहीं. ९४ देवानेंच देवाची पूजा करावी, देव होऊनच देवाला भजावें, हें वेदांतील रहस्यच वेदांत सांगितलें आहे. ९५ मीच देव आणि मीच भक्त; पूजेचा उपचार सगळा मीच; मीच माझी पूजा करितों. हीच माझी परिपूर्ण उपासना आहे. ९६ हे उपासनाकांडांतील मुख्य सार, वेदशास्त्रांचें गुप्तभांडार; माझ्या भक्तीचें माहेरघरच, अशी ही उपासना आहे. ८९ ज्ञानकांड तर अत्यंत अलौकिक आहे. वेद स्वतःच स्वतःला प्रकाशित करणारा आहे. सगळा संसारच जेथें मिथ्या, तेथें वेद कोणाचें नियमन करणार ! ९८ एखाद्या ओसाड पडलेल्या घरीं कोणी निर्जीव मनुष्य पाहुणा येऊन राहिला, तर त्याचा तेथें आदरसत्कार कोण करणार ! तसाच वेदाज्ञेचा अर्थ आहे. ९९ कळसूत्री बाहुली घेऊन तिचें जर मुंडन

॥ ९९ ॥ खांबसूत्रावरील पुतळीसी । तिहेची बोडलिया जेवीं शिसीं । नाहीं निघणें पांढरे केंसांसी । तेवीं शुद्धीं वेदासी ठाव नाहीं ॥ ५०० ॥ मूळ संसारचि मायिक । तेथ वेद तोही तद्रूप देख । मृगजळीं नाहीं उदक । परी ओलावाहि देख असेना ॥ १ ॥ जेथ मूळीं मुख्य अद्वैतता । तेथ कैंचा वक्ता कैंचा श्रोता । कैंचें कर्म कैंचा कर्ता । वेदवार्ता ते कैंची ॥ २ ॥ नाहीं दृश्य द्रष्टा दर्शन । नाहीं ध्येय ध्याता ध्यान । नाहीं ज्ञेय ज्ञाता ज्ञान । वेदवचन तेथें कैंचें ॥ ३ ॥ जेथ भ्रमाची राणीव । जेथ भेदाची शाहाणीव । तेथ वेदाची जाणीव । गोड गाणीव उपनिषदांची ॥ ४ ॥ जंव भेदाची सबळ स्थिती । तंव वेदांची थोर ख्याती । भेदू आलिया अद्वैतीं । वेद विराला ' नेति ' म्हणोनि ॥ ५ ॥ जळगार जळीं विरे । तेवीं वेदू अद्वैतीं मुरे । हें ज्ञानकांड साचोकारें ॥ तुज म्यां खरें सांगीतलें ॥ ६ ॥ जेथ उपजला स्वयें अग्नी । त्या अरणी जाळूनि शमे वन्ही । तेवीं ज्ञानकांडनिरूपणीं । वेदू निजनिर्दळणीं प्रवर्तला ॥ ७ ॥ एक ब्रह्म जें अद्वैत । येणें श्रुतिवाक्यें मिथ्या द्वैत । हें बोलूनि वेद हारपे तेथ । ब्रह्म सदोदित संपूर्ण ॥ ८ ॥ शुद्ध ब्रह्म मी हे स्फुरे स्फूर्ती । तेथचि ॲंकाराची उत्पत्ती । तोही ब्रह्मरूप निश्चितीं । त्यासी ब्रह्म म्हणती एकाक्षर ॥ ९ ॥ त्या ॲंकारापासूनि गहन । श्रुति शाखा स्वर वर्ण । झालें तें ब्रह्मरूप जाण । एवं वेद पूर्ण परब्रह्म ॥ ५१० ॥ जेवीं सोन्याचे अलंकार । पाहतां सोनेंचि साचार । तेवीं श्रुतिशाखावेदविस्तार । तो अवघा ॲंकार मद्रूपें ॥ ११ ॥ जो वेदप्रतिपाद्य पुरुषोत्तम । जो भक्तकामकल्पद्रुम । तो हें बोलिला मेघश्याम । आत्माराम श्रीकृष्ण ॥ १२ ॥ तिहीं कांडीं निजसंबंधू । पूर्वापार अतिविरुद्धू । हा वेदार्थ परम शुद्धू । तुज म्यां विशदू बोधिला ॥ १३ ॥ याहोनियां परता । वेदार्थ नाहीं गा सर्वथा । तुज म्यां सांगितला आतां । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ १४ ॥ या वेदार्थाची निजखूण । हृदयीं भोगितां आपण । होय जीवशिवां समाधान । ऐसें श्रीकृष्ण

---

केलें, तर तिच्या डोकीवर जसे पांढरे केस उगवत नाहींत; याप्रमाणें शुद्ध ब्रह्मामध्यें वेदाचा प्रवेश होत नाहीं.. ५०० मृगजळांत पाणी तर नसतेंच, पण ओलावाहि जसा नसतो, त्याप्रमाणें मूळ संसारच मायिक म्हटल्यावर वेदहि तसाच ठरणार. १ जेथें मूळांतच मुख्य अद्वैत पसरलेलें आहे, तेथें वक्ता-श्रोता, कर्म-कर्ता किंवा वेद-वार्ता तरी कोठची ! २ जेथें दृश्य-द्रष्टा-दर्शन; ध्येय-ध्याता-ध्यान; ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान नाहीं तेथें वेदवचन कोठचें ! ३ जेथें भ्रमाचें राज्य व भेदाचें शहाणपण असतें, तेथें वेदाची जाणीव आणि उपनिषदांचें गोड गायन चालतें. ४ जोंवर भेदभाव प्रबल असतो, तोंवरच वेदाची मोठी थोरवी असते. भेद अद्वैतांत लुप्त झाला कीं, वेदहि ' नेति ' म्हणून विरून जातो. ५ पाण्याची धार जशी पाण्यांत वितळते, तसाच वेद अद्वैतांत एकरूप होतो. असें हें ज्ञानकांड मीं तुला प्रेमानें सांगितलें. ६ ज्यांपासून अग्नि स्वतः प्रकट होतो, त्याच काष्ठांना जाळून तो शांत होतो. त्याप्रमाणें वेदानें ज्ञानकांडाचें निरूपण केलें व तो स्वतःच त्यांत लीन झाला. ७ श्रुतिवाक्यानेंच केवल एक ब्रह्म तेवढें अद्वैत सत्य व इतर सर्व द्वैत मिथ्या ठरविलें आहे. इतकें सांगून वेद तेथेंच थांबला. परंतु ब्रह्म मात्र सदोदित परिपूर्ण आहे. ८ शुद्ध ब्रह्म तें मीच अशी जेथें स्फूर्ति होते, तेथेंच ओंकाराची उत्पत्ति होते. तो ओंकारहि परब्रह्मरूपच आहे. म्हणून त्याला एकाक्षर ब्रह्म म्हणतात. ९ त्या ओंकारापासूनच स्वर, वर्ण व गूढ श्रुतीच्या शाखा उत्पन्न झाल्या. तें सर्व ब्रह्मस्वरूपच असल्यामुळें वेद पूर्ण परब्रह्मच आहे. ५१० सोन्याच्या दागिन्यांतील सगळें सोनें जसें एकच असतें, त्याप्रमाणें श्रुतीच्या शाखारूपानें झालेला वेदाचा विस्तार सर्व मद्रूपानें ओंकारच आहे. ११ वेदानें प्रतिपादन केलेला पुरुषोत्तम, भक्ताची इच्छा पूर्ण करणारा जणुंकाय कल्पवृक्षच, असा आत्माराम, मेघश्याम श्रीकृष्ण असें बोलला कीं, १२ वेदाच्या तीन्हीं कांडांत पूर्वोत्तरविरोध आहे, असें कोणी म्हणतात; परंतु मीं हा वेदाचा अत्यंत शुद्ध अर्थ तुला स्पष्ट करून सांगितला. १३ उद्धवा ! मीं तुला आतां जो सांगितला त्याहून निराळा वेदाचा दुसरा अर्थ नाहीं, हें खात्रीनें जाण. १४ या वेदार्थाची आत्मखूण अंतःकरणांत ठसली असतां जीव-शिवांस समाधान होतें, असें

**बोलिला ॥ १५ ॥ हें ऐकोनि उद्धवें जाण । झाला वेदार्थीं निमग्न । दोनी टवकारले नयन । स्वानंदीं मन बुडालें ॥ १६ ॥ चित्तचैतन्या मिळणी पाडी । कंठीं बाष्प दृढ आडी । लागतां स्वानंदाची गोडी । उभिली गुढी रोमांचीं ॥ १७ ॥ शरीरीं स्वेद सकंपता । नयनीं स्वानंदजळ येतां । बोल बुडाला सर्वथा । मूर्च्छा येतयेतां सांवरी ॥ १८ ॥ तंव हृदया आली आठवण । हें भलें नव्हे दुश्चित्त-पण । झणीं निजधामा जाय श्रीकृष्ण । येणें धाकें नयन उघडिले ॥ १९ ॥ तंव घवघवीत घनसांवळा । मुकुट कुंडलें मेखळा । कांसे झळके कसिला सोनसळा । आपाद वनमाळा शोभत ॥ ५२० ॥ अंतरीं भोगी चैतन्यघन । बाहेरी उघडितां नयन । आनंदविग्रही श्रीकृष्ण । मूर्ति संपूर्ण संमुख देखे ॥ २१ ॥ म्हणे श्रीकृष्ण चैतन्यघन । चैतन्यविग्रही श्रीकृष्ण । सगुण-निर्गुणरूपें जाण । ब्रह्म परिपूर्ण श्रीकृष्ण ॥ २२ ॥ बाप भाग्य उद्धवाचें । सगुणनिर्गुण दोहींचें । सुख भोगीतसे साचें । हें श्रीकृष्णकृपेचें महिमान ॥ २३ ॥ जेथ सद्गुरुकृपा संपूर्ण । तेथ शिष्याची आवडी प्रमाण । तो जैं मागे मूर्ति सगुण । तैं तेचि जाण गुरु दे ॥ २४ ॥ पाहिजे निर्गुण निजप्राप्ति । ऐशी आवडी ज्याचें चित्तीं । तें निर्गुणाचिये निजस्थितीं । गुरुकृपा निश्चितीं नांदवी ॥ २५ ॥ सगुण निर्गुण स्वरूपें दोनी । भोगावया आवडी ज्याचे मनीं । तेही स्थितीच्या गुरु दानीं । कृपाळूपणें समर्थ ॥ २६ ॥ सद्गुरूचें अगाध माहिमान । जें वेदा न बोलवेचि जाण । त्याची कृपा झालिया पूर्ण । दुर्लभ कोण पदार्थ ॥ २७ ॥ ते कृष्णकृपेस्तव जाण । फिटलें उद्धवाचें दुर्लभपण । सगुण निर्गुण एक कृष्ण । हे खूण संपूर्ण बाणली ॥ २८ ॥ जाणोनि कृष्णाचें पूर्णपण । त्याचे लक्षोनि श्रीचरण । धांवोनि उद्धवें आपण । घाली लोटांगण हरिचरणीं ॥२९॥ तेव्हां सावळा संकर्षण । चारी बाह्या पसरी श्रीकृष्ण । उद्धवा सप्रेमें उचलून । दीधलें आलिंगन स्वानंदें ॥ ५३० ॥ त्या आलिंगनाचें सुख । अनुभवी जाणती देख । जो उद्धवासी**

---

श्रीकृष्णानें सांगितलें. १५ हें ऐकतांच उद्धव वेदार्थांत निमग्न झाला. त्याचे दोन्ही डोळे भरून आले व मन आत्मानंदांत बुडालें. १६ चित्त चैतन्यांत लय पावलें. कंठ दाटून आला. त्याला आत्मानंदाची गोडी कळतांच अंगावर रोमांच उभे राहिले. १७ सर्वांगाला घाम सुटला. डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. तोंडांतून शब्द उमटेनासा झाला. शेवटीं मूर्च्छा येत असतां त्यानें स्वतःला सांवरून धरिलें. १८ इतक्यांत त्याला आठवण झाली कीं, हा गैरसावधपणा बरा नव्हे. न जाणो, इतक्या अवधींत श्रीकृष्ण निजधामाला निघून जाईल. अशा धाकानें त्यानें डोळे उघडून पाहिलें, १९ तों प्रफुल्ल, मेघासारखा सांवळा, मुकुट, कुंडलें व मेखला यांनीं युक्त, कंबरेला पिवळा पीतांबर व गळ्यांत पायापर्यंत रुळणारी वनमाला यांनीं शोभणारा श्रीकृष्ण दिसला. ५२० अंतःकरणांत त्यानें चैतन्यघनाचा अनुभव घेतला होता व डोळे उघडतांच बाहेर आनंदाचा मूर्तिमंत पुतळाच असा श्रीकृष्ण त्याला समोर दिसला. २१ तेव्हां तो म्हणाला कीं, श्रीकृष्ण केवल ज्ञानस्वरूप, ज्ञानदाता व सगुण-निर्गुणस्वरूपानें परिपूर्ण ब्रह्म आहे. २२ उद्धवाचें भाग्य थोर, म्हणून त्यानें सगुण-निर्गुण मूर्ति या दोहोंचें सुख अनुभविलें. हा श्रीकृष्णकृपेचाच महिमा होय. २३ जेथें सद्गुरूची पूर्ण कृपा असते, तेथें शिष्याची आवड प्रमाण असते. तो जेव्हां सगुण मूर्ति मागतो तेव्हां गुरु तत्काळ त्याला तेंच रूप देतो; २४ जेव्हां निर्गुण मागतो तेव्हां गुरुकृपा त्याची प्राप्ति करून देते. २५ बरें, सगुण व निर्गुण या दोन्ही रूपांचा अनुभव घ्यावा असें शिष्याच्या मनांत आलें, तर त्याची तीहि इच्छा पूर्ण करण्यास गुरुकृपा समर्थ असते. २६ असा सद्गुरूचा महिमा अगाध आहे. त्याचें वर्णन वेदालाहि करवत नाहीं. एकदां सद्गुरूची पूर्ण कृपा झाली कीं, मग कोणता पदार्थ दुर्लभ आहे! २७ श्रीकृष्णाच्या कृपेमुळें उद्धवाचें दुर्लभत्व नाहींसें झालें. सगुण व निर्गुण हीं दोन्हीं श्रीकृष्णाचींच रूपें आहेत. ही खूण त्याच्या मनाला पटली. २८ श्रीकृष्णाची ही पूर्णकृपा जाणून उद्धवानें धांवत जाऊन श्रीहरीच्या चरणांवर लोटांगण घातलें. २९ तेव्हां सावळ्या संकर्षण श्रीकृष्णानें आपले चारी हात पसरून उद्धवाला मोठ्या प्रेमानें वर उचलून आनंदानें आलिंगन दिलें. ५३० त्या आलिंगनाचें सुख, ज्यांनीं त्याचा

झाला हरिख । त्याचा जाणता एक श्रीकृष्ण ।। ३१ ।। तो कृष्ण म्हणे उद्धवा । हा विसाव्याचा विसावा । माझ्या वेदाचा निजगुह्यठेवा । तो हा एकविसावा तुज सांगीतला ।। ३२ ।। जेणें मोडे लिंगदेहाचा यावा । जेणें जीवत्व नाठवे जीवा । तो हा विसाव्याचा विसावा । तुज एकविसावा निरूपिला ।। ३३ ।। जेणें मिथ्यात्व ये देहभावा । जेणें शून्य पडे रूपनांवा । तो हा विसाव्याचा विसावा । एकविसावा निरूपिला ।। ३४ ।। जेथ अज्ञाना होय नागोवा । जेथ ज्ञान ये अभावा । तो हा विसाव्याचा विसावा । एकविसावा निरूपिला ।। ३५ ।। जेथ वेदूही वेडावला । बोधही लाजोनि बुडाला । अनुभवो स्वयें थोंटावला । तो हा निरूपिला वेदार्थ ।। ३६ ।। हें वेदार्थसारनिरूपण । मज विश्वात्म्याचें निजनिधान । तुज म्यां सांगीतलें संपूर्ण । हे जीवींची खूण उद्धवा ।। ३७ ।। कोटिकोटि साधनें करितां । गुरुकृपेवीण सर्वथा । हे न ये कोणाचे हाता । जाण तत्त्वतां उद्धवा ।। ३८ ।। ते गुरुकृपेलागीं जाण । आचरावे स्वधर्म पूर्ण । करावें गा शास्त्रश्रवण । वेदपठण तदर्थ ।। ३९ ।। ते कृपेलागीं आपण । व्हावें दीनाचेंही दीन । धरितां संतांचें चरण । स्वामी जनार्दन संतुष्टे ।। ५४० ।। गुरु संतुष्टोनि आपण । करवी भागवतनिरूपण । एका विनवी जनार्दन । कृपा नित्य नूतन करावी ।। ४१ ।। पुढील अध्यायीं गोड प्रश्न । उद्धव पुसेल आपण । प्रकृतिपुरुषांचें लक्षण । तत्त्वसंख्यासंपूर्ण विभाग ।। ४२ ।। त्याचें सांगतां उत्तर । जन्ममरणांचा प्रकार । स्वयें सांगेल शारंगधर । कथा गंभीर परमार्थी ।। ४३ ।। जे कथेचें करितां श्रवण । वैराग्य उठे कडकडून । येणें विन्यासें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगेल ।। ४४ ।। घटाकाशें ठाकिजे गगन । तेवीं एका जनार्दना शरण । त्याचे वंदितां श्रीचरण । रसाळनिरूपण स्वयें स्मरे ।। ५४५ ।। इति श्रीभागवते महापुराणे भगवदुद्धवसंवादे एकादशस्कंधे एकाकारटीकायां वेदत्रयविभागनिरूपणं नाम एकविंशतितमोऽध्यायः ।। २१ ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकविंशतितमोऽध्यायः ।। २१ ।।

---

अनुभव घेतला असेल तेच जाणोत किंवा उद्धवाला जो आनंद झाला तो एक कृष्ण जाणे. ३१ श्रीकृष्ण म्हणाला कीं, हे उद्धवा ! हा विश्रांति घेण्याचा विसावाच असलेला व माझ्या वेदांतील गुह्य ज्ञानाचा ठेवा असा हा एकविसावा अध्याय मीं तुला सांगितला. ३२ यानें लिंगदेहाचें बळ कमी होतें. जीवाला जीवत्व आठवत नाहीं, असा हा विसाव्याचा विसावा एकविसावा अध्याय तुला निरूपण करून सांगितला. ३३ ज्यानें देहभाव मिथ्या होतो; नाम-रूप शून्य होतें; ३४ अज्ञानाचा नाश होतो; ज्ञानाचा अभाव होतो; ३५ वेदहि वेडावतो; ज्ञान लाजून नाहींसें होतें, अनुभव थिजून जातो तो हा वेदाचा अर्थ मीं स्पष्ट केला. ३६ उद्धवा ! मज विश्वात्म्याचें भांडारच असें हें वेदान्तसारकथन आहे. मीं तुला ही माझ्या जीवाची खूण सविस्तर सांगितली. ३७ उद्धवा ! कोट्यवधि साधनें आचरिलीं तरी गुरुकृपेवांचून हा अर्थ तत्त्वतः कोणालाहि कळत नाहीं, हें खात्रीनें जाण. ३८ यास्तव गुरुकृपा होण्यासाठीं सांग स्वधर्माचरण करावें. त्यासाठींच शास्त्रश्रवण व वेदपठण करीत असावें. ३९ गुरुकृपा होण्यासाठीं आपण दीनाहूनहि दीन होऊन संतांचें चरण धरावे. म्हणजे जनार्दनस्वामी प्रसन्न होईल. ५४० सद्गुरु संतुष्ट होऊन आपणच भागवताचें निरूपण करवीत आहे, म्हणून एकनाथ जनार्दन स्वामीला विनंति करीत आहे कीं, नित्य नवी कृपा वाढत जावी. ४१ पुढील अध्यायांत प्रकृति-पुरुषांचें लक्षण आणि तत्त्वांच्या संख्येचा संपूर्ण विभाग, ४२ यांविषयीं गोड प्रश्न उद्धव विचारील व त्याचें उत्तर देते वेळीं श्रीकृष्ण आपण होऊनच जन्म-मरणांचा प्रकारहि सांगेल. ही कथा परमार्थयुक्त व गंभीर आहे. ४३ जी कथा ऐकिली असतां तीव्र वैराग्य उत्पन्न होईल, अशाच विस्तारानें श्रीकृष्ण तिचें निरूपण करणार आहे. ४४ घटाकाश जसें महाकाशांत मिळून जातें, तसा एकनाथ जनार्दनस्वामीस शरण आहे. त्याच्या चरणांस वंदन केलें असतां रसाळ निरूपणाची सहज स्फूर्ति होते. ५४५.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मेकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव संवादांतील वेदत्रयीविभागयोग नांवाचा एकविसावा अध्याय समाप्त झाला.